**MAMAR 1.4**

# एम.ए.मराठी
# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०नुसार
# सुधारित अभ्यासक्रम
# सत्र - १

# कालखंडाचा अभ्यास
# (आरंभ ते १६००)

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक रविंद्र द. कुलकर्णी**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**डॉ. अजय भामरे**
प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक शिवाजी सरगर**
संचालक,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**कार्यक्रम समन्वयक** : **प्रा. अनिल आर. बनकर**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग व
प्रमुख, मानव्यविद्याशाखा,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यासक्रम समन्वयक व संपादक** : **प्रा. मनिषा बनकर**
सहायक प्राध्यापक,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**लेखक** : **डॉ. अरूण देवरे**
बी/ ३,७०४, रौनकसिटी, जेलरोड,
कल्याण (पश्चिम)

: **प्रा. डॉ. सारीपुत्र अजिनाथ तुपेरे**
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग,
संगमेश्वर महाविद्यालय, सोलापुर

: **डॉ. सीमा मुसळे**
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

: **डॉ. प्रमोद भगवान पडवळ**
मराठी विभाग प्रमुख, कलाशाखा,
बनारस हिंदू विद्यापीठ, (केंद्रीय विद्यापीठ) वाराणसी,
वाराणसी

**जुलै २०२४, मुद्रण - १, ISBN NO- 978-81-977049-9-4**

**प्रकाशक** : संचालक, दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी व मुद्रण** : मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०००९८

## अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | कालखंडाचा अभ्यास : संकल्पना, स्वरुप व वैशिष्ट्ये | ०१ |
| २. | प्राचीन मराठीचे स्वरुप व वैशिष्ट्ये, ताम्रपट आणि शिलालेख यांचा अभ्यास | १२ |
| ३. | यादवकालीन समाज, संस्कृती, संप्रदाय आणि साहित्य | ३२ |
| ४. | बहामनीकालीन समाज आणि संस्कृती | ६८ |
| ५. | बहामनीकालीन संप्रदायाचे तत्त्वज्ञान (दत्त व सूफी संप्रदाय) | ७५ |
| ६. | बहामनीकालीन मराठी भाषा आणि वाङ्मयाचे स्वरुप व वैशिष्ट्ये | ८८ |


❖❖❖❖

**Format of syllabus**

**Progamme Name : M.A. Marathi** **Course Name : कालखंडाचा अभ्यास (आरंभ ते १६००)**
**Study of Periods (Beginning to 1600)**
**Course code : 50411**

**Total Credits : 02** **Total Mark : 50**
**University assessment : 25** **College assessment : 25**

**Course Objective**

१) मराठी भाषा आणि साहित्याच्या प्रेरणांचा शोध घेणे.
२) ताम्रपट आणि शिलालेख यांच्या भाषेचे महत्त्व अभ्यासणे.
३) यादवकालीन मराठीच्या भाषा आणि साहित्याच्या निर्मितीमागील तत्त्वज्ञानाचा आणि सांप्रदायिक विचारांचा शोध घेणे.
४) बहामनी काळातील मराठीच्या भाषा आणि साहित्याच्या निर्मितीमागील तत्त्वज्ञानाचा आणि सांप्रदायिक विचारांचा शोध घेणे.

**Course Outcomes**

१) अभिजात मराठी भाषेची पूर्वपिठीका ज्ञात होईल.
२) शिलालेख आणि ताम्रपट यांच्यातून व्यक्त होणारे मराठी भाषा आणि साहित्य यांचे वैशिष्ट्ये अभ्यासता येईल.
३) यादवकालातील महानुभाव आणि वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचा परिचय होईल.
४) बहामनी कालातील वारकरी, दत्त आणि सूफी संप्रदायाच्या तत्वज्ञानाचे आकलन होईल.

**MODULE –I** (श्रेयांकने २, व्याख्याने ३०)

घटक १

अ) कालखंडाचा अभ्यास :संकल्पना, स्वरूप व वैशिष्ट्ये
आ) प्राचीन मराठीचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये, ताम्रपट आणि शिलालेख यांचा अभ्यास.
इ) यादवकालीन समाज, संस्कृती, संप्रदाय आणि साहित्य.

घटक २

अ) बहामनीकालीन समाज आणि संस्कृती.
आ) बहामनीकालीन संप्रदायांचे तत्त्वज्ञान. (दत्त व सूफी संप्रदाय)
इ) बहामनीकालीन मराठी भाषा आणि वाङ्मयाचे स्वरूप व वैशिष्ट्ये.

**परीक्षा पद्धती :**

अ) अंतर्गत परीक्षा– एकूण गुण २५
१) १0 – १0 गुणांसाठी दोन अंतर्गत परीक्षा
२) उपस्थिती, सादरीकरण आणि उपक्रमांमधील सहभाग : 0५ गुण

आ) सत्रान्त परीक्षा-एकूण गुण २५
१) घटक १, २ यावर आधारित पर्यायासह १५ गुणांसाठी एक दीर्घोत्तरी प्रश्न.
२) घटक १, २ यावर आधारित पर्यायासह १० गुणांसाठी दोन टिपा (चारपैकी दोन)

**संदर्भग्रंथसूची**


१. आचार्य, मा. ना.; ज्ञानमयूरांची कविता, पुष्पा प्रकाशन, पुणे.

२. केतकर, श्री. व्यं.; महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९६४ (दु० आ०).

3. जोग, रा. श्री. ; मराठी वाङ्मयाभिरुचीचे विहंगमावलोकन, पुणे विद्यापीठ, पुणे, १९५९.

४. जोग, रा. श्री.; मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड ३, (१६८१ ते १८००) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९७३.

५. तुळपुळे, शं. गो.; पाच संतकवी, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, १९८४ (तृ० आ०).

६. तुळपुळे, शं. गो.; मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १, (आरंभ ते १३५०) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.१९८४.

७. देशमुख, उषा मा.; कालखंडाचा अभ्यास, मुंबई विद्यापीठ, मराठी विभाग आणि स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे,

८. नसिराबादकर, ल. रा.: प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १५ ०५.

९. पाध्ये, दिगंबर; साहित्य, समाज आणि संस्कृती, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ आणि लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९९८.

१०. फाटक, न. र.; एकनाथ: व्यक्ती आणि वाङ्मय, मौज प्रकाशन, मुंबई, १९६३.

११. बडवे, नानासाहेब, एकनाथांची भारूडे, भाग १. श्रीएकनाथ संशोधन मंदिर, औरंगाबाद, १९६८.

१२. बडवे, नानासाहेब एकनाथांची भारूडे, भाग २, श्रीएकनाथ संशोधन मंदिर, औरंगाबाद, १९७८.

१३. भावे, वि. ल., महाराष्ट्र सारस्वत, खंड १, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८३ (स०आ०). १५. भावे, वि० ल०; महाराष्ट्र सारस्वत, खंड २, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८३ (स०आ०).

१४. भिंगारे, ल. म.; मुक्तमयुरांची महाभारते, मराठवाडा साहित्य परिषद, हैद्राबाद, १९५६.

१५. मालशे, स. गं.; मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड २, भाग १, (१३५० ते १६८०) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९८२.

१६. मालशे, स. गं.; मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड २, भाग २, (१३५० ते १६८०) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९८२.

१७. शेणोलीकर, ह. श्री.; प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, १९७१.

१८. सरदार, गं. बा.; संत साहित्याची सामाजिक फलश्रुती, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९७० (ति० आ०)..

१९. साखरे, नानामहाराज, सकलसंतगाथा, खंड १ ते ३, वरदा प्रकाशन, पुणे, १९६७.

# १

# कालखंडाचा अभ्यास : संकल्पना, स्वरूप व वैशिष्ट्ये

**घटक रचना :**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषयविवेचन

१.२.१ काल आणि कालखंडाची संकल्पना

१.२.२ उदय, विकास आणि ऱ्हास : त्रिसूत्री

१.२.३ राजकीय, सामाजिक, वैचारिक घटनातून घडणारी वाङ्मयनिर्मिती

१.२.४ विशिष्ट कालखंड : वाङ्मयनिर्मिती

१.२.५ वाङ्मयप्रवाह आणि प्रवृत्ती

१.२.६ कालखंड अभ्यासाच्या अटी

१.३ 'वाङ्मयेतिहास' संकल्पना आणि स्वरूप

१.४ मध्ययुगीन कालखंडातील साहित्याबद्दलचे स्थूल स्वरूप (आरंभ ते १६०० पर्यंतच्या)

१.५ समारोप

१.६ संदर्भग्रंथसूची

१.७ पूरक वाचन

१.८ प्रश्नावली

## १.० उद्दिष्टे

१. 'कालखंड' या संज्ञेचे वाङ्मय स्वरूप समजून घेता येईल.

२. 'वाङ्मयेतिहासाची संकल्पना आणि स्वरुपाची चर्चा येईल.

३. राजकीय, सामाजिक, वैचारिक घटनातून घडणारी वाङ्मयनिर्मिती समजेल.

४. 'वाङ्मयेतिहासातील वाङ्मयप्रवाह आणि प्रवृत्ती विद्यार्थ्यांना परिचय होईल.

५. मध्ययुगीन कालखंडातील साहित्याबद्दलचे स्थूल स्वरूपाचा विद्यार्थ्यांना परिचय होईल. (आरंभ ते १६०० पर्यंतच्या)

## १.१ प्रास्ताविक

'काल' ही अखंड सतत चालणारी, प्रवाही अशी नैसर्गिक प्रक्रिया आहे. काल अनंत, अनादि आहे. 'काल' कालगणनेमुळे कल्पिता येतो. दिवस – रात्र यासारख्या गोष्टीतून कालगणना शास्त्रांची निर्मिती झाली आहे. कालगणना मानवी आणि सृष्टीमधील घटनांशी निगडित असते.

'कालखंड' ही संकल्पना 'वाङ्मयेतिहासाशी निगडित बाब आहे. निसर्ग अथवा मानवनिर्मित एका घटनेपासून दुसऱ्या घटनेपर्यंतचा कालप्रवाह म्हणजे 'कालखंड' होय.

'वाङ्मयेतिहासात कालखंड 'मानावयाचे' असतात. ते आपोआप पडत नसतात. 'वाङ्मयेतिहासात प्रभाव गाजवणाऱ्या लेखकाला केंद्रवर्ती ठेवून कालखंड मानतात. महत्त्वाच्या 'वाङ्मयाचा कालखंड, विशिष्ट 'वाङ्मयाचा उदय, विकास, ऱ्हास यांचा आलेख मांडणारा कालखंड, वाङ्मयीन प्रवाह, प्रकृतीनुसार कालखंड मानता येतात.

वाङ्मयाचा कालखंड म्हणत असता वाङ्मयेतिहासाने निर्माण केलेल्या कालखंडालाच अभ्यास विषय ठरवला जातो आणि काळाबरोबर 'स्थळाचाही विशेष लक्षात घेता येतो. त्यामधून साहित्याचा 'कालनिष्ठ' 'स्थळनिष्ठ' अभ्यास तर्कानुसार करता येतो.

साहित्य आणि इतिहास ही अभिव्यक्तीची साधने आहेत. मानवी जीवन हे 'आशयद्रव्य' आणि भाषा हे 'वाहनद्रव्य' आहे. साहित्याच्या अंगाने विचार केल्यास इतिहास हा साहित्याला कथानक पुरवणारे महत्त्वाचे उगम केंद्र आहे. अनेक साहित्यकृतीची बीजे इतिहासातून प्राप्त होतात. मानव हा साहित्य आणि इतिहास या दोघांचा केंद्रबिंदू आहे. 'व्यक्ती', 'समाज', 'स्थल' आणि 'काळ' या इतिहासातील चार प्रमुख बाबी साहित्याला देखील तंतोतंत लागू पडतात. नाव आणि तारखा खऱ्या असतात तेथे इतिहास असतो. परंतु काल्पनिक असतात आणि सर्व खरे असते. तेथे साहित्य असते. श्रेष्ठ साहित्य इतिहासाचा भाग असतो त्याचबरोबर दर्जेदार ऐतिहासिक ग्रंथ साहित्यात समाविष्ट होऊ शकतो. उदाहरणार्थ 'रामायण-महाभारत' या व अशासारखे ग्रंथ, सांस्कृतिक इतिहासाचा भाग बनतात. इतिहासावरील एखादा ग्रंथ साहित्यकृती म्हणून लोकप्रिय होतो. उदाहरणार्थ शेक्सपिअरच्या एका नाटकातील 'उसूक ऑफ मार्लबरोसारखं माणूस (व्यक्तिरेखा) आपण आपला इतिहास शेक्सपिअरच्या साहित्यावरून (नाट्यकृतीवरून) शिकलो याचा प्रत्यय देतो.

(१) मराठीचा आदिकाल (प्राचीन काल) इसन १० व्या – ११ व्या शतकापासून इसन १३५० पर्यंतचा काळ होय.

(२) मराठीचा मध्यकाळ किंवा मध्ययुगीन मराठी इसन १३५० ते इसन १८०० पर्यंतचा काळ होय.

(३) अर्वाचीन काळ (आधुनिक काळ) १८०० पासून आजपर्यंतचा काळ... म्हणून आदिकाळ, मध्यकाळ व अर्वाचीन काळ हे तीन टप्प्यातील वर्गीकरणच योग्य मानावे लागते.

## १.२ विषयविवेचन

### १.२.१ काळ आणि कालखंडाची संकल्पना

'काळ' आणि 'कालखंड' या संज्ञा तत्त्वज्ञान, ज्योतिषशास्त्र, इतिहास, गणित, खगोलशास्त्र अशा अभ्यासात वापरल्या जातात. तत्त्वज्ञानात'काळ' ही संज्ञा 'शाश्वती' या अर्थाने येते आणि शास्त्रात महाकाव्य, खंडकाव्य अशा आशयाने येते. 'काळ' या शब्दातून वेळ, प्रसंग या बाबींचे सूचन होते. दत्तात्रय पुंडे लिहितात. कालगणनेमुळे कालचे खंड कल्पिता येतात. निसर्गनिर्मित अथवा मानवनिर्मित एका घटनेपासून दुसऱ्या घटनेपर्यंतचा कालप्रवाह म्हणजे कालखंड मानवी जीवनाच्या अवस्थांतराचे आकलन कालखंड करते. साहित्याच्या क्षेत्रात कालखंडातून साहित्याचा 'गतकाळ' समजतो. त्यातूनच पुढे वाङ्मयेतिहासाची निर्मिती झालेली आहे.

### १.२.२ उदय, विकास आणि ऱ्हास : त्रिसूत्री

'उदय', 'विकास' आणि 'ऱ्हास' या त्रिसूत्रीने कालखंड निश्चित करता येतो. विशिष्ट वाङ्मय वातावरणाचा उदय, विकास आणि ऱ्हास या त्रिसूत्रीच्या वाङ्मय अभ्यास आणि निरीक्षण असा हा कालखंड गृहित धरता येतो. हे चरक स्पष्ट नसते. ते धूसर, पुसट असते. याचे प्रमुख कारण म्हणजे साहित्यरूपे जन्म घेत असतात. कधी कधी ती साहित्यरूपे या त्रिसूत्रीतून जातही नाहीत. विशिष्ट कालखंडाच्या अभ्यासात संशोधनावर भर दिला जातो.

### १.२.३ राजकीय, सामाजिक, वैचारिक घटनातून घडणारी वाङ्मय निर्मिती :

लेखक हा माणूस असतो. तो समाजाचा मुख्य घटक असल्यामुळे राजकीय, सामाजिक, वैचारिक गोष्टींचा अभ्यास हा कालखंडाच्या अभ्यासाकरिता उपयुक्त ठरतो. परंतु तो कालखंडाचा अभ्यास समाज इतिहास न होता वाङ्मयाचा अभ्यास येथे अभिप्रेत आहे. विशिष्ट कालखंडातील वाङ्मयाला विशिष्ट आकार प्राप्त होण्यासाठी कोणते सांस्कृतिक वातावरण कारणीभूत झाले. याचा शोध येथे घेतला जातो.

### १.२.४ विशिष्ट कालखंड : वाङ्मय निर्मिती

विशिष्ट कालखंडात वाङ्मय निर्मितीची आणि एकंदर वाङ्मय व्यापाराची विशिष्ट केंद्र कार्यरत असतात. कालखंड बदलला की केंद्रे देखील गेली आहेत. मराठी वाङ्मयाच्या प्रवाहाकडे दृष्टिक्षेप टाकला तरी आपल्या लक्षात येते. उदाहरणार्थ ऋद्धीपूर पैठण ही वाङ्मय व्यापाराची केंद्रे आरंभ काळात कार्यरत होती. कालखंड बदलला की अनेक वेळा ही केंद्रे बदलतात. मध्ययुगीन कालखंडात ऋद्धीपूर, पैठण ही केंद्रे कार्यरत होती. त्याचबरोबर आधुनिक वाङ्मयाच्या काळात मुंबई आणि पुणे ही केंद्रे कार्यरत होती. अव्वल इंग्रज पूर्वकाळात मुंबई आणि उत्तरकाळात पुणे कार्यरत होते.

मराठी कादंबरी बहरण्याच्या काळात मराठी लघुकथेने बाळसेही धरले नव्हते. म्हणजेच एकाच कालखंडातील विविध वाङ्मयप्रकारात असमानता राहते. म्हणूनच साहित्य प्रकारानुसार कालखंड मानण्यात समस्या निर्माण होतात.

### १.२.५ वाङ्मय प्रवाह आणि प्रवृत्ती :

वाङ्मय प्रवाहाची प्रवृत्ती पाहून साहित्याचे कालखंड मानता येतात. प्रवृत्तीनुसार कालखंड मानून वाङ्मय अभ्यास केल्यास तो जास्त फायदेशीर ठरतो.

उदाहरणार्थ हरिभाऊ आपटे यांच्या कथा, कादंबऱ्या, कादंबरीकार म्हणून हरिभाऊ श्रेष्ठ ठरतात. परंतु त्यांच्या स्फुटकथा, लघुकथांना म्हणावे तसे यश प्राप्त झालेले दिसत नाही. म्हणजेच वाङ्मयाच्या कालखंडाचा अभ्यास काललक्ष्यी असतो. विशिष्ट कालखंड आणि त्यामधून निर्माण झालेले वाङ्मय यांचा आंतरिक संबंध शोधणे ही प्रवृत्ती यातून जाणवते. व वाङ्मय प्रवाहाचे कालखंड मानून त्यातून वाङ्मयीन प्रवृत्तीचा शोध घेता येतो.

### १.२.६ कालखंड अभ्यासाच्या अटी :

#### १. यथायोग्य संशोधन :

कालखंडाच्या अभ्यासाची संशोधन ही पूर्व अट आहे. परंतु संशोधन आणि कालखंडाचा अभ्यास या दोन्ही गोष्टी वेगळ्या आहेत. संशोधन ही स्वतंत्र, स्वायत्त अशी विद्याशाखा आहे.

### १.२.७ कालखंडाच्या अभ्यासाची ठळक वैशिष्टये

१) मानव आणि निसर्गनिर्मित एका घटनेपासून दुसऱ्या घटनेपर्यंतच्या कालप्रवाहाला 'कालखंड' असे म्हणतात.

२) ज्योतिषशास्त्र, खगोलशास्त्र, इतिहास, गणित, तत्त्वज्ञान या व अशासारख्या क्षेत्रात "कालखंड" या संकल्पनेत समावेश होतो.

३) वाङ्मयाच्या कालखंडाचा अभ्यासात 'काललक्ष्यी' अभ्यास असतो. विशिष्ट कालखंड आणि त्यामध्ये निर्माण झालेले वाङ्मय यांच्यातील आंतरसंबंधाचा शोध घेतला जाते.

४) कालखंडाच्या अभ्यासात वाङ्मयीन स्थित्यंतरे, वाङ्मयीन परंपरा आणि नवता यांच्या क्रिया प्रतिक्रियांचा वाङ्मयाशी निगडित अभ्यास करता येतो.

५) कालखंडाचा अभ्यास करताना साहित्यकृती, लेखक साहित्यप्रकार यांचा अभ्यास केलेला असतो.

६) विशिष्ट कालखंडाच्या अभ्यासात युगधर्म आणि साहित्य यांच्यातील नाते शोधण्यावर भर दिलेला असतो. विशिष्ट कालखंडातील विशिष्ट कर्तव्याला 'युगधर्म' असे म्हटले जाते.

   कालखंडाचा अभ्यास करताना त्या काळामधील युगधर्म समजून घेणे ही त्या काळाच्या अभ्यासाची पूर्व अट असते. म्हणून (तेन) या अभ्यासकाने साहित्यकृती ही काळ, समाज आणि परिवेश (परिस्थिती) यांची निर्मिती असते. असा सिद्धांत मांडला आहे.

वाङ्मय हे विशिष्ट काळाशी जोडलेले असते. लेखक त्याच्या काळाशी बांधलेला असतो. आस्वादक देखील काळाशी जुळवून घेतो. वारकरी पंथ, महानुभाव पंथ यांच्या साहित्यातून चित्रित होणारी 'अध्यात्म शिकवण' हा युगधर्मच आहे.

७) वाङ्मयाच्या कालखंडाचा अभ्यास करताना भौतिक, सामाजिक, सांस्कृतिक, वैयक्तिक (लेखक), राजकीय घटनांचा विशिष्ट काळातील वाङ्मयावरील प्रभाव संस्कार यांचाही अभ्यास करावा लागतो.

८) वाङ्मयेतिहासाचा घटक म्हणून आपण कालखंडाचा अभ्यास करतो. तेव्हा ऐतिहासिक स्थित्यंतराच्या मागोवा घेतला जातो.

९) इतिहासाची क्षेत्र मर्यादा, कालमर्यादा लक्षात घेऊन त्या काळातील, क्षेत्र चौकटीतील साहित्यरूपांचा अभ्यास कालखंडाच्या अभ्यासाद्वारे करता येणे शक्य आहे.

१०) वाङ्मयाच्या कालखंडाचा अभ्यास समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, धर्मशास्त्र या व अशासारख्या अन्य शाखेच्या अभ्यासकांनाही लाभदायक ठरत असतो.

## १.३ वाङ्मयेइतिहास संकल्पना आणि स्वरूप

### १.३.१ वाङ्मयेतिहास, लघु संज्ञा :

वाङ्मयेतिहास ही एक महत्वाची 'अभ्यास पद्धती' मानली जाते. वाङ्मयेतिहास हा विशिष्ट समाजाच्या वाङ्मयीन ठेवा असतो. ऐतिहासिक आलेख असतो. अलीकडे भारत, युरोप, अमेरीका या देशात वाङ्मयेतिहासाला स्वतंत्र अभ्यास क्षेत्र मानले जाते.

एका विशिष्ट भाषेतील संपूर्ण वाङ्मयकृतीचा विशिष्ट दृष्टिकोन घेऊन केलेला परंपराधिष्ठित ऐतिहासिक अभ्यास म्हणजेच ' वाङ्मयेतिहास' होय. अशी संकल्पना डॉ. दत्तात्रय पुंडे यांनी मांडली आहे.

### १.३.२ वाङ्मयेतिहासातील : इतिहास आणि वाङ्मय

वाङ्मय आणि इतिहास ही अभिव्यक्तीची माध्यमे आहेत. वाङ्मय आणि इतिहास यांच्यात परस्परसंबंध असून ते अत्यंत जवळचे आहेत. वेगवेगळ्या इतिहासकारांनी एकाच कालखंडाचा इतिहास ठराविक साधनांच्या आधारे लिहिला तरी त्यांनी रेखाटलेली चित्रे भिन्न असतात. म्हणूनच इतिहास वाचण्यापूर्वी इतिहासकाराला योग्य अभ्यास करावा लागतो.

मानव हा साहित्य आणि इतिहास यांचा केंद्रविषय असतो. ‘व्यक्ती’, ‘समाज’, ‘स्थळ’, ‘काळ’ हे इतिहासाचे चार घटक साहित्यालाही तंतोतंत लागू पडतात.

नाव आणि तारखा खऱ्या असतात. तो इतिहास आणि काही बाबी काल्पनिक असतात. बाकी सगळे खरे असते ते साहित्य असे म्हणता येते.

श्रेष्ठ साहित्य हा इतिहासाचा भाग बनतो. आणि दर्जेदार इतिहासग्रंथ साहित्यात समाविष्ट होतो. उदाहरणार्थ : 'रामायण - महाभारत' हे ग्रंथ सांस्कृतिक इतिहास दर्शवतात. म्हणूनच साहित्य हा इतिहासाच्या महत्त्वपूर्ण स्त्रोत आहे.

इतिहास भौतिक साधनांना महत्त्व देतो. वाङ्मयेतिहास लिखित कलाकृतींना प्राधान्य देतो. प्राचीन काळात वाङ्मयाला काव्य, साहित्य असे म्हटले जात असे.

इतिहासात असे का घडले .... ? त्याची कारणे आणि पुरावे देता येतात. वाङ्मयात असे घडले या संदर्भात कारणे पुरावे देता येत नाहीत. तो कल्पित असतो. शब्दमाध्यमामधून शोधावा लागतो. वाङ्मयात कल्पनाशक्ती असते. इतिहासात नसते. इतिहास सत्यावर आधारित असतो. वाङ्मयात सत्याचा अभ्यास असतो.

इतिहासात व्यक्ती, घटना, प्रसंग, कालानुक्रम यांना महत्त्व असते. वाङ्मयात या गोष्टींना तेवढे महत्त्व नसते. इतिहास हा घटनांची व्यवस्था लावतो. कल्पना, प्रतिभा, प्रतिमा यांना वाङ्मयात प्राधान्य दिले जाते.

### १.३.३ वाङ्मयेतिहास आणि कालखंडाचा इतिहास :

वाङ्मयेतिहास लेखनात कालखंडाला प्राधान्य दिले जाते. वाङ्मयामधून त्या काळातील भाषिक, सामाजिक - सांस्कृतिक गोष्टी समजत असतात. त्यामुळे कालखंडाचा इतिहास लिहिताना लेखक कोण आहेत? त्यांच्या लेखन प्रेरणा, त्यांच्या लेखनाचे प्रयोजन, त्यांची भाषेतील प्रयोगशीलता या सर्व बाबींचा शोध घेऊन इतिहास लिहावा लागतो.

वाङ्मयाचा प्रवाह सलग असला तरी वाङ्मयेतिहास लेखनाकरिता त्याचे का अखंड मानावे लागतात. सामाजिक, राजकीय इतिहासाच्या प्रभावामुळे सुरुवातीच्या वाङ्मयेतिहासात सामाजिक, राजकीय स्थित्यंतरानुसार कालखंड मानून योग्य शीर्षके त्यांना देण्यात आली. उदाहरणार्थ, 'मध्ययुगीन मराठी वाङ्मय' लेखकनिष्ठ वाङ्मयेतिहासात प्रभाव गाजवणाऱ्या लेखकानुसार कालखंड मानले जातात. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरांचा कालखंड

वाङ्मयाला राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी असते. यामधूनच यथायोग्य आणि कालसंगत आकलन करून घेण्यासाठी 'कालपटाची' संकल्पना पुढे आलेली आहे.

कालपटाच्या निरीक्षणातून वाङ्मयीन घटना आणि इतर घटना यांच्याशी असलेले नाते आकलनास सहाय्य होते. मराठीच्या संदर्भात गो. म. कुलकर्णी यांनी 'कालपटाचा' अभ्यास केलेला आहे. त्याचे प्रत्यंतर मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड - ६, भाग -पहिला मधून येते.

वाङ्मयेतिहासाच्या संदर्भात अवाङ्मयीन वाटणारे प्रश्न मोलाचे ठरतात. उदाहरणार्थ प्राचीन वाङ्मय आकलनाच्या दृष्टीने तत्त्कालीन तीर्थक्षेत्रे, मठ, संस्था महत्त्वाचे ग्रंथ, शिक्षण व्यवस्था प्रसारमध्याने हे विचार महत्त्वाचे ठरतात. प्राचीन वाङ्मयाचा आणि त्या काळामधील सांस्कृतिक केंद्राचा वाङ्मयनिर्मितीवरील परिणाम उलगडून दाखवणे वाङ्मयेतिहासाच्या अभ्यासाला उपकारक ठरेल.

कालखंडाच्या वाङ्मयेतिहासाचे आकलन करून घेण्याकरिता मध्ययुगातील पुराणकथांची मांडणी आणि पुराणावरील चित्रे या व अशासारख्या साहित्याचा अभ्यासक्रमात समावेश करता येतो.

एखादी साहित्यकृती ऐतिहासिक दृष्टया महत्त्वाची असते. परंतु वाङ्मयदृष्टया दुय्यम स्वरुपाची असते. उदाहरणार्थ फादर स्टिफन्स यांचे 'क्रिस्तपुराण' साहित्यदृष्टया सामान्य आहे. परंतु मराठीमधील ख्रिस्ती साहित्यविचारदृष्टया ते मौलिक आहे. म्हणूनच वाङ्मयेतिहासाच्या विवेचनात त्याला महत्त्व द्यावे लागते.

वाङ्मयेतिहासाचे कालखंड कसे मानावेत ही एक जटिल समस्या वाङ्मयेतिहासकारापुढे असते. आजपर्यंत राजकीय इतिहासाचे कालखंड यांना विशेष महत्त्व दिले गेले आहे. परंतु राजकीय इतिहास आणि वाङ्मयीन स्थित्यंतरे यांच्यात अनुबंध असतातच असे निश्चितपणे सांगता येत नाही. म्हणून वाङ्मयप्रवाहातील ठळक स्थित्यंतराप्रमाणे वाङ्मयेतिहासाचे कालखंड प्रत्ययकारी होऊ शकतील.

### १.३.४ वाङ्मयेतिहास लेखनाची 'मुख्य' आणि पूरक सामग्री

मुद्रण पूर्वकाळातील हस्तलिखित, मौखिक वाङ्मयमुद्रणोत्तर काळातील हस्तलिखित, मुद्रित वाङ्मय ही वाङ्मयेतिहासाची मुख्य सामग्री आहे.

लेखकचरित्रे, मुद्रणसंस्था, प्रकाशनसंस्था, प्रसारमाध्यमे, नियतकालिके, वर्तमानपत्रे, वाङ्मयीन चळवळी, परिसंवाद, चर्चासत्रे, संमेलने, पुरस्कार, पारितोषिके, अनुदाने, शिष्यवृत्त्या, अभ्यासवृत्त्या ही पूरक सामग्री आहे.

त्याचबरोबर सामाजिक, धार्मिक, राजकीय घडामोडींचे वाङ्मयावर होणारे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम ही वाङ्मयेतिहासाची संदर्भसामग्री आहे. अशा प्रकारे 'वाङ्मयेतिहास' हा मुख्य, पूरक, संदर्भ सामग्रीमधून आकारास येतो.

## १.४ मध्ययुगीन कालखंडातील साहित्याबद्दलचे स्थूल स्वरूप (आरंभ ते १६०० पर्यंतच्या)

### १.४.१ प्राचीन आणि मध्ययुगीन मराठी वाङ्मय

प्राचीन मराठी वाङ्मय हे सांप्रदायिक वाङ्मय आहे. ‘नाथ’, ‘भागवत’, ‘महानुभाव’ हे संप्रदाय आढळतात. प्रत्येक पंथाचे तत्त्वज्ञान आणि आचारधर्म वेगवेगळे आहेत. त्याच्या प्रसारासाठी आणि प्रचारासाठी प्रामुख्याने त्या त्या पंथीयांनी वाङ्मयनिर्मिती केलेली आहे.


कोणत्याही कालखंडातील वाङ्मयाचा तत्कालीन सांस्कृतिक पार्श्वभूमीशी संबंध असतो. मध्ययुगीन राजकीय आणि धार्मिक परिस्थितीने ह्या वाङ्मयाला जन्माला घातले होते.

एखाद्या विशिष्ट कालखंडातील राजकीय परिवर्तन त्या काळातील साहित्यनिर्मितीवर प्रभावशाली ठरतात. महानुभव साहित्य ज्या काळात निर्माण झाले त्यावेळच्या यादवराजाचे आणि त्याच्या भोवतालचे पर्यावरणीय चित्रण लीळाचरित्रातून आढळते. संत ज्ञानदेव, संत नामदेव यांच्या लेखनातूनही त्याचे दर्शन घडते.

ज्ञानेश्वर आणि चक्रधर हे एकप्रकारे समकालीन व आपापल्या पंथप्रणालीच्या अग्रस्थानी आहेत. चक्रधरांना केंद्रस्थानी मानून ज्याप्रकारे साहित्य महानुभवांनी निर्माण केले. त्याप्रकारचे साहित्य संतसंप्रदायाने निर्माण केले नाही. कारण दोन पंथाच्या तत्त्वविचारामधील वेगळेपण कारणीभूत आहे.

प्राचीन मराठी वाङ्मयात प्रामुख्याने संत पंत (पंडित) आणि तंत (शाहीर) वाङ्मयप्रवाह यांचा समावेश होतो. महानुभाव संप्रदाय आणि बखर वाङ्मयाची भाषा गद्य-पद्य मिश्रित आहे. प्राचीन वाङ्मय धार्मिक, पारमार्थिक, अध्यात्मिक विचार लोकांमध्ये रुजविण्याच्या उद्देशाने निर्माण झालेले आहे. प्राचीन मराठी वाङ्मय पद्यमय आहे. त्याचा आराखडा पुढीलप्रमाणे :

प्राचीन मराठी पद्यमय वाङ्मय




मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास वि. ल. भावे यांनी 'महाराष्ट्र सारस्वत' मधून ऐतिहासिक दृष्टीतून अभ्यासपूर्ण लिहिलेला आहे.

ल. रा. पांगारकर यांनी मध्ययुगीन मराठी संत वाङ्मयासंदर्भात (१) ज्ञानदेव काळ (२) एकनाथ काळ (३) तुकाराम - रामदास काळ (४) मोरोपंत काळ (५) मराठी गद्याच्या उदयकाळ अशी कालखंडाची विभागणी केलेली आहे.

त्याचबरोबर मराठी भाषेच्या इतिहासात गं. ना. जोगळेकर यांनी (१) मराठीचा आदिकाल (प्राचीन काळ) १३५० पर्यंत (२) मराठीचा मध्यकाळ (मध्ययुगीन मराठी) १८०० पर्यंत (३) आधुनिक काळ (अर्वाचीन मराठी) १८०० पासून आजपर्यंतचा काळ मानला जातो.

त्यांनी आदिकाल, मध्यकाळ आणि अर्वाचीन काल हे तीन टप्प्यातील वर्गीकरण योग्य मानले आहे.

ज्ञानेश्वरांच्या काळात 'मऱ्हाटी भाषा' या काळात महाराष्ट्र भाषा बनली. आदिकालीन मराठीपेक्षा मध्ययुगीन मराठीचे रूप काही बाबतीत बदलले आहे. 'ल' च्या जागी 'ळ' चा अवलंब मध्ययुगीन मराठीत होऊ लागला होता. आदिकालीन (महानुभावी) मराठीत केवल

वाक्यांचे प्रमाण जास्त होते. मध्यकालीन मराठीतही केवल वाक्यांचे प्रमाण अधिक आहे. मध्ययुगीन मराठीचा शब्दसंग्रह 'तत्सम', 'तद्भव' आणि 'परभाषातील शब्द' अशी त्रिविध प्रकारची आहे...

एकंदर पाच शतकांच्या प्रदीर्घ कालखंडामध्ये मध्यकालीन मराठीत ध्वनी (स्वन) रूप, शब्दसंग्रह्य, वाक्यरचना या बाबतीत आदिकालीन मराठी आणि अर्वाचीन मराठी यांना जोडणारा दुवा म्हणजे मध्यकालीन मराठीच आहे. असे म्हणता येते...

अशा रितीने जीवन जगण्याचे श्रद्धा केंद्र 'धर्म' आणि 'परमेश्वर' होते. अर्वाचीन काळाने विज्ञान आणि माणूस यांना प्राधान्य मिळाले आहे. १८१८ मध्ये पेशवाई संपल्यानंतर राजकीय कालखंड वाङ्मयीन कालखंड ठरला... कारण संस्कृती बदलल्यामुळे वाङ्मयीन बदलत असते.

एका दृष्टिक्षेपात प्राचीन मराठीच्या साहित्येतिहास आराखडा पुढीलप्रमाणे :

**एका दृष्टिक्षेपात प्राचीन मराठीचा साहित्येतिहास**
**बदलत्या कालानुसार व परिस्थितीनुसार प्राचीन मराठी साहित्यनिर्मितीतील बदलाचा आलेख**

| काळ व परिस्थिती | साहित्यप्रवृत्ती | प्रेरणा | प्रवाह | प्रत्यय (स्वरूप, वैशिष्ट्ये) | | साहित्याचा परिणाम |
|---|---|---|---|---|---|---|
| इ.स. १०५० ते इ.स.१३५० (यादवकालीन) राजकीय, आर्थिकदृष्ट्या स्थैर्य, संपन्नता परंतु धार्मिक, मानसिक दौर्बल्य, सामाजिक क्षेत्रात भेदाभेद, अंधश्रद्धा, कर्मकांड इ. (संतसाहित्यामुळे बदल) | संतसाहित्य (नाथ, महानुभाव वारकरी) धार्मिक, अध्यात्मिक, तत्त्वज्ञानात्मक | परमेश्वर भक्ती, गुरुभक्ती, पंथप्रसार, आत्माविष्कार, लोकप्रबोधन, मराठीचा अभिमान | कवी चक्रधर, नरेंद्र व इतर ज्ञानेश्वर, नामदेव व नरहरी सोनार आदी संतमेळा | पंथ लीळाचरित्र साती ग्रंथ ज्ञानेश्वरी व संतांची अभंगवाणी, आत्मनिष्ठ सौंदर्यवादी भावकाव्य शांत, भक्तिरस | अभिव्यक्ति गद्य, पद्य, अभंग, ओवी, आरती, स्त्रोत्र इ. | आधीग्रंथातूनच साहित्याचे मानदंड तयार, अध्यात्मिक लोकशाहीची स्थापना मानवी मूल्यांची जोपासना |
| • १) इ. स. १३५० ते १५५० <br>• २) १५५० ते १६५० (मुसलमानी काळ) मुस्लिम राजवट, पारतंत्र्य, धर्मग्लानीचे तमोयुग (१३५० ते १५५०) | संत साहित्य (नाथ वारकरी दत्त संप्रदाय) (वरीलप्रमाणे) पंडिती साहित्य आरंभकाल कलाविलासाची प्रवृत्ती, अनुकरणाची प्रवृत्ती | वरीलप्रमाणे पांडित्य प्रदर्शन, कलाविष्कार | दासोपंत, संत एकनाथ, (पंचक) तुकाराम, पंडित एकनाथ व मुक्तेश्वर अन्यधर्मीय (जैन, ख्रिस्त, मुस्लिम) | गीतार्णव भागवत, भारुडे, भावार्थ रामायण, रुक्मिणी स्वयंवर, महाभारतपूर्व, ख्रिस्तपुराण इ. | ओवी, अभंग, भारुडे, श्लोक छंदांकडून वृत्तांकडे (आख्यान काव्य) नवरसांना प्राधान्य. | वाङ्‌ परिस्थितीत बदल आणता येत नाही म्हणून कलाविष्कारात, समाधान, इतिहास पुराणात अस्मिताशोधन एकनाथांमुळे परिस्थिती व साहित्याला आधार अन्य धर्मीयांमुळे साहित्य समृद्ध. |

### १.४.२ 'तेन' आणि 'क्रेन' यांचा वाङ्मयविषयक विचार :

वाङ्मय आणि इतिहास यामध्ये 'क्रेन' ची वाङ्मयलक्ष्यी आणि तेनची समाजलक्ष्यी भूमिका महत्त्वाच्या ठरल्या आहेत. लेखक आणि त्याचे मन यावर पूर्व आणि स्वकाळामधील अशा अनेक गोष्टींचा (घडामोडींच्या) प्रभाव असतो. असा विचार 'तेन' यांनी मांडला आहे... हा विचार त्याने आपली वंश (रेस), परिस्थिती (मिल्यू) आणि क्षण (मोमेंट) या त्रिसूत्रीच्या आधारे मांडलेला आहे. या त्रिसूत्रीच्या आधारे वाङ्मयाचा इतिहास लिहिता येतो.

एकाच वंशातील व्यक्तीत धर्म, तत्त्वज्ञान यांच्याबरोबर वाङ्मयात देखील आविष्कार होतो. परिस्थितीच्या मानवसमूहावरील परिणाम वाङ्मय आदि कलांमध्ये अवतरतो. 'क्षण' या सूत्राच्याआधारे एखाद्या घटनेमागील तत्कालीन परिस्थिती पार्श्वभूमीचा वाङ्मयकृतीवर असणारा प्रभाव (तेन) याने लक्षात घेतला आहे. म्हणूनच काहीजण मोमेंटचे भाषांतर (युगधर्म) असे करतात.

'क्रेन' याने वाङ्मय हेच केंद्रस्थान मानून 'वाङ्मयेतिहास' कसा लिहिता येईल. यासंदर्भात त्यांनी आपल्या सिद्धांत “क्रिटिकल अँड हिस्टॉरिकल प्रिन्सिपल्स ऑफ लिटररी हिस्टरी” (१९६०) या ग्रंथात मांडला आहे. त्याने लेखकाची रूपे (फॉर्म) द्रव्य (मटेरियल) आणि तंत्र (टेक्निक) या तीन घटकातून वाङ्मयनिर्मिती होते. असे म्हटले आहे. लेखक या घटकांमधून वाङ्मयात 'नवता' घडवून आणत असतो.

## १.५ समारोप

'काळ' ही सतत चालणारी प्रवाही, नैसर्गिक प्रक्रिया असते. काळाबरोबर 'स्थल' या संकल्पनेत जोडले जाते. 'कालखंड' ही संकल्पना वाङ्मयेतिहासाशी निगडित गोष्ट आहे... वाङ्मयेतिहासात कालखंड मानावयाचे असतात. ते आपोआप पडत नसतात. मानव हा साहित्य आणि इतिहास यांचा केंद्रविषय असतो. इतिहास भौतिक साधनांना प्राधान्य देतो. त्याचबरोबर वाङ्मयेतिहास ललित कलाकृतींना प्राधान्य देतो.

हस्तलिखिते, मुद्रित वाङ्मय ही मुख्य सामग्री, चर्चासत्रे, परिसंवाद, पुरस्कार ही पूरक सामग्री आणि सामाजिक, धार्मिक, राजकीय घडामोडींचे वाङ्मयावर होणारे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम ही संदर्भसामग्री असते. प्राचीन वाङ्मय धार्मिक, अध्यात्मिक पारमार्थिक विचार लोकांमध्ये रुजविण्याच्या उद्देशाने निर्माण झाले आहे... वाङ्मय आणि इतिहास यामध्ये क्रेनची वाङ्मयलक्ष्यी आणि तेनची समाजलक्ष्यी भूमिकांना प्राधान्य दिले जाते.

## १.६ संदर्भग्रंथसूची

१) देशमुख, उषा (संपा.), वाङ्मयाच्या कालखंडाचा अभ्यास, मुंबई विद्यापीठ, मराठी विभाग आणि स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे १९९४

२) हंडीबाग, भारत, आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २०१२

३) जोगळेकर, गं. ना. मराठी भाषेचा इतिहास, श्रीविद्याप्रकाशन, पुणे, २००५

४) सिन्नरकर, मंगला यांची प्राचीन मराठी वाङ्मयाबद्दलची टिपणे

## १.७ पूरक वाचन

१) श्री. पु. भागवत (संपा.) साहित्य अध्यापन आणि प्रकार मौज प्रकाशन, (दु.आ.) २०११ मुंबई

२) विजया राजाध्यक्ष (संपा.) मराठी वाङ्मयाकोष खंड-चार, समीक्षासंज्ञा, २००२

३) मराठी विश्वकोश, वाङ्मयेतिहास संकल्पना, डॉ. दत्तात्रय पुंडे.

## १.८ नमुना प्रश्न

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१) कालखंडाच्या अभ्यासाची ठळक वैशिष्टये सविस्तर लिहा.

२) 'कालखंडाचा अभ्यास करताना कोणकोणत्या गोष्टींचा विचार केला जातो' त्याचा सविस्तर आणि सोदाहरण आढावा घ्या.

३) वाङ्मयेतिहास संकल्पना आणि स्वरूप सविस्तर विशद करा.

**ब) टिपा लिहा.**

१) वाङ्मय आणि इतिहास यांच्यातील 'भेद'.

२) 'काल' आणि 'कालखंड' या संकल्पना

३) तेनची त्रिसूत्री लिहा.

४) क्रेनचा साहित्यविषयक विचार

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) द. दि. पुंडे यांनी वाङ्मयेतिहासाची केलेली व्याख्या लिहा.

२) 'कालखंड' ही संकल्पना कोणकोणत्या क्षेत्रात उपयोगात येते.. ?

३) वाङ्मयेतिहास लेखनातील पूरक सामग्री कोणती ?

४) कोणत्याही कालखंडातील वाङ्मयाचा कोणत्या पार्श्वभूमीवर संबंध असतो...?

❖❖❖❖

# २

# प्राचीन मराठीचे स्वरूप व वैशिष्ट्ये, ताम्रपट आणि शिलालेख यांचा अभ्यास

**घटक रचना :**

२.१ उद्देश

२.२ प्रस्तावना

२.३ प्राचीन मराठीचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये

२.३.१ मराठी भाषा उद्गम आणि विकास

२.३.२ प्राचीन मराठी पद्य लेखन

२.३.३ प्राचीन मराठी गद्य लेखन

२.३.४ प्राचीन मराठीची वैशिष्ट्ये

२.४ ताम्रपट आणि शिलालेखांचा अभ्यास

२.४.१ दिवे आगर ताम्रपट

२.४.२ श्रवणबेळगोळ शिलालेख

२.४.३ आंबे शिलालेख

२.४.४ भांदक शिलालेख

२.४.५ पळसदेव शिलालेख

२.४.६ सावरगाव शिलालेख

२.४.७ लोनाड शिलालेख

२.४.८ परळ शिलालेख

२.४.९ नेवासे शिलालेख

२.४.१० फुलंबरी शिलालेख

२.४.११ उन्हक शिलालेख

२.४.१२ मंगळवेढे शिलालेख

२.४.१३ अक्षी शिलालेख

२.४.१४ बेळापूर शिलालेख

२.४.१५ आगासन शिलालेख

२.४.१६ बेळापूर शिलालेख

२.४.१७ विजापूर शिलालेख

२.४.१८ खाटेग्राम ताम्रपट

२. ४.१९ वेळुस शिलालेख

२.४.२० बांदोडे शिलालेख

२.५ ताम्रपट व शिलालेखांच्या अभ्यासाचे महत्त्व

२.६ समारोप

२.७ संदर्भ

२.८ पूरक वाचन

२.९ प्रश्नावली

## २.१ उद्देश

- प्राचीन मराठी ही संकल्पना समजून घेणे
- प्राचीन मराठी भाषा व साहित्याचे स्वरूप लक्षात घेणे.
- प्राचीन मराठीची वैशिष्ट्ये समजून घेणे.
- ताम्रपटांच्या अभ्यासाचे महत्त्व विचारात घेणे.
- शिलालेखांचा अभ्यास आकलनात घेणे.

## २.२ प्रस्तावना

कोणत्याही भाषेच्या अभ्यासात इतिहासाला अनन्यसाधारण महत्त्व असते. भाषेचा इतिहास आपल्याला त्या भाषेची परंपरा सांगतो, तिच्यातील बदल अधोरेखित करतो, महत्त्वाची गोष्ट म्हणजे काळाच्या टप्प्यांवर भाषा कशी बदलत, विकसित व वृध्दिंगत होत गेली याचा आलेख भाषेच्या इतिहासात छायांकित झालेला असतो. मराठी भाषेचा इतिहास उज्ज्वलशाली आहे. त्यामध्ये मराठी भाषेचा उद्गम व विकास आलेला आहे. प्राचीन काळात मराठी भाषेमधून मोठयाप्रमाणात लेखन झाले. अनेक ग्रंथसंपदा निर्माण झाली. हे सर्व साहित्य मराठी भाषेच्या इतिहासातील महत्वाचे दस्तऐवज आहेत. याबरोबरच प्राचीन काळातील अभ्यासकांनी ताम्रपट व शिलालेखांच्या माध्यमातून मराठीला मुद्रांकित केलेले आहे. त्यामुळे ही मराठी भाषेच्या इतिहासातील महत्त्वाची संदर्भ साधने आहेत. त्यांना ऐतिहासिक महत्त्व आहे. प्रस्तुत घटकांमध्ये आपण प्राचीन मराठीचे स्वरूप व तिची वैशिष्ट्ये लक्षात घेणार आहोत. त्याबरोबच प्राचीन शिलालेख व ताम्रपटांचा अभ्यास करणार आहोत. हा संबंध भाग प्राचीन मराठी भाषेच्या इतिहासाचा अभ्यास करताना महत्त्वाचा ठरणारा आहे.

## २.३ प्राचीन मराठीचे स्वरूप व वैशिष्ट्ये

मराठी भाषेच्या इतिहासात प्राचीन कालखंड हा महत्त्वाचा आहे. या काळाला 'मध्ययुगीन काळ' असेही म्हटले जाते. मराठी भाषेच्या दृष्टीने हा काळ भरभराटीचा होता. या काळात मराठीतून मोठया प्रमाणात लेखन झालेले आहे. विशेषत: महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात महत्त्वाचे असलेले विविध संप्रदायांच्या माध्यमातून झालेली मराठी साहित्यनिर्मिती ही मराठी भाषेला समृध्द करणारी ठरली. यातून मराठी भाषेची विविधांगी रूपे आविष्कृत झालेली आहेत. अलिखित साहित्यापासून लिखित रूपातील गद्य, पद्य लेखन यात अनुस्यूत आहे. प्रस्तुत ठिकाणी आपण प्राचीन मराठीचा स्वरूपविचार विस्ताराने लक्षात घेणार आहोत. तसेच प्राचीन मराठीची वैशिष्टये सुध्दा तपासणार आहोत.

### २.३.१. मराठीचा उदगम आणि विकास :

मराठी ही अभिजात भाषा आहे. तिला हजारो वर्षांची परंपरा आहे. मौखिक आणि लिखित अशी दोन्ही भाषिक आविष्कारातून मराठीचा विकास झालेला आहे. प्राचीन मराठीच्या अभ्यासात मराठी भाषेच्या उदयासंदर्भात विविध मतमतांतरे आहे. काही अभ्यासक मराठीचा उगम संस्कृत मधून झाला आहे असे मानतात. यासाठी संस्कृत शब्द, व्याकरण व परंपरेचा आधार दिला जातो. तर मराठी ही संस्कृतोद्भव भाषा नसून ती प्राकृत भाषांमधून उत्क्रांत होत आलेली भाषा आहे. असे काही भाषाचिंतकांचे मत आहे. या दोन्ही मतांविषयी अभ्यासकांनी आपल्या भूमिका विस्ताराने मांडलेल्या आहेत. वास्तविक मराठी भाषेचा उगम हा भाषिक  उत्क्रांतीवादातून झालेला आहे. त्याला सामाजिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक संदर्भ आहेत.

कृ. पा. कुलकर्णी यांनी आपल्या "मराठी भाषा : उद्गम आणि विकास" या महत्त्वपूर्ण ग्रंथामध्ये मराठी भाषेच्या इतिहासाविषयी अत्यंत मौलिक मांडणी केलेली आहे. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत त्यांनी या समग्र ग्रंथाचे सार विशद केलेले आहे. ते लिहितात, "मराठी भाषेच्या स्वभावाची ऐतिहासिक व शास्त्रीय अशी पाहणी करून  व त्यासंबंधी पौर्वात्य व पाश्चात्य विद्वानांनी केलेले संशोधन जमेत धरून मी माझ्या सिध्दांतांची मांडणी केली आहे". ह्या ग्रंथातील विषय सात प्रकरणात विभागला आहे. मराठी व इतर आधुनिक बोली ह्यांच्या अध्ययनास जरूर असणारी भाषाशास्त्राची सामान्यतत्त्वे पहिल्या प्रकरणात सांगितले आहेत. दुसऱ्यात मराठीच्या उद्गमाच्या पूर्वीची तिची पूर्वपीठिका दिली आहे. गोदावरी नदीचा उगम दिसला तरी गौतम ऋषीने जटा ज्या ठिकाणी आपटल्या ते पवित्र तीर्थ पाहून त्याचे दर्शन घेतल्याखेरीज पर्यटनाचे पुण्य लाभत नाही. तद्वत मराठी भाषा मंदाकिनीच्या उगमाच्या पूर्वीच्या पूर्ववैदिक, वैदिक, संस्कृत, पाली, प्राकृत, अपभ्रश ह्या अवस्था मधून तिचे मूळ शोधण्याखेरीज मराठीचे संशोधन पुरे होत नाही. ह्यांतील पूर्ववैदिक भाषेचा भाग पाणिनीय सूत्रे, आधुनिक भाषांचा स्वभाव व लॅटिन लिथ्यूनियमन वगैरे पुराण पाश्चात्य भाषा ह्याच्या साहित्यामधून मिळणाऱ्या आधारावर उभारला आहे. प्राकृत भाषांचे स्वभावविशेष वररूचि, चड, लक्ष्मीधर, हेमचंद्र, मार्कण्डेय इत्यादींच्या व्याकरणानांना अनुसरून देऊन पुनप्रत्यक्ष प्राकृत वाङ्मयात आढळून येणारे त्यांचे स्वभावविशेष दिलेले आहेत. मराठीच्या आंतर व बाह्य घटनेत प्रत्येक प्राकृतचे अंग कितपत आहे हे उदाहणासह दाखवून तिला जन्म देण्याचे श्रेय कोणत्याही एका प्राकृतच्या वाटयास न येता मराठी भाषा सर्व प्राकृत

भाषांच्या व त्यातल्या त्यात महाराष्ट्री व अपभ्रश ह्यांच्या मिश्रणाने इ.स. ५००–७०० च्या दरम्यान अशी उद्भवली हे तिसऱ्या प्रकरणात सांगितले आहे. (प्रस्तावना)

कृ.पा. कुलकर्णी यांच्या वरील विवेचनाचा सार म्हणजे मराठी ही संस्कृतोद्भव भाषा नाही. तर प्राकृत भाषा संकुलातून तिचा उदय झाला आहे. राजारामशास्त्री भागवत यांनी आपल्या प्राकृत प्रकाश या ग्रंथामध्ये प्राकृत भाषांना भारतातील मूळ भाषा म्हटलेले आहे. प्रकृतीने निर्माण केलेली ती प्राकृत होय. त्या देशी भाषा होत्या. मराठी ही सुध्दा देशी भाषा आहे. या अंतिम निष्कर्षापर्यंत आपण येऊ शकतो.

मराठी भाषेच्या संदर्भात महाराष्ट्री या भाषेचा उल्लेख वरती कृ.पा.कुलकर्णी यांनी केलेला आहे. यातून महाराष्ट्र या भूप्रदेशाविषयीचा संदर्भ अधोरेखित होतो. महाराष्ट्र आणि मराठी यातील ऋणानुबंध प्राचीन आहेत. अ.ना. देशपांडे यांनी 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग १ पूर्वार्ध' या ग्रंथामध्ये महाराष्ट्राच्या इतिहासात मराठी भाषेचा झालेला विकास विस्ताराने विशद केलेला आहे. त्यांनी महाष्ट्राला अवैदिकांची भूमी म्हटलेले आहे. त्यास दक्षिणपथ असेही म्हटले जाते. मरहट्ट, महारठी असा महाष्ट्राच्या उत्पत्तीचा विचार केलेला आहे. विशेषत: महाराष्ट्राच्या इतिहासातील प्रागैतिहासिक व ऐतिहासिक घटनांची मांडणी करत मौर्यकाल, सातवाहन, शकक्षत्रप, रोमन संस्कृती, वाकाटकांचा प्रभाव, पुलकेशी, राष्ट्रकुट यापासून यादव कालखंडाचा आढावा घेत मराठी भाषेचा विकास मांडलेला आहे. (पृ. १०७ ते २४९) यादव कालाविषयी मार्मिक भाष्य करताना ते लिहितात, "या राजवटीतच मराठीचे वाङ्मय निर्मितीचे पहिले तेजस्वी स्फुरण प्रकट झाले (१७४) प्राचीन मराठीचा विचार करताना यादवकालीन साहित्य अतिशय महत्त्वाचे आहे. त्यामध्ये गद्य आणि पद्य लेखनाचा विचार करणे अगत्याचे ठरेल.

### २.३.२. प्राचीन मराठी पद्य लेखन

प्राचीन मराठीचा विचार करताना या कालखंडातील पद्य लेखन सर्वप्रथम विचारात घ्यावे लागते. कारण प्राचीन मराठीतील बहुतांश लेखन हे काव्यात्म रूपात प्रकट झालेले आहे. प्राचीन मराठी काव्यामध्ये आद्यकवी म्हणून मुकुंदराज यांना ओळखले जाते. विवेकसिंधू ही त्यांची काव्यनिर्मिती अध्यात्मिक व भाषिकदृष्ट्या महत्त्वाची आहे. विवेकसिंधूमधील भाषेविषयी अ.ना. देशपांडे लिहितात, विवेकसिंधू हा ग्रंथ शके ११११० इतका प्राचीन मानल्यास त्यातील भाषेत जाणवणारी अर्वाचीनता आड येते, असा एक आक्षेप घेण्यात आलेला आहे. प्राचीन मराठीतील बहुतांश ग्रंथांवर, अनेक नकलकारांच्या हातून जाता जात अर्वाचिनीकरणाचे थोडेफार संस्कार झालेले आहेत; आणि हे संस्कार होणे अर्थ  हा ही आहे. या संस्कारांची झळ विवेकसिंधूलाही पोहोचलेली आहे, त्यांच्या लोकप्रियतेमुळे ही झळ त्याला जास्त प्रमाणात लागलेली असणे शक्य तरीसुद्धा त्याच्या प्राचीनत्वाची ग्वाही देता येईल इतकी प्राचीन मराठी अभ्यासकांना विवेकसिंधूत सापडलेली आहेत. श्री. रा. बि. बोबडे यांनी संपादिलेल्या 'विवेकसिंधू'ला लिहिलेल्या प्रस्तावनेत प्रा. डोळके यांनी विवेकसिंधू ज्ञानेश्वरकालीन भाषाविशेष आढळतात हे साधार दाखवून दिलेले आहे कृ.पा.कुलकर्णी यांनीही आपण स्वतः संपादिलेल्या विवेकसिंधू 'च्या प्रस्तावनेत विवेकसिंधूतील भाषेच्या व्याकरणिक स्वरूपाचा सोदाहरण उलगडा केलेला आहे त्याचे

प्राचीनत्व पटवून दिलेले आहे. पुन्हा विवेकसिंधूतील 'ओवी' ही महानुभावी ग्रंथ, ज्ञानेश्वरी वगैरे ग्रंथातील ओवीप्रमाणे साडेतीन चरणी ओवी आहे'

विवेकसिंधूच्या प्राचीनत्वाची गमक म्हणून सांगितलेली आहे. या प्राचीनत्वाच्या पुराव्यातून 'विवेकसिंधू' ज्ञानेश्वरकालीन आहे एवढेच सिद्ध होते. त्याचे ज्ञानेश्वर- पूर्वकालीनत्व सिद्ध होत नाही हे लक्षात घेणे आवश्यक आहे. रूढ समजुतीप्रमाणे मुकुंदराज व ज्ञानेश्वर यात निदान शंभर वर्षांचे तरी अंतर आहे; प्राचीनत्वाचा उपरोक्त भाषिक पुरावा या अंतराचे निराकरण करण्यास असमर्थ आहे. याशिवाय श्री. ह. ना. नेने यांनी (म. सा. पत्रिका, अंक १०५) विवेकसिंधु व परमामृत यात आढळणाऱ्या 'पाहिजे आणि जाणिजेस' या दोन रूपांच्या प्राचीनत्वाबद्दल जी शंका घेतलेली आहे तीही विचारात घेणे आवश्यक आहे. ही रूपे ज्ञानेश्वरोत्तर कालातील आहेत असे त्यांनी सुचविलेले आहे. (पृ. ३०६)

मुकुंदराजोत्तर काळात महानुभावी वाङ्मयाचे पर्व अतिशय महत्त्वाचे आहे. श्री चक्रधर स्वामी यांनी स्थापन केलेला 'महानुभाव' हा ऐतिहासिक संप्रदाय आहे. महानुभावींनी भारतीय दर्शन परंपरेत नव्या तत्त्वांची मांडणी केली. समग्र महानुभावी वाङ्मय मराठी भाषेच्या इतिहासातील महत्त्वाचा दस्तऐवज आहे. यामध्ये पद्य आणि गद्य अशा दोन्ही प्रकारातून लेखन झालेले आहे. यात 'लीळाचरित्र', 'दृष्टांतपाठ', 'सूत्रपाठ', 'मूर्तिप्रकाश', 'स्मृतिस्थळ', 'महदंबेचे धवळे' तसेच 'सातीग्रंथ' म्हणून ओळखले जाणारे 'शिशुपाल वध', 'उध्दवगीता', 'वछाहरण', 'रक्मिणीस्वयंवर', 'सह्याद्रीवर्णन', 'ज्ञानप्रबोध', 'ऋध्दिपूर वर्णन' हे ग्रंथ अतिशय महत्त्वाचे आहेत. श्रीचक्रधरस्वामी व त्यांच्या महानुभावी साहित्यसाधनेचे वेगळेपण म्हणजे यामधून आलेली मराठी भाषा होय.

महानुभावी साहित्याच्या मौलिकतेविषयी अ.ना.देशपांडे यांनी विस्ताराने आढावा घेतलेला आहे. ते लिहितात, "तेरावे शतक हे स्थूलमानाने, उपलब्ध साहित्यावरुन पाहता, मराठीतील वाङ्मयनिर्मितीचा प्रारंभिक काळ, पण हा प्रारंभकाल असला तरी तो परिपक्वता, प्रौढता, पारमार्थिकता या गुणांच्या देदीप्यमान प्रकाशाने उजडून निघालेला आहे. त्यानंतर सहा-साडेसहा वर्षे झाली, पण तेराव्या शतकातील मराठी वाङ्मयात जी तेजस्विता, जी परिणामकारकता, जी परमतत्वसंबंधित भावघनता एवढया भव्य व उत्कट स्वरूपात प्रकट झाली ती आजतागायत अजोड राहिलेली आहे. तेराव्या शतकातील मराठी भाषेच्या वाङ्मयीन वैभवाच्या निर्मात्यात परमार्गातील नरेंद्र, भास्कर, केसोबास, दामोदरपंडित नारायण पंडित, महाइंभट यांचे स्थान फार वरचे आणि मानाचे आहे. परमार्गाने मराठी शारदेच्या ती उदयोन्मुख अवस्थेत असतानाच, कथनात्मक खंडकाव्य उदाहरणार्थ रुक्मिणीस्वयंवर, वर्णनात्मक खंडकाव्य (उध्दवगीता), स्फुट पदे (देमाइसेने रचलेले पद), चरित्र (लीळाचरित्र) (दृष्टान्त पाठातील स्फूट कथा), व्याकरण प्रकारांची मौल्यवान लेणी अर्पण केलेली आहेत. यावरून मराठी भाषेची व मराठी शारदेची सेवा करण्याकरिता परमार्थाने अवतरत असे अनुमान काढले मात्र हे चूक आहे. आधुनिक काळातील प्राचीन मराठी वाङ्मयाचे अभ्यासक हे परमार्थाने, म्हणजेच महानुभाव पंथाने मराठीची जी सेवा केली तिचा प्रमाणाबाहेर तारतम्य सोडून उदो उदो करीत असतात. श्रीचक्रधर आणि त्यांचा परमार्थ हे मराठी माषेचा उद्धार करण्याकरिता अवतरलेले नसून जीवाचा उद्धार करण्याकरिता, जीवाला मोक्षाभिमुख बनविण्याकरिता अवतरलेले आहेत. हे लक्षात घेणे फार आवश्यक आहे! भाषा हे केवळ साधन आहे तिचे स्थान अत्यंत गौण आहे. जीवाचा

उद्धार आणि त्यासाठी विरक्तियुक्त भक्तीचा ईश्वराला सर्पसंगपरित्यागपूर्वक अनन्यभावे शरण जाण्यासंबंधीचा प्रचार ही महत्वाची गोष्ट आहे. (पृ. ५०४)

प्राचीन मराठीच्या विकासात वारकरी संप्रदायाची भूमिका सुध्दा अतिशय महत्त्वाची आहे. संत ज्ञानेश्वर यांचे मराठी भाषेच्या उत्थानासाठी निर्णायक होते. त्यांनी संस्कृत भाषेच्या बंधणातून भक्तीविचाराला मुक्त करून 'माझ्या मऱ्हाटीचीये बोलु कौतुके' म्हणत मराठी भाषेला वैभव प्राप्त करून दिले. संत नामदेव, संत तुकाराम आणि संत एकनाथ यांनी आपल्या अभंगातून मराठीची विविधांगी रूपे मांडलेली आहेत. एकूणच मराठी भाषेच्या विकासात वारकरी संप्रदायाचे योगदान मौलिक स्वरूपाचे आहे. संबंध वारकरी साहित्य ओवी, अभंग, भारुडे, गौळणी अशा विविध रूपांमधून आविष्कृत झालेले आहे. यातील भाषारूपे बोली, देशी शब्दरचनांनी समृध्द झालेली आहेत.

### २.३.३. प्राचीन मराठी गद्य लेखन

प्राचीन मराठी भाषेचे स्वरूप अभ्यासतांना दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे प्राचीन गद्य वाङ्मय होय. या मराठी गद्याचे विशेष म्हणजे तत्कालीन समाजदर्शनाबरोबरच भाषिक रूपाचे दर्शन यामधून प्रभावीपणे झालेले आहे. याविषयी डॉ. शं.गो. तुळपुळे यांनी आपल्या प्राचीन मराठी गद्य या ग्रंथामध्ये विस्ताराने मूलभूत मांडणी केलेली आहे. ते लिहितात, प्राचीन मराठी वाङ्मय प्रामुख्याने पद्यमय असले तरी त्यातील गद्य उपेक्षणीय सचित नाहीं. त्याचे स्वरूप मात्र पद्याहून काहीसे भिन्न आहे. एकंदरीतच पद्य हे कल्पनारम्य, तर गद्य हे वास्तव किंबहुना व्यावहारिक असते असा सर्वसाधारण नियम आहे. प्राचीन मराठी साहित्य या नियमास अपवाद नाही. त्यातील गद्यकारांत ज्ञानेशमुक्तेशांच्या प्रतिमेची भरारी आढळत नसली तरी प्राक्कालीन महाराष्ट्राच्या सामाजिक मनाचा ठाव घेण्याच्या कामांत कोणताही पद्यकार त्यांची बरोबरी करू शकणार नाही. हे प्राचीन गद्य म्हणजे महाराष्ट्राचा जणू चालताबोलता इतिहासच आहे. मराठी मनाची सुखदुःखें, त्याचे रागलोभ, आशा-आकांक्षा ही सर्व त्यात जशीच्या तशी उमटली आहेत. स्वकालाचे यथार्थ दर्शन घडविण्याचें जें कार्य वामन-मयूरासारख्या शब्दसृष्टीच्या ईश्वरांनाही जमले नाहीं ते एखादा रघुनाय यादव आपल्या कलमाच्या अवघ्या दोनचार फटकाऱ्यांत साधू शकतो हा त्या गद्याचा मोठाच विजय म्हटला पाहिजे. प्राचीन पद्याच्या मानाने या गद्याची उंची कदाचित कमी भरेल, परंतु त्याचा व्याप मोठा असून त्याचें सर्वस्पर्शीत्व असाधारण आहे यात काहीच शंका नाही.(तुळपुळे, प्रस्तावना पृ.१)

प्राचीन मराठीचा विचार करताना गद्यलेखनाचे कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. यातील साहित्यनिर्मिती मूलभूत स्व्रूपाची आहे. यातील काही संदर्भांची मांडणी करताना तुळपुळे यांनी मार्मिक विवेचन केलेले आहे. ते लिहितात, "प्राचीन मराठी गद्याचे प्रथम दर्शन आपणांस म्हैसूरप्रांती श्रवण-बेळगोळवाररूपा महाराष्ट्रापासून अति दूर अग्रा ठिकाणी योगायोगच म्हटला पाहिजे, शके ९०५ मधील श्रवणबेळगोळ शिलालेख हा आद्य मराठी लेख म्हणून सर्वमान्य होण्यास हरकत नाही. ज्या भव्य अशी शिल्पाच्या पायथ्याशी तितकीच भव्य अशी ही मराठी' श्री खोदली आहे तो गोमतेश्वराचा पुतळा आज हजार वयं सर्वांचे अहोरात्र स्वागत करीत तसाच उभा आहे" (क१). पाटण शिलालेखाचे महत्व ऐतिहासिक व सामाजिक असे दुहेरी असून प्रसिद्ध ज्योतिषी भास्कराचार्य यांच्या वंशावर या

लेखाने चांगलाच प्रकाश पडतो. (फ.२) तासगांव ताम्रपटात येणारी 'वालगवाड' आणि 'हधिनौर' हीं दोन ग्रामनामें उघड कन्नड वळणाचीं असून १३ व्या शतकांत साता-याच्या दक्षिण सीमाप्रांतात कानडी भाषा अवशेषरूपानें वावरत असल्याची ही एक साक्षच होय. (क्र.३) पंढरपूर येथील विठ्ठल मंदिराच्या जीर्णोद्धार प्रसंगानें निर्माण झालेल्या व पांढरी फडमुख्य प्रौढप्रतापचक्रवर्ती श्रीरामदेवराव यादव आणि त्याचा विद्वान करणाधिप हेमाद्रि यांच्या भागवतनिष्ठेचें सूचक अशा 'चौऱ्यांयशी' च्या शिलालेखाचें मोल इतिहासास केवढें आहे हें निराळे सांगणे न लगे (क्र.४) यादवांच्या धर्मनिष्ठ राजकीय परंपरेची ओळख करून देणारें म्हणून वेळापूरचें शिलालिखितहि महत्वाचें आहे (क्र.५) वरील सर्व लेख शके ९०५ ते शके १२२२ मधील म्हणजे स्थूलमानानें यादवांच्या काळातील आहेत. त्यातील भाषा संस्कृतमिश्रित मराठी व लिपी देवनागरी आहे; मोडी नाहीं. चौदाव्या शतकाच्या अखेरपर्यंत मोडी लेख उपलब्ध होत नाही हे कै. राजवाड्यांचे म्हणणे या दृष्टीनें चिंतनीय आहे. राजवाडे म्हणतात त्याप्रमाणे, “मोडी लिपीचा फारसींतील शिकस्ता पद्धतीशीं व हेमाडपंताच्या नावाशी संबंध असो वा नसो, मोडी लिपी काहींशी उत्तरकालीन आहे हें निश्चित”. असो. वरील शिलालेखांशिवाय याच काळातील आणखी पाचपंचवीस लेख उपलब्ध असून ते ‘पळसदेव’, ‘सावरगांव’, ‘तेर’, ‘परळ’, ‘देऊळगांव’, ‘खोलेश्वर’, ‘नेवासें’, प ‘उनकेश्वर’, ‘नागांव’ इत्यादी गावी म्हणजे साऱ्या महाराष्ट्रभर विखुरलेले त्या आहेत. एक बाब विचारणीय वाटते. तेर, गोमंतक, मंडळ, चिक्कंवागेवाडी व मंगळवेढे या पांच ठिकाणच्या काही लेखांतून भाषा तर मराठी लिपी ते कानडी, व भाषा कानडी तर लिपी देवनागरी असा प्रकार दिसून येतो. याचा अर्थ एक तर यादवकालीन महाराष्ट्राच्या सीमा आजच्याहूने भिन्न तरी असाव्या, इ. किंवा पंढरीच्या वाळवंटांत एका भागवतधर्माच्या छत्राखालीं मराठी आणि कानडी या दोन संस्कृती एकवटून तरी गेल्या असाव्या. ते कसेही असो, वरील सर्व लेख मिळून यादवकालीन राष्ट्राचें विविध दर्शन घडवितात यात संशय नाही. त्यांत देशाचा इतिहास, भूगोल, दान, धर्म, शासनरीती, 'उद्योग, ‘व्यापार’ सर्वकाहीं प्रतिबिंबित आहे. हे लेख जीर्ण, तुटकेफुटके, व भाषादृष्ट्या अशुद्ध वा अपभ्रष्टही असतील; पण संशोधकाच्या दृष्टीने त्यांचे हे दोषच गुणवत ठरून ते इतिहासाचें अक्षर असे साहित्य होऊन बसते. पण संशोधकास अमोल वाटणारा शिला-ताम्रलेखांचा हा ठेवा रसिकांचे समाधान करू शकणार नाही. त्यांच्यासाठी काही रसात्मकच हवे व ते पुरविण्यास महानुभाव गद्यकार सिद्ध आहेत. चरित्र, आठवणी, दिनचर्या, तत्त्वचर्चा, दृष्टांतपाठ इत्यादि साहित्याच्या नानाविध प्रकारांनी संपन्न असे हे यादवकालीन गद्य क्वचित प्रसंगी रसाळपणात पद्यासही मागे टाकते. जे काही लिहावयाचे ते स्त्रीशूद्रादि सर्वांना सुलभ व्हावे म्हणून मराठीतच लिहावे असा या पंथाचा संकेत होता व त्यानुसार ही अमोल अशी गद्यनिर्मिती त्याने केली. केसोबासांनी उद्धरण-प्रकरण संस्कृतमध्यें रचण्याची इच्छा व्यक्त केल्यावरून "नको गा केशवदेया, येणें माझिया म्हातारिया नागवतील”? असे म्हणून नागदेवाचार्यांनी त्यांस संस्कृत रचनेकडून परावृत्त केल्याचे प्रसिद्धच आहे (स्मृतिस्थळ,१५) अन्य प्रसंगी केसोवासांनी संस्कृतमध्ये प्रश्न केल्यावरून नागदेवाचार्य त्यांना स्पष्टपणे म्हणाले, "पंडिता केशवदेया, तुमचा अस्मात कस्मात मी नेणें गा। मज - श्रीचक्रधरें निरूपिली मऱ्हाटी तियांचि पुसा" (स्मृ. ६६) महानुभाव - पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर यांनी स्वतः एक ओळही लिहिलेली नाही. त्यांच्या अनुयायांनों मात्र 'सर्वज्ञां' ची भावना ध्यानांत घेऊन 'मार्गासि उपयोगा जाईल' या बुद्धीने त्यांचे बोलणे 'काळाक्षरीं प्रतिपन्न' करून ठेवलें." शास्त्र घेइजे, घोकिजे, मग काळेकरूनि उपयोगा जाए" असा खुद्द

चक्रधरांचा सिद्धांत होता, व त्यास अनुसरून प्रथम म्हाइंभटांनी इ. स. १२७६ च्या सुमारास सर्वज्ञांच्या 'लीळाचरित्रा' ची रचना केली. या कामी या आद्य मराठी चरित्रकारानें अति श्रम घेतलेले दिसतात. 'स्मृतिस्थळ' कार लिहितात, "खेइभट कृषी करावेया जाति, त्यांसरिसे म्हाइंभटहि जाति । खेइभट कृषीकर्म करिती, आणि म्हाइंभट तया मागां, मागां गोसावियांचिया लीळा पुसति । खेइभट सांघति, म्हाईंभट नमस्करूनि. घेति" (स्मृ.१४०). याप्रमाणे एकेक आठवणीची अक्षरशः भीक मागून म्हाइंभटांनी प्रथम श्रीचक्रधरांचे 'लीळाचरित्र' व पुढे श्रीगोविंदप्रभूचे ऋद्धिपूरचरित्र सिद्ध केले.

नरेंद्र आणि परशराम या दोघांनी मिळून इ. स. १३०८ च्या सुमारास रचिलेला स्मृतिस्थळ' हा ग्रंथही याच धर्तीचा असून त्यात पंथाचे आद्याचार्य नागदेव किंवा भटो-बास यांचें चरित्र आठवणींच्या रूपाने आले आहे. 'स्मृतिस्थळा'चा आणखी एक विशेष हा, कीं त्यात आघाडीच्या महानुभाव ग्रंथकारांची माहिती मिळते व त्यामुळे हा ग्रंथ वाङ्मयेतिहास दृष्ट्याही बहुमोल ठरतो. 'लीळाचरित्र' 'गोविंदप्रभुचरित्र' व 'स्मृतिस्थळ' हे तीनही ग्रंथ स्थूलमानानें सम-स्वरूप असून त्यात अनुक्रमे चक्रधर, गोविंदप्रभु व नागदेवाचार्य यांचा जीवनचित्रपट स्मृतिरूपानें रंगविलेला आहे. त्या त्या चरित्रनायकाच्या आवडीनिवडी, आचारविचार, बोलणीबसणी ही सर्व आठवणींच्या रूपाने सांगणारे हे चरित्र- ग्रंथ म्हणजे यादवकालीन गद्याचा आदर्शच होय. गद्यरूप असले तरी त्यात काव्य विपुल आहे. त्यातील भाषा साधीसुधी व 'मऱ्हाठी' वळणाची असून त्यात पांडित्याचे प्रदर्शन अगदी नाही. मराठी वाक्प्रचारांच्या दृष्टीनेही हे प्राचीन गद्य संपन्न आहे. 'बीजें करणें, पहुड स्वीकारणें, वास पाणें, पाणि- पात्र करणें, आंगणीं वेढे करणें, न्याय सांगणें, भिक्षा करणें, हाकारा येणें, वेकास जाणें, जाणीव सांगणें, साउमे येणें, बाहे आफळणें, देह तुटणें, वैसकार देणें' इ. अनेक वाक्प्रचार या चरित्रग्रंथांतून भेटतात. त्यात आढळणारे ' मासापाखां, मासादीसां, बाहिरवाहिरीं, घे-दे, वेचवेचूं, उलथउलथू, मर्दनामादणें, चीरचोळीं' यासारखे जोडशब्दही मोठे वेधक वाटतात. मधूनच "अहो दुष्टें गांजिलें तें रायापुढें सांघिजें, आणि रोगें अडिलें तरि वैद्यापुढे सांधिजे" यासारखी सुंदर म्हण डोळयांपुढून चमकून जाते. या गद्यांतील प्राचीन शब्दभांडारास तर मोलच नाहीं इतके ते विपुल आणि समृद्ध आहे. तसेच ते सरसही आहे. गोविंदप्रभूच्या निधन- समयी 'माझे माहेर गेलें' असे म्हणून शोक करणारी त्यांची लेक पाहून म्हाइंभटाप्रमाणे आपलेही 'हृदयस्फुट' होते व त्यातील कारुण्याने आपणही क्षणभर कासावीस होतो. (क्र.८-५) 'गोसावियांचा व्यापार मा चालवितां कोणा माझें वेकास गेलें असेल, तरि तुम्हीं समस्ती क्षेमा करावी सा असें म्हणून देह ठेवणाऱ्या भटोबासांचें शब्दचित्र आपणांस व्याकुळ करतें पां (क्र.९-१). तुम्हां जरि देवो नव्हे, तरि कोणाहि देव नव्हे' हें नागदेवाची आश्वासन ऐकून म्हाइंभटाविषयीचा आपल्या मनातील आदर शतपट होतो. (क्र. ९७) विरक्त चक्रधरांचे चित्रही असेंच हृद्य आहे (क्र. ७-३). तात्पर्य, भाषा आणि भावना अशा दोन्ही दृष्टींनी हे चरित्रग्रंथ अति थोर आहेत. लीळा किंवा आठवणी सांगता सांगता त्या त्या महात्म्याचें चारित्र्य सहज वठविण्याची या ग्रंथ- कारांची हातवटी काही विलक्षण आहे. असो. भावेदेव व्यासकृत 'पूजावसर' हा महानुभावांचा दुसरा एक गोड गद्य ग्रंथ थोडा निराळया स्वरूपाचा आहे. त्यात चक्रधरांची दिनचर्या सूक्ष्मपणे दिलेली असून यादवकालीन मराठी समाजाच्या चालीरीतीचे सम्यकदर्शन घडविण्यास ती समर्थ आहे. 'परस्यात- पाहारीं' म्हणजे झुंजूमुंजू होतांच उठणें, कवाडाची खिळी फेडणें, चरणीं 'उपानी' म्ह. वहाणा घालून परिश्रयास जाणें, 'ऊष्णोदकाच्या तांबतौली' नें हातपाय धुणें, मुखमार्जनाच्या वेळीं

आंब्याच्या, जांभळीच्या किंवा कधीं बोरीच्या दोन सीलिका म्ह. काड्या घेऊन त्यांतील एकीनें 'दंतधावन' करणें व दुसरी धनुष्याकार वळून तिनें 'जिव्हामळ आर्काखणें', स्नानोत्तर 'आंगी- टोपरें' चढविणें, कणीक तिबून, तांदुळे भिजत घालून तूपभात, निंबलोण, साकवतिया म्ह. भाज्या, कानवडा, मांडा इ. सिद्ध करून 'आरोगणा' करणें, भोजनोत्तर 'गुळळा' करून 'सकर्पूरा फोडीं' नीं मुखशुद्धि करीत 'आरोग्य- बाउली' म्ह. शतपावली घालणें, नंतर घटकाभर पडून झाल्यावर कांहीं-'धर्मवार्ता' करणें, याप्रमाणें भावेदेव व्यासांनी सूक्ष्मपणें टिपलेली चक्रधरांची दिनचर्या पाहिली म्हणजे यादवकाल आणि वर्तमानकाल यातील - उण्यापुऱ्या सहाशें वर्षांचें अंतर नाहीसे होऊन सामाजिक चालीरीतींचे सातत्य ध्यानात येते (क्र.१०) चक्रधरोक्त 'सूत्रपाठा' सारख्या तात्त्विक ग्रंथाचें -स्वरूप याहून निराळे आहे. हा 'सूत्रपाठ' म्हाइंभटकृत 'लीळाचरित्रां' तून प्रथम केसोवायासांनी इ. स. १२८० च्या सुमारास संकलित केला. त्यातील उक्ति मूळच्या चक्रधरांच्या असल्या तरी त्या लेखनिविष्ट करण्याचे श्रेय म्हाइंभट व केसोबास या दोघांकडे जाते. सूत्रांतील अल्पाक्षररमणीयत्व पाहण्यासारखे आहे. प्रस्तुत आचारविषयक सूत्रांवरून चक्रधरोक्त नीति-शास्त्राची व संन्यासमार्गाची कल्पना चांगली येते. स्वदेश-स्वग्राम ही त्याज्य मानून, महाराष्ट्रों भिक्षावृत्तीनें राहून, एषणात्रय त्याजून, आवडीनिवडी बाजूस सारून, पोटाची खळगी घृणात्यागपूर्वक रेंद्याचेंद्यानें भरून, साधी कोपरदुटी पांघरून, हाती काडीहि न धरितां किंवा चित्रींचीहि स्त्री न पाहतां, 'अनु-सरलेयाचा देवो' हे ओळखून शयनासनीं वा भोजनी एका परमेश्वराचे चिंतन करीत 'झाडातळीं जन्म क्षेपावें,' हा चक्रधरांचा उपदेश थोडा एकांतिक तर खराच; पण त्यातही एक प्रकारची पारमार्थिक निष्ठा आहे, व ही निष्ठा 'सूत्रपाठां' तून बरोबर व्यक्त होते. पाठाची भाषासरणीही तात्त्विक विवेचनास साजेल अशीच आहे. (क्र. ११) 'दृष्टांतपाठा' तील मूळ सूत्रे व त्यावरील दृष्टांत ही चक्रधरोक्त असून त्यातील दृष्टांतिक तेवढे केसोबासांचे आहे. हा फरक भाषासरणींतही जाणवतो. सूत्रांची व त्यावरील दृष्टांतांची भाषा चक्रधरी वळणाची म्हणजे साधी, सोपी व सुटसुटीत असून दृष्टांतांची भाषा पंडिती थाटाची आहे. मराठी भाषेस हे पंडिती वळण प्रथमः केसोबासांनी लाविले, हा त्यांचा एक प्रकारे गौरवच होय. त्यांच्या भाषेत चक्रधरांच्या वाणीतील जिवंतपणा जरी नसला तरी अंगच्या पांडित्याने व गांभीर्याने तीही उठून दिसते. चक्रधरोक्त तत्त्वज्ञान विद्वानांना रुचेल अशा रीतीने मराठीत मांडणे व अध्यात्मासारखें शास्त्र पेलण्यास समर्थ अशी शब्द- संपत्ति मराठीत रूढ करणे हे केसोबासांचे महत्कार्य होय. या दृष्टीने ते प्राचीन मराठी गद्याचे आद्याचार्य ठरतात. शास्त्रीय परिभाषा मराठीत रूढ करून तिचे वाग्बल वाढविण्याचे सर्व श्रेय केसोबासांकडे जाते किंवा जावे. त्यांनी घालून दिलेल्या पद्धतीवर पुढे महानुभाव पंडितांनी अनेक स्थळे म्ह. भाष्य, बंध म्ह. महाभाष्ये, विधायके, लापिका, व्याख्या, परीक्षा, इत्यादि विविध गद्य ग्रंथ निर्माण केले असून ते सर्व तार्किक स्वरूपाचे आहेत. महानुभावीय वाङ्मय अशा टीपग्रंथांनी अत्यंत समृद्ध आहे. एक 'दृष्टांतपाठ' घेतला तर त्यावर पांचपन्नास विवरणात्मक ग्रंथ आढळतात. पंडिती वळणाचे हे मराठी साहित्य खंडनमंडनकौशल्यात किंवा केशविच्छेदनात तत्सम अशा संस्कृत साहित्यास कदापि हार जाणार नाही. 'संस्कृताचा रंग देशी भाषेच्या पिचकारींत भरून' हे मानभाव पंडित जो तर्काचा खेळ खेळले आहेत तो एकवार पाहण्यासारखा आहे. नमुना म्हणून आचारसूत्रावरील 'स्थळ'-कारांचे भाष्य पुढे टीपांत दिलें आहे, ते पहावे. असो. केसोबासविरचित 'दृष्टांतपाठ' भाषादृष्ट्या सरस तर सामाजिक दृष्ट्या सूचक आहे- त्यांतील सर्वच दृष्टांत मोठे मार्मिक व समर्पक असून तत्कालीन समाजातील चालीरीतींवर त्यांच्या योगे चांगला प्रकाश पडतो. उत्तर यादवांच्या राजवटीतील महाराष्ट्राचे

हे एक समाजचित्रच आहे म्हटल्यास चालेल. 'गोरा गोमटा धारेवाकुटा, आलेपाले, सेजिया-साइलिया, मरकाढी, तीटत,: आंबटवोले' इत्यादि शब्दप्रयोग अभ्यसनीय आहेत. वारंवार डुळकणाऱ्या लेंकररास 'आंतु तन्ही लीतैल' असें म्हणून पुनः पुनः पाजगाच्या आईचा दृष्टांत किती हृद्य आहे ! दृष्टांत आणि सिद्धांत यांची इतकी जोड फार क्वचित आढळते (क्र.१२). (तुळपुळे, प्रस्तावना पृ. २ ते ७)

प्राचीन मराठी गद्यलेखनात महानुभावी साहित्याची मौलिकता नाकारता येणार नाही. महानुभावीय गद्याचे स्वरूपात तत्कालीन भाषिक आणि सामाजिक असे दुहेरी महत्त्व आहे. यादवकालीन समाजाची स्थितिगति, त्याच्या चालीरीती, व्रतेंवैकल्ये, सणवार, खाणीपिणी, वस्त्रेपाये, नाणींगाणी, शिक्षा दीक्षा अशा विविध अंगांचे दर्शन हे गद्य घडविते. 'लीळाचरित्रा' सारखे ग्रंथ म्हणजे केवळ चक्रवरांची वाङ्मयी मूर्ति नसून तत्कालीन समाजाचेही ते चरित्रचित्र आहे. त्यातील शब्दभांडार समाजाच्या विविध थरांतून सिद्ध झालेले असून त्यास कृत्रिमतेचा स्पर्शही नाहीं.

तुळपुळे यांनी प्राचीन मराठी गद्याचा आढावा घेताना लिहिलेले आहे की, "महानुभावीय गद्यकारांच्या मराठी भाषेचे मऱ्हाटपणच काही वेगळे आहे. खरी लोकभाषा ते जाणत.. त्यांची परंपरा अशीच पुढे चालती तर यापुढील इतिहास निराळा झाला असता. परंतु दुर्दैवाने यादवांची राजवट लौकरच संपुष्टांत आली आणि इस्लामचे आक्रमण साऱ्या महाराष्ट्रभर अविच्छिन्नपणे सुरू झाले. याचे अनिष्ट परिणाम मराठी भाषेसही भोगावे लागले व तिची गति जणु वज्र-घात व्हावा त्याप्रमाणे एकदम कुंठित होऊन ती केवळ अगतिक झाली. येथून जो मराठी भाषेच्या अज्ञातवासास आरंभ होतो तो थेट शिवकालपर्यंत, या तीनशे वर्षांच्या मध्ययुगीन काळात आधी वाङ्मयच फारसे नाही, तेथे गद्य ते किती असणार! तरीपण या काळात 'पंचतंत्रा' सारख्या बोधपर कथा, फादर स्टीफन्सची चार ओळींची प्रस्तावना आणि एकनाथी भारुडें इतके गद्य उपलब्ध होते. पैकी 'पंचतंत्रा' च्या प्रती अनेक असून भावे-प्रत, पोतदार-प्रत व नेने-प्रत या त्यांपैकी प्रमुख होत. त्यातील शेवटची महानुभाव संप्रदायांतील असून याशिवाय पंचतंत्राची आणखी एक संपूर्ण व स्वतंत्र प्रत मला तंजावरीं मिळाली. याचा अर्थ, मूळ मराठी भाषांतराच्या अनेक प्रती झाल्या असा नव्हे, तर प्रा. पोतदार म्हणतात त्याप्रमाणे पंच- तंत्राची मूळ भाषांतरेच अनेक झाली. असो. आपल्या भाषांतरकाने मूळांतील गोडी कायम ठेविली आहे इतकेच नव्हे, तर आपल्या प्रसादपूर्ण वाणीने त्याने ती वाढविली आहे. १५ व्या शतकांतील प्रस्तुत मराठी पंचतंत्राची भाषा १३ व्या शतकांतील म्हाइंभटाच्या भाषेशी जुळती आहे याचे थोडे नवल वाटते. (क.१५) 'क्रिस्तपुराणा' च्या प्रस्तावनेतील भाषा अशुद्ध, अपभ्रष्ट व काहीशी गांवढळ वाटली तरी तिचे ऐतिहासिक मोल काही निराळे आहे. इंग्लंडमधील विल्टशायर परगण्यांत ज्याचा जन्म असा थॉमस् स्टीफन्स एक मिशनरी म्हणून १६ व्या शतकांत हिंदुस्थानात यावा आणि स्वधर्म- प्रसारार्थ का होईना पण मराठी भाषेवर प्रभुत्व मिळवून 'क्रिस्तपुराणा'सारखे ओवीबद्ध महाकाव्य त्याने निर्माण करावे हा सर्वच नवलाव नाही काय? काव्यदृष्टीने 'क्रिस्तपुराण' कसेही असो, त्याची थोरवी केव्हाही स्वयंसिद्धच आहे. स्टीफन्सने या पुराणास लिहिलेली आटोपशीर अशी गद्य प्रस्तावना वक्तृत्वपूर्ण असून तींत लेखकाची स्वधर्मनिष्ठा व तळमळ ही स्पष्ट दिसतात. (क्र.१४) एकनाथांनी गद्यरचना केल्याचे कोठे ऐकिवात नाही. तरीपण 'अर्जदस्त' किंवा 'कौलपत्र' यासारखीं त्यांची प्रकरणे वस्तुतः गद्यच होत. (क्र.१५) नाथांचे रूपककौशल्य आणि व्यवहारचातुर्य असाधारण असून प्रपंच व परमार्थ यांचा समन्वय करून दाखविण्याची

त्यांची शैलीही केवळ अनुपम आहे. या सर्व गुणांचा प्रत्यय प्रस्तुत भारुडातही येत असून त्यातील सांग रूपक खास एकनाथी वळणाचे आहे. रचना काहीशी मुक्तछंद पद्यासारखी वाटते. मधूनच यमकाचाही भास होतो. म्हणून या प्रकारास संयमक गद्य म्हणणे अधिक बरे. नाथांचा 'हिंदुतुर्क संवाद' काहीसा याच पद्धतीवर आहे.

१६ व्या शतकाच्या अखेरीस रचिल्या गेलेल्या या गद्यांतील फारसी शब्दांचे प्रमाण ध्यानात घेण्यासारखे आहे. मराठी भाषेचा अज्ञातवास संपून तिच्या इतिहासातील नवयुगास नाथकालापासून प्रारंभ होतो, त्याचे हे द्योतक आहे. पद्याचे कसेही असो, मराठी गद्याने निदान परभाषेतील शब्दांचे लोण पचवून स्वतःच्या सामर्थ्यात भर घालण्याचे ठरविलेले या काळापासून स्पष्ट दिसते. प्राचीन मराठी गद्याचा पूर्वार्ध संपून त्याचा उत्तरार्ध सुरू झाल्याचे हे गमक आहे (क्र. १५). येथे पारतंत्र्याचे मध्ययुग संपते व स्वातंत्र्याच्या नवयुगास प्रारंभ होतो. (प्रस्तावना पृ. ७ ते ८) मध्ययुगीन मराठी गद्याच्या स्वरूपामध्ये वरील बदलांबरोबरच बखर गद्य, पत्रात्मक गद्य याला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. यामधून प्राचीन मराठीचा अस्सल आविष्कार झालेला आहे.

### २.३.४. प्राचीन मराठीची वैशिष्टये :

मराठी भाषेच्या इतिहासात प्राचीन कालखंड अतिशय महत्त्वाचा आहे. या काळामध्ये मराठी साहित्याची निर्मिती विविधांगी पध्दतीमध्ये झालेली असून त्यातून तत्कालीन मराठीची वैशिष्ट्यपूर्ण रूपे आलेली आहेत. याविषयी अधिकचा तपशील खालीलप्रमाणे लक्षात घेता येईल.

१. मराठी ही अभिजात भाषा आहे. तिला प्रदीर्घ परंपरा असून जवळजवळ १५०० वर्षांचा इतिहास जपणारी मराठी भाषा आहे. उत्तरेकडील सातपुडा पर्वत रांगापासून ते कावेरीच्या पश्चिमेकडील प्रांतापर्यंत, उत्तरेस दमणपासून-दक्षिणेकडे-गोव्यापर्यंत मराठीचा विस्तार झाला. प्रामुख्याने भारताच्या दक्षिण भागात मराठी भाषा विकसित झाली.

२. इ. सन ५००-७०० वर्षांपासून पूर्ववैदिक, वैदिक, संस्कृत, पाली, प्राकृत, अपभ्रंश या टप्प्यातून उत्क्रांत होत आलेली असली तरी प्राकृत भाषेतून तिचा विकास झालेला आहे.

३. प्राचीन मराठी साहित्याच्या मूलस्त्रोत लोकगीते, स्त्रीगीते, कथा-कहाण्या या मौखिक अथवा अलिखित साहित्यातून आलेला दिसतो. लोकसाहित्याचे मोठे दालन प्राचीन मराठी भाषेमध्ये आलेले आहे.

४. मराठी भाषेतील पहिले वाक्य श्रवणबेळगोळ येथील शिलालेखावर सापडले. हे वाक्य शके ९०५ मधील असून ‘श्री चामुण्डेराये करविले’ असे आहे.

५. शके १११० मधील मुकुंदराजांनी रचलेला ‘विवेकसिंधू’ हा ग्रंथ मराठी भाषेतील पहिला ग्रंथ आहे. या ग्रंथाचे महत्त्व प्राचीन मराठी भाषेचा विचार करताना अनन्यसाधारण आहे. कृ.पा. कुलकर्णी यांना मराठी भाषेतील उपनिषद म्हटलेले आहे.

६. लीळाचरित्र म्हणजे मराठीतील पहिला मराठी पद्यचरित्रग्रंथ होय. तेव्हापासून गद्यलेखनाची परंपरा सुरू झाली. या ग्रंथात श्री चक्रधर स्वामी यांचे जीवनचरित्र आलेले आहे. हा ग्रंथ म्हणजे महानुभावी तत्त्वज्ञानाचा मूलाधार आहे.

७. महानुभावपंथीय ग्रंथावरून प्राचीन मराठीची गतिमानता, सहजसौंदर्य, नादमाधुर्य, गोडवा दिसून येतो.

८. वारकरी संप्रदायाचा पाया घालणाऱ्या ज्ञानेश्वरांनी "परि अमृतातेही पैजा जिंके। ऐसी अक्षरेचि रसिके मेळविन" अशा शब्दात मराठी भाषेचा गोडवा अमृतापेक्षाही जास्त आहे असे म्हटले आहे. भगवतगीता सर्वसामान्यांना समजावी, यासाठी ज्ञानेश्वरी वा भावार्थ दीपिका या ग्रंथाचे लेखन मराठीत केले.

९. संत नामदेव व इतर संतांनी केलेली अभंग ही काव्यरचना वैशिष्ट्यपूर्ण आहेत. त्यातून मराठी माणूस, समाज व संस्कृतीची अभिव्यक्ती झालेली आहे.

१०. संत एकनाथांनी 'भागवत' ग्रंथाची रचना करून मराठीत भर घातली. यातील बोलीभाषेशी जवळीक साधणारा शब्दसंग्रह, छोटी छोटी लयबद्ध वाक्ये यामुळे १३ व्या शतकातील मराठी भाषा आजच्या वाचकालाही तितकीच आपलीशी वाटते.

११. कालानुक्रमे मराठीच्या उगमापासून मराठीच्या स्वरूपात अनेक बदल झालेले दिसतात. या बदलाचे एक कारण म्हणजे मराठी मातीत राज्य केलेल्या निरनिराळ्या सत्ता होय. त्यापैकी १२५० ते १३५० या काळातील यादवी सत्ता महत्त्वाची होती. याकाळात मराठी भाषेवर याचे परिणाम दिसून येतात.

१२. काळाप्रमाणेच स्थलानुसार मराठी भाषा बदलत गेली. तत्कालीन सामाजिक, राजकीय, धार्मिक परिस्थितीचा प्रभाव भाषेवर पडला यातून प्राचीन मराठी भाषेतील पद्य आणि गद्य साहित्य हे भाषेच्या शास्त्रशुद्ध व्याकरणामुळे साकार झाले.

१३. प्राचीन मराठी भाषा आणि साहित्याचे स्वरूप हे निखळ वाङ्मयीन नाही, तर त्यामध्ये अध्यात्मिक प्रेरणा दडलेल्या आहेत. विशेषत: तत्कालीन राजकीय जीवनाचा मोठा प्रभाव यावर झाल्याचे पहावयास मिळते.

१४. प्राचीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासातील हा अतिशय महत्त्वाचा टप्पा असून यामधून निर्माण झालेली साहित्यनिर्मिती प्रामुख्याने पद्यमय आहे. असे असले तरी त्यातील गद्य महत्त्वाचे असून त्याचे स्वरूप मात्र पद्याहून काहीसे भिन्न आहे. एकंदरीतच पद्य हे कल्पनारम्य, तर गद्य हे वास्तव किंबहुना व्यावहारिक आहे.

१५. प्राचीन मराठीच्या इतिहासातील ताम्रपट व शिलालेख हे महत्त्वाचे ऐतिहासिक दस्तऐवज आहेत. त्यांचे महत्त्व भाषेच्या इतिहास अभ्यासण्यासाठी महत्त्वाचे ठरते. मराठी भाषेचा इतिहास यातूनच मुद्रांकित झालेला आहे. त्यामुळे प्राचीन मराठीचे अस्सल लिखित रूप म्हणून ताम्रपट व शिलालेखांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.

## २.४ ताम्रपट व शिलालेखांचा अभ्यास

कोणत्याही भाषा अथवा साहित्याच्या इतिहासाचे लेखन आणि अभ्यास हा भूतकाळासंबंधी माहिती देऊ शकणाऱ्या विविध साधनांवर अवलंबून असतो. भूतकाळाविषयीची माहिती

ज्यातून मिळू शकते अशा साधनांना इतिहासाच्या अभ्यासाची साधने म्हणता येते. भूतकाळाविषयी माहिती देणारी अशी साधने विविध स्वरूपाची असतात. साधनांचे भौतिक साधने, लिखित साधने आणि मौखिक साधने असे वर्गीकरण करता येते. त्याचप्रमाणे इतिहासात साधनांचे मूल्यमापन देखील केले जाते. ज्या ऐतिहासिक घटनेचा अभ्यास करायचा असतो तिच्याशी संबंधित अशा अनेक बाबींचा विचार करावा लागतो. त्यासाठी ऐतिहासिक साधनांचा आधार घेतला जातो, ही साधने तपासून घेणे गरजेचे असते. त्याचा अस्सलपणा तपासावा लागतो. या साधनांचा तारतम्याने व चिकित्सकपणे वापर करणे आवश्यक असते. ताम्रपट व शिलालेख ही महत्त्वाची ऐतिहासिक साधने आहेत. मराठी भाषेच्या इतिहासात ताम्रपटांची व शिलालेखांची संख्या मोठी आहे. अ.ना. देशपांडे यांनी प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग एक पूर्वार्ध या ग्रंथामध्ये कालानुक्रमे यांची मांडणी केलेली आहे. यातील काही महत्त्वाचे संदर्भ पुढीलप्रमाणे..

### २.४.१. दिवे आगर ताम्रपट

शके ९८२ मध्ये लिहिलेला दिवे आगर ताम्रपट आहे. यामध्ये आलेली मराठी भाषा पुढीलप्रमाणे – 'सातावीसें सत सुवर्ण: दाबोदर पासि ठेवियले ।दिवें आगर' (सातवीसे सत म्हणजे १२७ सुवर्ण गद्याणक दामोदरा- पाशी ठेविले) (देशपांडे, पृ. २१३)

### २.४.२. श्रवणबेळगोळ शिलालेख

शके १०३८-३९ मधील श्रवण बेळगोळचा शिलालेख अतिशय महत्त्वाचा आहे. मराठी भाषेतील हा पहिला शिलालेख म्हणून ओळखला जातो. यामध्ये आलेली मराठी भाषा पुढीलप्रमाणे, 'श्री चावुण्ड राजें करवियले, श्री गंगराजे सुत्ताले करवियले', (हे शिल्प करविले. श्री गंगराजाने भोवतालची भिंत करविली.) या शिलालेखाविषयी अभ्यासकांमध्ये बरीच चर्चा झालेली पहावयास मिळते. (देशपांडे, पृ. २१३)

### २.४.३. आंबे शिलालेख

शके १०६६ मधील हा शिलालेख आहे. "गंग उदयादित्यदेव यांच्या आदेशाने लिहिलेल्या या शिलालेखात जो फेडी लोपी तेआ योगिनींचा वज्रदंड पडे" । ([हे शासन] जो कोणी नष्ट वा लुप्त करील त्यावर योगिनींचा बज्र दंड पडेल.) असे वाक्य आलेले आहे. (देशपांडे, पृ. २१३)

### २.४.४. भांदक शिलालेख

शके १०६८ मधील भांदकचा शिलालेख आहे. यामध्ये आलेले मराठी लेखन पुढीलप्रमाणे, 'रेवती नक्षत्र बीस्चीक लग्न श्री नारायण प्रतिस्ठा : चांगनाका सुते : तीज्या जापनाकु तेणे प्रतीस्ठा केलि : धर्माचे राए पवार.... कीर्तन जीर्णोद्धारु : त्रिनीत्र : मुषी केली : लोणार मेहेकर तेथचे आधीस्ठाते: जनार्दन पंडिताचा सुतु : गोपिनाथ पंडितु अणुमती केलें: तिची ए आस्थानाचा अभिमानु समस्ता नगराशी आणिक मुष्य नायेका अधीकारीयांसी : हे धर्मकीर्तन प्रतीपाळु जो करीते आसि भले हो देवा : वाचि तो विजैया हो देवा:' (रेवती नक्षत्र वृश्चिक लग्न असताना चांगनायकाचा तिसरा मुलगा जाषनायक याने श्रीनारायणाची प्रतिष्ठापना केली. धर्माचे राऐ म्हणजे धर्मराज किंवा धर्माचे पोशिंदे, पवार यांनी कीर्तनाचा

म्हणजे देवळाचा जीर्णोद्धार करून [मूर्ती] त्रिनेत्रमुखी केली व हे सर्व लोणार-मेहेकर येथील अधिष्ठाते जनार्दन पंडित यांचा पुत्र गोपीनाथ पंडित यांच्या अनुमतीने केले. या 'त्रिनीत्रमुषी' म्हणजे त्रिनेत्रमुखीच्या आस्थानाचा म्हणजे सभामंडपाचा अभिमान समस्त नगरास व तेथील मुख्य नायक अधिकाऱ्यांस आहे. हे धर्मकीर्तन (धर्मासाठी बांधलेले देऊळ) आहे व या शासनाचा जो प्रतिपाळ करील त्याचे भले होवो व ते जो कोणी वाचील तो विजयी होवो.) (देशपांडे, पृ. २१४)

### २.४.५. पळसदेव शिलालेख

शके १०७९ मधील हा शिलालेख आहे. यामध्ये 'श्री चंगदेव दंडनाकें विष्णुगृह केलें' । (श्री चंगदेव दंडनायकाने विष्णुगृह म्हणजे विष्णूचे देवालय केलें). असे मराठीतील वाक्य आलेले आहे. (देशपांडे, पृ. २१४)

### २.४.६. सावरगाव शिलालेख


शके १०८६ मधील सावरगाव शिलालेख आहे. त्यामध्ये आलेले मराठी पुढीलप्रमाणे सांगितली आहे. 'माधवनायके लाहियनायके मासप्रति द्राम २ दत्त फेडीतो स्वान गाढबु चांडालु' (माधवनायक व लाहियनायक यांनी २ द्राम दिले. हे [दानपत्र] जो नष्ट करील तो श्वान, गाढव व चांडाळ [ होय]) (देशपांडे, पृ. २१४)

### २.४.७. लोनाड शिलालेख

शके ११०६ मधील लोनाड शिलालेख आहे. त्यामध्ये इथे शासने लिखिता भाषा "जो लोपी अथवा लोर्पाव यो गर्दमनाथु गर्दभु तेहाचिए मांए सूर्यपर्ने गर्दभु....... इति विचार्य तथा यस्य यस्य यदा भूमिस्तस्य" (या शासनात लिहिलेली भाषा जो कोणी लोपील अथवा लोपवील तो गर्दभनाथ [ किंवा गर्दभ [ होय. त्याच्या आईस सूर्यपर्वात गाढव.......) असे मराठीतील लेखन आलेले आहे. (देशपांडे, पृ. २१४)

### २.४.८. परळ शिलालेख

शके ११०८ मधील परळ शिलालेख आहे. त्यामधील मराठी भाषेचे संदर्भ पुढीलप्रमाणे आलेले आहेत.



(परंतु जो कोणीही हे शासन नष्ट करील त्याच्यावर वैद्य- नाथ देवाच्या त्रिशूळाचा फाळ त्याच्या सर्व कुटुंबियांसुद्धा पडेल. त्याची माय गाढवाकडून.......... जाईल.) (देशपांडे, पृ. २१५)

## २.४.९. नेवासे शिलालेख

शके ११६१ मधील हा शिलालेख आहे. त्यात 'हे भूमि देवें पुरुषेण जीवणा दिवली' (ही भूमी देवपरुषाने जीवणास म्हणजे जीवण नावाच्या माणसाला दिली) (देशपांडे, पृ. २१५)

## २.४.१०. फुलंबरी शिलालेख

शके ११६४ मधील फुलंबरी शिलालेख आहे. 'जो मढाचे अयगत स्वोधाराए घेयवे ए मढु फेडील यचा दोषु ब्रह्मण भोजना फेडील यचा दोषु करि' (या मठाचे आयगत [म्ह. उत्पन्न] जो स्वतःच्या चरितार्थाकडे घेईल [ किंवा घेववेल ] किंवा या मठाचा नाश करील [त्याचा] हा दोष ब्राह्मणभोजन मोडणाऱ्याच्या (म्ह. त्यास विरोध करणाऱ्याच्या ] दोषाप्रमाणे होय.) अशी वाक्य्रचना यामध्ये आलेली आहे. (देशपांडे, पृ. २१५)

## २.४.११. उन्ह्क देव शिलालेख

शके १२०१ मधील उन्हक देव शिलालेख आहे. यामध्ये मराठी भाषेतील आलेले लेखन पुढीलप्रमाणे, 'ओं नमो गणाधिपतये नमः स्वस्ती स्त्री सके ॥ १२०१ ॥ वीक्रम संवत्सरे आद्येह माहाप्रौढप्रतापचक्रवर्ति : स्त्रीरामचंद्रदेव विजयो ततपादपदुमोपजीवि : हाथीसा- हाणी भावक देव : प्रधान हेमाडि पंडित तंनिरोपीत : ना एकु : कस्तु सोमदेयो पंडित तस्मिकाले वर्तमाने त्रेतायुगीं. रामु : बनत्रासप्रसंगीं : सरभंगाचेआ आस्रमा आहे: सरभंगाप्रीत्यर्थ : हे उदभि उदक उष्ठ केलें : तदा कालौणि देव : रचीत तिर्थ है (ॐ नमो गणाधिपतये नमः स्वस्ति श्री शके ॥ १२०१ ॥ : विक्रम संवत्सरे : प्रौढप्रताप चक्रवर्ति श्री रामचंद्र देव. भावकदेव हा त्यांच्या पदकमलाच्या आश्रयाने राहणारा त्याचा 'हाथी साहाणी' [म्ह. हस्तिदलाचा प्रमुख किंवा निकटचा मंत्री]. प्रधान हेमाडि पंडित. त्यांचा निरोपित [म्ह. दुय्यम] कायस्थ सोमदेव पंडित. त्यावेळी तेथे राहणारा, त्रेतायुगात राम वनवास प्रसंगी शरभंगऋषीच्या आश्रमाला आले. त्यांनी जमिनीतून वर उसळून येणारे [झऱ्याचे पाणी उष्ण केले तेव्हापासून हे देवरचीत तीर्थ.) (देशपांडे, पृ. २१६)

## २.४.१२. मंगळवेढा शिलालेख

शके १२०४ मधील मंगळवेढे चंडिकाईचा शिलालेख आहे. यामध्ये आलेले मराठीतील वाक्यरचना पुढीलप्रमाणे 'स्वस्त्रि स्त्रि सकु १२०४ चित्त्रभानु संछरे मार्गसिधनाथे सा गांवे सा कविटें चंडिकायिच संबंधि कविदेववंसे दैविं कर वियलें दैवें सिद्धि नेलें सेवनिं चुके तेआ केकंमिर्रि देविचि आण कवि देवीं' (स्वस्ति श्री शक १२०४, चित्रभानु संवत्सर, मार्गशीर्ष [या समयी] सिद्धनाथाने कविठें [हे मुख्य धरून] एकूण सहा गांवे चंडिकाईच्या संबंधात म्ह. प्रीत्यर्थ्य दिली. [हे] कविदेववंशात दैवयोगाने [झाले] दैवाने ते सिद्धीस नेले. त्याच्या सेवनीं [म्ह. सेवेत] जो चुकेल त्यास केकंमिरी [ककमरी] येथील देवीची आण कविदेवांनी [ म्ह. कविदेववंशातील । जनांनी [ घातली आहे ] (देशपांडे, पृ. २१६)

## २.४.१३. अक्षी शिलालेख

शके १२१३ मधील यादव रामचंद्राचा अक्षी शिलालेख आहे. रायगड जिल्यातील अलिबाग जवळील अक्षी या गावातील आहे. यामध्ये 'गीं सुष संतु । स्वस्ति ओं । पसीमस- मुद्राधिपती।

स्त्री कोंकणा चक्रीवर्ती स्त्री केसीदेवराय । महाप्रधान भईर्जू सेणुई तसीमीनी काले प्रव्रतमने ।

(जगी सुख नांदो. पश्चिम समुद्राधिपती श्री कोकणचक्रवर्ती ,श्री केसीदेवराय याचा महाप्रधान भईर्जू सेणुई याने शक संवत ९३४ प्रभव संवत्सर अधिक कृष्ण पक्ष शुक्रवार या दिवशी भईर्जूदेवीच्या बोडणासाठी नऊ कुवली धान्य नेमून दिले. )

अशी मराठी वाक्य रचना आलेली आहे. (देशपांडे, पृ. २१६)

## २.४.१४. बेलापूर शिलालेख

शके १२२२ मधील वेळापूर शिलालेख आहे. पाली तो स्वर्गा जाए न पली तो नरका जाए ([हे] पाळील तो स्वर्गास जाईल; न पाळीलें तो नरकास जाईल) अशी रचना यामध्ये आलेली आहे. (देशपांडे, पृ. २१६)

## २.४.१५. आगासन शिलालेख

शके १२२२ मधील हा शिलालेख आहे. यात ‘ओं स्वस्ति श्री सकु संवतु १२२२ सार्वरी संवछरे लावण आगासन वदि ७ सोमे । अद्येह श्रीमत्प्रौढप्रताप चक्रवर्ति श्रीरामचंद्र-शिलालेख देव विजयोदयी तत्पादपद्मोपजीवी महामंडलेस्वर सकल सैन्याधिपति पश्चिमसमुद्राधिपति श्री राण रामदेवें तंन्नि- रोपित कोंकणअधिकारी श्री जाइदेवराणेन श्रीरामदेवराया जंवले बीनवुनि कोंकणसंबंध ठाणाचा वेव्हारिभ पैला बहिवाहाचेआ कृपा करुनि प्रसादिर्दत्त निरुलके संबंध । अलणवाह ग्रामु सुपली । तस्य आघाटनान्। पूर्वे घारबली ग्रामु । पश्चिमें नदी । उत्तरें नदी। दक्षिणें नदी । एवं चतु- रधि आघाटनान् । ससीमापर्यंत तृणकाष्टोदकोपेतं सवृक्षमाला निधिनिक्षेपसहित महादोषविवर्जित करूनि चंद्रुसूर्यु तपें तंवरै सपञ्हिवारेन पुत्रपौत्री भोगावा हा गांउं। पालिता पुनीत् । (ओम् स्वस्ति. श्री शक संवत १२२२, शार्वरीनाम संवत्सरात, श्रावण वद्य ७, सोमवार या दिवशी श्रीमत्प्रौढ-प्रतापच्चक्रवर्ति श्री रामचंद्र देव (हा राज्य करीत असताना) त्याचा पादपद्मोपजीवि, महामंडलेश्वर, सकल सैन्याधिपती, पश्चिमसमुद्राधिपती श्रीराण रामदेव याने नेमलेला कोकणचा अधिकारी श्री जाइदेवराणा याने श्री रामदेवरायाजवळ विनंती करून कोकणसंबद्ध ठाण्याच्या वेव्हाऱ्यात (ग्ह. व्यावहारिकास) त्याच्या पहिल्या (किंवा पूर्वीच्या) वहिवाटीने संतुष्ट होऊन ('कृपा करुनि) निरुलुकेसंबद्ध (म्ह. निरुलुके भागातील) अलणवाहेचा [म्ह. खार किंवा खाजण नसलेला सुपली हा गाव प्रसाद म्हणून दिला. त्याच्या चतुःसीमा अशा पूर्वेस घाखली गाव, पश्चिमेस, उत्तरेस व दक्षिणेस नदी. याप्रमाणे चतुःसीमांनी युक्त (असा गाव) तृणकाष्ठउदक यांसमवेत व वृक्षमाला निधि निक्षेप यांसहित महादोषविवर्जित करून जोपर्यंत चंद्रसूर्य तपत आहेत, तोपर्यंत (त्या वेव्हाऱ्याच्या) पुत्रपौत्रांनी आपल्या परिवारासह भोगावा म्हणून दिला. [हे शासन] पाळणारा पुण्यवा [होय]) अशी वाक्यरचना आलेली आहे. (देशपांडे, पृ. २१७)

### २.४.१६. वेळापूर शिलालेख

शके १२२२ मधील हा शिलालेख आहे. त्यात (ते) णें पुण्येंची बाइदेवें राज्य करावें अनेक युगें। वेळापूर (त्या पुण्यानेच बाइदेवाने अनेक युगे राज्य करावे.) अशी रचना आलेली आहे. (देशपांडे, पृ. २१७)

### २.४.१७. विजापूर शिलालेख

शके १२४२ मधील हा विजापूर शिलालेख आहे. त्यामध्ये आलेले मराठी भाषेतील लेखन पुढीलप्रमाणे, श्रीषुदबुदीन राय वीजेयराज्योदईत तं नीरोपीत मलिक क्रिमी- विजापूर दिन दक्षीणवरणासि वीजेयापूरी वडिल मषिती करविली सालहोउटगेचा सुतारु रेवेए मसिति कैले। (श्री कुतुबुद्दीन राजा विजय राज्योदयित (असताना] त्याचा निरोपित (म्ह. अधिकारी] मलिक करीमुद्दीन [ याने] दक्षिण विमा- गात [किंवा देशात] विजापूर येथे एक मोठी मशीद करविली. सालोटगीचा सुतार [शिल्पकार] रेवैया याने ही मशीद तयार केली.) (देशपांडे, पृ. २१८)

### २.४.१८. खाटेग्राम ताम्रपट

शके १२७१ मधील हा ताम्रपट असून त्यामध्ये 'तुमी आमचे जातिसमधाचा कारियाति उपगा आले ते कवण खाटेआम कार्य म्हणाला तरि आमासिं आणि सोनांरासि सवादा ताम्रपट होऊनु हाणमारि जालेसमधिं तुमि वैरेंकार अमचेया वाणि- याचे समायाचे संमविरिधिसि तुमि वाणि समयासि यउनु मानु सभेचा राकिला'. (तुम्ही आमच्या जातिसंबंधाच्या कार्यास उपयोगी पडला. ते कोणते कार्य म्हणाल तर आमच्यात आणि सोनारात बाद होऊन हाणामारी झाली त्यासमयी तुम्ही बेरेंकार आम्हा वाण्यांचे हितसंबंध व संवृद्धि [ जाणून] समयात येऊन समयाचा [म्ह. प्रसंगाचा ] मान राखला.) अशी रचना आलेली आहे. (देशपांडे, पृ. २१८)

### २.४.१९. वेळुस शिलालेख

शके १३२४ मधील हा शिलालेख आहे. त्यातील वाक्यरचना वेळुस शिलालेख 'सर्वबाधापरिहारार्थ करुनु आचंद्रार्क परीयंत सासन करुनु ग्रामु दिधला हे सासन लोपि तेआसि गोहत्या ब्रम्हहत्या बाळहत्या पडे तेयाचीऐ मायेसि गाडौ घोडु' (हे 'सर्वबाधापरिहारार्थ' करून चंद्रसूर्य आहेत तोपर्यंत या शासनपत्राने हा गाव देवाकडे दिला. हे शासन जो मोडील त्यास गोहत्या, ब्रह्महत्या व बालहत्या ही पातके लागून त्याच्या आईस गाढव व घोडा [ लागतील ]) (देशपांडे, पृ. २१८)

### २.४.२०. बांदोडे शिलालेख

शके १३३५ हा बांदोडे शिलालेख आहे. यातील मराठी लेखन पुढीलप्रमाणे, 'वर्षप्रतिवर्ष तेला बारा तांबिए वेगळे करुनु त्य उपरिगोपाळ भटान द्यावे टॉ २। मॉ ई सेणवैया हस्ती ग्रामान रोकडे टॉ. २० घेउनु तयाच्या कुळाग्रांवरि आचंद्रार्कपर्यंत सहिर- ण्योदक दान धारापूर्वक करुनु सर्वनमस्य सर्वबाधाविवर्जित करुनु दिधले गोपाळ भटानें तया पुनवेचां दिसिं प्रर्वर्ताच्या तांबिया येकाप्रति सोळसिया १७ लेखि तेला तांबिये तिनिसमंध सोळसिया

५१ तिळेल नाहिं तरि नारलेल अथवा तूप मेजुनु देउळि द्यावें तथा दीपमाळेसि पणतियां ४०० वातिसि लाग तेतुकें सुत येतुकें गोपाळ भटाने देउनु दिपमाळ करावि' ( प्रत्येक वर्षी तेलाचे १२ तांबे वेगळे काढून त्यावर २ टाक गोपाळभटाने द्यावे ... मांइ शेणब्याच्या हस्ते गावाने रोख टाक २० घेऊन त्याच्या कुळागारावर चंद्रसूर्य आहेत तोपर्यंत सुवर्णोदकाचे दान धारापूर्वक करून सर्व प्रकारचे कर व बाधा यांपासून सुरक्षित करून दिले गोपाळभटाने त्या ... पोर्णिमेच्या दिवशी प्रर्वर्ताच्या (१) एका तांब्यास १७ सोळ- सिया याप्रमाणे तेलाचे तीन तांब्ये म्हणजे एकूण सोळसिया ५१ (इतके) तिळेल, नाहीतर नारळेल किंवा तूप मोजून देवळात द्यावे. तसेच दीपमाळेसाठी पणत्या ४०० (ब) त्यास लागेल तितके सूत गोपाळभटाने देऊन दीपमाळ करावी). (देशपांडे, पृ. २१९)

## २.५ ताम्रपट व शिलालेखांच्या अभ्यासाचे महत्त्व

मराठी भाषेच्या इतिहासामध्ये ताम्रपट व शिलालेख ही महत्त्वाची अभ्यास साधने आहेत. या साधनांचे महत्त्व हे ऐतिहासिक आहे. हजारो वर्षांची भाषा यामध्ये शब्दबध्द झालेली असते. विशेषत: त्या त्या काळातील लिपी व लेखनकला यामधून आविष्कृत होते. ताम्रपट व शिलालेखांचा अभ्यास हा वास्तविक पुराभिलेखांचा अभ्यास असतो. यामध्ये प्राचीन काळाचे संदर्भ दडलेले असतात. त्या त्या काळातील राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक जीवनाचे दर्शन यामधून घडलेले असते. याविषयी शोभा गोखले लिहितात, मानवी संस्कृतीचे एक प्रमुख अंग म्हणजे भाषा आणि लिपी...भाषा ही निरनिराळया मानवसमुहात संक्रमित, विकसित झाली. भाषेमुळे मानवी संस्कृती विकासाचे नवनवे टप्पे गाठू शकली... भाषेचा विकासक्रम पाहायचा झाला तर भाषेचा उगम, बोलीरूप, लिपी, लेखन असे टप्पे अभ्यासावे लागतात. बोली रूपातून लिपी रूपाकडे जाताना भाषेमध्ये संस्करण होत राहते. एक प्रमाणितरूप तिला प्राप्त होते. भाषा लिपी रूपात येतानाचे प्राचीन पुरावे म्हणून प्राचीन मुद्रा, ताम्रपट, शिलालेख, भूर्जपत्रे इत्यादी गोष्टी महत्त्वाच्या आहेत. (महाराष्टाच्या इतिहासाचे साक्षीदार, प्रस्तावना पृ.१)

एकुणात ताम्रपट व शिलालेख हे महत्त्वाचे ऐतिहासिक दस्तऐवज आहेत. कोणत्याही भाषेचा इतिहास अभ्यासण्यासाठी त्यांची उपयोगिता महत्त्वाची ठरते. मराठी भाषेचा इतिहास यातूनच मुद्रांकित झालेला आहे. त्यामुळे प्राचीन मराठीचे अस्सल लिखित रूप म्हणून ताम्रपट व शिलालेखांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. काळाच्या पटलावर नवनव्याने उत्खनन होत जाते. त्यातन नवे शिलालेखही मिळतात. यातून भाषा व साहित्याचे नवे अवकाश दृष्यांकित होते. हेच शिलालेखांचे महत्त्व अधोरेखित करते.

## २.६ समारोप

प्राचीन मराठी भाषेच्या इतिहासातील प्रारंभ ते १६०० हा महत्त्वाचा कालखंड आहे. यामध्ये मराठी भाषेचा उदय आणि विकास झालेला आहे. विशेषत: या काळात मराठी भाषेतून मूलभूत साहित्यनिर्मिती झाली. या वाङ्मयाचे स्वरूप मौखिक, पद्य आणि गद्य रूपात आविष्कृत झालेले आहे. प्राचीन मराठीची विविधांगी रूपे या साहित्यातून प्रभावीपणे आलेली आहेत. एकुणात मराठी भाषा आणि वाङ्मयाच्या इतिहासातील हा प्रारंभीचा

कालखंड महत्त्वाचा घटक आहे. त्याचे आकलन करून घेणे एकूणच भाषाभ्यासासाठी उपयुक्त ठरणारे आहे. वरील विवेचनात केलेला याचा समग्र विचार यादृष्टीने महत्त्वपूर्ण ठरतो.

## २.७ संदर्भ

१. कुलकर्णी, कृ.पा. : मराठी भाषा: उद्गम आणि विकास, द इंटरनॅशनल बुक सर्व्हिस, पुणे. १९३३.

२. देशपांडे, अ. ना. : प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग १ पूर्वार्धः व्हिनस प्रकाशन, पुणे. १९६६.

३. तुळपुळे, शं.गो. : प्राचीन मराठी गद्य, व्हिनस प्रकाशन, पुणे. १९४९.

४. जोशी, प्र.न. : प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, स्नेहवर्ध्न प्रकाशन, पुणे.

५. नसिराबादकर, प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, पुणे.

६. जोशी, वसंत (संपादक) : भाषा व साहित्य : संशोधन खंड पहिला, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९८१.

७. कोलते, वि.भि.: महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. १९८७.

## २.८ पूरक वाचन

१. मुकुंदराज : विवेकसिंधू

२. म्हाइंभट : लिळाचरित्र

३. रामचंद्रपंत अमात्य : आज्ञापत्र

४. कल्पना रायरीकर व मंजिरी भालेराव : महाराष्ट्राच्या इतिहासाचे साक्षीदार (शिलालेख व ताम्रपट)

५. छत्रपती संभाजीराजे भोसले : बुधभूषण

## २.९ प्रश्नावली

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न** :

१. प्राचीन मराठी ही संकल्पना व स्वरूप स्पष्ट करा.

२. प्राचीन मराठी पद्याचे स्वरूप स्पष्ट करा.

३. प्राचीन मराठी गद्याचे वैशिष्ट्ये विशद करा.

४. मराठी ताम्रपट व शिलालेखांचे स्वरूप स्पष्ट करा.

५. प्राचीन मराठीची वैशिष्ट्ये विशद करा.

६. मराठीतील शिलालेखांचे योगदान विशद करा.

**ब) लघुत्तरी/ टिपा :**

१. विवेकसिंधू ग्रंथाचे वेगळेपण

२. महानुभावी पद्य साहित्याचे वेगळेपण

३. महानुभावी गद्याचे स्वरूप

४. मराठीतील ताम्रपट

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. प्राचीन हा शब्दार्थ लिहा.

२. प्राचीन मराठी म्हणजे काय ?

३. ताम्रपट म्हणजे काय ?

४. शिलालेख म्हणजे काय ?

५. प्राचीन मराठी साहित्यातील आद्य ग्रंथ कोणता आहे ?

❖❖❖❖

# ३

# यादवकालीन समाज, संस्कृती, संप्रदाय आणि साहित्य

**घटक रचना :**

३.० उद्देश

३.१ प्रस्तावना

३.२ यादवकालीनपूर्व महाराष्ट्र

३.३ यादवांचे साम्राज्य

३.४ यादवकालीन समाजजीवन

३.५ यादवकालीन संस्कृती

३.६ यादवकाळात उदयास आलेले संप्रदाय

३.७ यादवकालीन साहित्य

३.८ समारोप

३.९ संदर्भसूची

३.१० अधिक वाचनासाठी

३.११ सरावासाठी प्रश्न

## ३.० उद्देश

हा घटक अभ्यासल्यानंतर आपल्याला पुढील उद्देश साध्य करता येतील.

१) यादवकाळातील सामाजिक, राजकीय, आर्थिक जीवनशैलीचा परिचय होईल.

२) यादवकालीन संस्कृतीची ओळख होईल.

३) या काळामध्ये उदयास आलेल्या विविध संप्रदायांची माहिती मिळेल.

४) यादवकाळात निर्माण झालेल्या मराठी साहित्य परंपरेचा परिचय होईल.

५) मराठीसाहित्यातीलविविधसंतांचाआणिअभंगांचापरिचयहोईल.

## ३.१ प्रस्तावना

प्रस्तुत घटकामध्ये आपण यादवकाळ, त्यातील सामाजिक, सांस्कृतिक जीवन विशेष, या काळात उदयास आलेले व विकसित झालेले संप्रदाय व या काळातील साहित्यपरंपरा यांचा अभ्यास करणार आहोत. या गोष्टी अभ्यासण्यापूर्वी आपण यादवकाळ म्हणजे नेमका कोणता काळ हे ध्यानात घेऊ.

शं. गो. तुळपुळे यांच्या “यादवकालीन मराठी भाषा”या ग्रंथात यादवकाल म्हणजे नेमका कोणताकालखंड याबद्दलचे भाष्य प्रास्ताविकात आले आहे. ते कालखंडाचे तीन टप्पे सांगतात.

१. **प्राचीन काळ -** प्रारंभापासून ते नामदेवअखेर, म्हणजे इ. स. १३५० पर्यंत,

२. **मध्यकाळ-** चौदाव्या शतकाच्या अखेरपासून ते पेशवाईच्या अखेरपर्यंत, म्हणजे स्थूलमानाने इ.स. १८०० पर्यंत,

३. **अर्वाचीनकाळ -** अव्वलइंग्रजीचावत्याच्यापुढील, म्हणजे एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकांचा काळ.

यातील प्राचीन मराठीचा काळ यादवकाळ या नावाने ओळखला जातो. याचे कारण सांगताना तुळपुळे म्हणतात, " या कालखंडातील बहुतेक सर्व महत्त्वाची ग्रंथरचना यादवांच्या राजवटीत झाली व तो कालखंड आणि यादवांची राजवट ही साधारणपणे एकाच वेळी संपुष्टात आली. यादवांचे राज्य शेवटचा यादवनृप (यादव राजा) शंकरदेव याचा मेहुणा हरपाल याच्या मृत्यूने इ.स.१३१८ मध्ये अस्त पावले व मराठी भाषिकांचा प्रदेश यावनी सत्तेखाली गेला. त्यानंतर लौकरच, म्हणजे इ.स.१३५०मध्ये नामदेवांचे निर्वाण झाले व त्याबरोबर मराठी वाङ्मयाचाही, काही काळापुरता का होईना, अस्त झाला.” (पृ. २,३-प्रस्तावना, शं. गो. तुळपुळे : १९७३) तुळपुळे यांनी हा मांडलेला विचार मराठी भाषाभ्यासाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा आहे. तसाच तो मराठी भाषेतून लिहिल्या गेलेल्या साहित्याची परंपरा, इतिहास मांडत असतानाही तो महत्त्वाचा ठरतो. १२९६ मध्ये देवगिरीवर अल्लाउदिन खिलजी याने स्वारी केली. रामदेवराव यादव व त्याचा पुत्र शंकरदेव यांचा पराभव करून त्याने त्यांच्याकडून प्रचंड प्रमाणात खंडणी वसूल केली. याघटनेनंतर यादव हे मांडलीक राजे झाले. या काळात सत्तापरिवर्तन ही एक मोठी घटना घडली. जुन्या सत्तेचे संकेत, परंपरा डावलून, मोडीत काढून नव्या सत्तेने आपले संकेत व सत्तास्थापनेसाठी वापरलेल्या सर्वपद्धतीच्या कचाट्यातून हा कालखंड जात होता.

## ३.२ यादवकालीनपूर्व महाराष्ट्र

महाराष्ट्राच्या ज्ञात ऐतिहासिक कालखंडाची सुरुवात ही मौर्य साम्राज्यापासून झालेली दिसते. हा कालखंड इ.स.पूर्व २६९ ते इ.स. पूर्व २३६ असा मानला जातो. मौर्य साम्राज्य हे भारताच्या दक्षिण भागामध्ये अधिक होते. पण काही संशोधकांच्या मते महाराष्ट्राचा काही भागही त्यामध्ये व्याप्त होता. भारतातील पहिले बालाढ्य साम्राज्य म्हणजे राजा अशोकाचे होते. पण त्याच्या मृत्यूनंतर हे मौर्य साम्राज्य मात्र टिकले नाही. त्याच्यानंतर या साम्राज्याची अनेक शकले होऊन छोट्या-मोठ्या सत्ता उदयास आल्या. यातील दक्षिण भारतात उदयास आलेली सातवाहनांची सत्ता अधिक सामर्थ्यशाली होती. सम्राट अशोकाचे महाराष्ट्राच्या ठाणे जिल्ह्यातील सोपारा आणि चांदा जिल्ह्यातील देवटेक येथे दोन शिलालेख सापडले. पण या शिलालेखावरून अशोक सम्राट यांची महाराष्ट्रात कोठे सत्ता होती हे सांगणे अवघड ठरते. दक्षिण भारतात उदयास आलेल्या सातवाहनानी आपला राज्यविस्तार नंतर उत्तर भारतात केला. भारतातही केला. उत्तर भारतातील कण्व राजा

सुशर्मा याला ठार मारून सिमुक-सातवाहन या राजाने कण्व राजवटीचा शेवट केला. असे पुराणात नमूद केलेले आहे.

पुराणामध्ये सातवाहनांचा उल्लेख आंध्र किंवा आंध्रभृत्य असा केला जातो. सातवाहन राजे म्हणजे नेमके कोणत्या राज्यातील याबद्दल अनेक संशोधकांमध्ये मतभेद आहे. कोणी ते आंध्र देशातील असावेत, आंध्र हे मौर्य किंवा शुंग राजसत्तेचे मांडलीक राजे असावेत किंवा ते सातवाहनांचे मांडलिक राजे असावेत असे मानतात. तर काही संशोधक, "सातवाहन राजांनी आंध्र प्रदेशात राज्यविस्तार केल्यामुळे त्यांना 'आंध्र-सातवाहन' हे नामाभिदान मिळाले." (पृ.५३, ह. श्री. शेणोलीकर : २०२१) असे मानतात. पुराणग्रंथामध्ये या सातवाहनांना 'आंध्रजातीय' असे म्हटले जाते. याबद्दल मत व्यक्त करताना ह. श्री. शेणोलीकर म्हणतात, "सातवाहन हे आंध्रजातीय आहेत असा पुराणात जरी उल्लेख असला तरी सातवाहन राजे आपल्या एकाही शिलालेखात स्वतःला आंध्र म्हणवीत नाहीत हे मुख्यतः लक्षात घेतले पाहिजे." (पृ. ५९, ह. श्री. शेणोलीकर : २०२१)

सातवाहनांची राजधानी ही प्रतिष्ठान म्हणजेच सध्याचे पैठण, जि. औरंगाबाद होती असे टॉलेमी हा संशोधक मानतो. जैन वाङ्मय परंपरेतही हाच उल्लेख आढळतो. महाराष्ट्रातल्या विविध उत्खननामध्ये या साम्राज्याची विविध नाणी सापडली. ज्यावरून सातवाहनांचे मूलस्थान मराठवाड्यात किंवा पश्चिम महाराष्ट्रात असावे असे शेणोलीकर सांगतात. यावरून असा निष्कर्ष काढता येतो की, सातवाहन हे महाराष्ट्रीय होते यावर शिक्कामोर्तब होतो. डॉ. व्हिन्सेंट स्मिथ या पाश्चात्त्य अभ्यासकाच्या मते सातवाहनांचा कालखंड हा इ.स.पूर्व २४० किंवा २३० आहे. पण ह. श्री. शेणोलीकर यांनी नेवासे येथील उत्खननातील अवशेषांवरून सातवाहनांचा कालखंड हा इ. स. पूर्व दुसरे किंवा तिसरे शतक म्हणजेच इ.स.पूर्व २२० ते इ.स.२१८ असा सांगितला आहे. म्हणजेच ही राजवट जवळजवळ चारशे वर्षे अस्तित्वात होती.

पुराणांमध्ये आंध्र वंश म्हणजेच सातवाहन कुलात एकूण तीस ते बत्तीस राजे होऊन गेले. यातील काही महत्त्वाच्या राजाची कारकीर्दच प्रकाशमान राहिली. मौर्य साम्राज अशोकाच्या राजवटीच्या अस्तानंतर दक्षिणेत समुक सातवाहन या राजाने इ. स. पूर्व २२० मध्ये आपली स्वतंत्र सत्ता स्थापन केली. त्याची कारकीर्द २३ वर्षाची होती. त्याचा भाऊ कृष्णची अठरा वर्षे, सिमुकचा मुलगा श्री सातकर्णी, सहावा राजा शकारि सातकर्णी, आठवा राजा-आपीलक, सतरावा राजा हाल हे होत. यातील राजा हाल च्या नावावर 'गाथाशप्तशथी' हा प्राकृत ग्रंथ येतो. त्यानंतर गौतमीपुत्र सातकर्णी हा तेविसावा राजा होऊन गेली. काही संशोधकांच्या मते या राजाने नवीनकालगणना सुरु केली असे मानले जाते. तर काही संशोधक 'शालिवाहन शक' ही कालगणना राजा कनिष्काने सुरु केली असे मानतात. गौतमीपुत्रानंतर पुलुयामी, त्यानंतर राजा यज्ञश्री हे राजे होत. या राजवटीताला तिसरा पुलुयामी हा या घराण्यातला शेवटचा राजा होय.

सातवाहनानंतर विदर्भात वाकाटकांची सत्ता उदयास आली. पण वाकाटकांच्याही आधी शक राजांनी आपली सत्ता गाजवली. यातील वाकाटकांची सत्ता ही इ.स. २५० पासून ५२५ पर्यंत होती. त्यानंतर चालुक्य (इ.स. ५५० ते ५६७) त्यानंतर राष्ट्रकूट अशा सत्ता महाराष्ट्रात स्थापन झाल्या. या सर्व सत्तांचा प्रभाव महाराष्ट्रावर सातत्याने दिसत राहिली.

राष्ट्रकुटानंतर पुन्हा एकदा चालुक्य, त्यानंतर कदंब व शिलाहार राज्याची सत्ता महाराष्ट्रावर राज्य करत होती. एकूणच हा काल पाहता या काळात महाराष्ट्रावर अनेक सत्ता स्थापन झाल्या. त्यांचा विकास होऊन त्या पुन्हा अस्ताला गेल्या. प्रत्येक साम्राज्याची राजनीती परस्परभिन्न होती. त्याचा एक प्रभाव महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणावर सातत्याने होत होता. महाराष्ट्राचे राजकारण यामुळे सातत्यान प्रभावित झालेले दिसते. यानंतर महाराष्ट्रावर सत्ता स्थापन झाली ती यादवांची. या सत्तेचे विविध पैलू आपण विस्ताराने पाहू.

## ३.३ यादवांचे साम्राज्य

सातवाहनांचा कालखंड हा इ.सू.पूर्व दुसऱ्या शतकापासून ते इ.स. दुसऱ्या शतकापर्यंत म्हणजेच चारशे वर्षांचा होता. या काळात प्राकृत भाषेला महत्त्वाचे स्थान मिळाले होते. म्हणूनच या भाषेतून 'गाथासप्तशती' नावाचा ग्रंथ या कालखंडात निर्माण झाला होता. या काळात यज्ञ संस्कृतीची हेटाळणी झाली होती. याचा परिणाम म्हणजे वेदकालीन देवता मागे पडून अनार्य परंपरेतील शिव, कृष्ण, गणपती, गौरी या देवता लोकप्रिय होत गेल्या होत्या. सातवाहनांनंतर वाकाटक, राष्ट्रकूट, चालुक्य यांचे राजकीय वर्चस्व प्रस्थापित झाले होते. याच कालखंडात कोरीव लेण्यांचे स्थान वाढून अंजिठा लेणीनिर्माण झाली होती. वैदिक धर्माला पुन्हा राजाश्रय मिळाला असला तरीही बौद्ध धर्मियांनाही प्रेमाची वागणूक मिळत होती. या काळात सत्ता एककेंद्री होती. जवळपासचे दुर्बल राजे सम्राटांचे मांडलिकत्व स्वीकारत. परंतु त्यापैकी काही धूर्त राजे सम्राटाच्या पडत्या काळात मांडलिकत्व झुगारून देत असत. व सत्ता हस्तगत करत असत. पहिल्यांदा राष्ट्रकुटांनी व नंतर यादवांनी अशाच प्रकारे महाराष्ट्रात सत्ता हस्तगत केली होती.

महाराष्ट्राने यादवपूर्व काळात सातत्याने राजकीय स्थित्यंतरे घडताना पाहिली होती. या काळात चातुर्वर्ण्य व्यवस्था रुजलेली होती. चातुर्वर्ण्य व्यवस्था म्हणजेच अनेक जाती-पोटजाती मध्ये समाज विभागाला गेला होता. राष्ट्रकुट काळात बौद्ध धर्म मागे पडून जैन धर्माची उभारणी झाली होती. या काळातच यावनी व्यापाऱ्यांचे आगमन पश्चिम किनाऱ्यावरून झाले होते.यादवपूर्वकाळात शक, कुशाण, हुण यांनी आक्रमणे केली. महाराष्ट्रातल्या  राजांविरोधी छोटे-मोठे संघर्ष केले. पण ते शेवटी याच संस्कृतीत समाविष्ट झाल्यामुळे त्यांची आक्रमणे फारशी जाणवली नाहीत पण यादवकाळातील इसलामी आक्रमण मात्र महाराष्ट्राच्या संस्कृतीपटावरील ठळक आक्रमण ठरले.

दृढप्रहार या राजापासून यादव वंशातील यादवांचा इतिहास ज्ञात आहे. यादवांच्या काळपरंपरेप्रमाणे  यदुराजाचे हे वंशज प्रथम मथुरेचे अधिनाथ होते. नवव्या शतकाच्या अगोदरचा यादववंशाचा इतिहास उपलब्ध नाही. पाचवा भिल्लम यादव राजाने सोलापूर परिसरातील कलचुरी या राजवटीला नष्ट केले. त्यानंतर त्याने आपली राजधानी देवगिरीवर नेली व ११८७ मध्ये स्वत:ला सम्राट म्हणून राज्याभिषेक करवून घेताना.

**यादवोच्चा साम्राज्यविस्तार -**

- पाचवा भिल्लम - (चालुक्यांची राजधानी कल्याणी आणि जवळपासचा प्रदेश जिंकला.)
- जैत्रपाल  - (११९१-१२१०) रुद्रांचा पराभव करून. परमार व चोल या राजांना वठणीवर आणले.  (पाचव्या भिल्लमचा मुलगा)

- सिंघण - (१२१०-१२४७) कृष्णा व मलप्रभा नद्यांच्या दक्षिणेकडील भाग होयसळांपासून मुक्त करून राज्यविस्तार वाढवला. इ.स. १२१८ मध्ये दुसरा शिलाहार राजा भोज याचे राज्य खालसा केले.
- कृष्ण (१२४७-१२६०) (सिंघणचा नातू) - कोकणच्या शिलाहारांचा पराभव केला.
- महादेव (१२६०- १२७१) (कृष्णाचा भाऊ) उत्तर कोकणातील शिलाहारांचे राज्य खालसा केले.
- आमण - (महादेवाचा मुलगा)
- रामदेव (१२७१-१३०९) - महादेवानंतर कृष्णराजाचा मुलगा रामदेवराव याचा हक्क असतानाही ती गादी आमणला मिळाली होती. याचा राग येऊन रामदेवाने सूड उगविण्यासाठी किल्ला ताब्यात घेऊन आमणला कैद करून त्याचे डोळे काढले व स्वत: राजगादीवर बसला. इथून पुढे त्याची सत्ता सुरु झाली.

अल्लाउद्दीन खिलजी हा दिल्लीचा सुलतान जलालुद्दीन खिलजी याचा पुतण्या असून त्याने आठ हजार फौजेनिशी देवगिरीवर चालून गेला. गाफील असलेल्या रामदेवरावाला याला समर्थपणे तोंड देता आले नाही. रामदेराव अल्लाउद्दिनला शरण गेला. पुढे अल्लाउद्दिन याने जलालुद्दिनचा खून करून स्वतः सुलतान झाला. इ.स.१३०७मध्ये खंडणी वसूल करण्यासाठी मलिक काफूरला देवगिरीवर पाठवले. खंडणी न दिल्याने मलिक काफूरने रामदेवरावाला कैद करून दिल्लीस सहा महिने ठेवले. इ.स.१३१० मध्ये रामदेवरावाचा मृत्यू झाला. पुढे रामदेवरावाचा जावई हरपाळदेव याच्याकडे सत्ता असताना त्याने मुस्लिम सत्तेविरुद्ध बंड पुकारला. तेव्हा सुलतान मुबारकशहाने खुशूनखानला याचा बंदोबस्त करण्यासाठी पाठवले. त्याने हरपालदेवाला ठार मारून त्याचे शिर वेशिवर टांगले. या घटनेबरोबरच यादवांची सत्ता संपुष्टात आलेली दिसते.

## ३.४ यादवकालीन समाज जीवन

मौर्य-सातवाहन काळापासून अस्तित्वात असलेली चातुर्वर्ण्य व्यवस्था गुप्तकाळामध्ये बळकट होऊन त्यातील जातिसंस्था, जाती- पोटजातींचे प्रस्थ वाढत गेले. वर्णव्यवस्थेच्या शिरोभागी असणाऱ्या ब्राह्मण वर्णामध्येसुद्धा प्रादेशिकतेनुसार भेद होऊन 'पंचगौड' व 'पंचद्रविड' असे दोन विभाग झाले. महाराष्ट्रात देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे, पळशे अशा पोटजाती अकराव्या-बाराव्या शतकात दिसून येतात. परिणामतः यातून फुटीर वृत्तीला खतपाणी मिळालेले दिसते. पूर्वी ब्राह्मणांच्या नावाबरोबर ओळखीसाठी गोत्राचे नावही सांगितले जात असे. तेराव्या शतकापासून गोत्राऐवजी झाडनाव लावण्याची पद्धत महाराष्ट्रीय ब्राह्मणांनी स्वीकारलेली आढळते. क्षत्रियांमध्येही कुळी निर्माण झाल्या. बाराव्या शतकाच्या सुमारास संपूर्ण भारतभर छत्तीस कुळींचाउल्लेख ‘राजतरंगिणी' या कल्हणाच्या ग्रंथात दिसतात.

जातीजातींमधील विषमता व स्पृश्य- अस्पृश्य पोटभेदाला भर या काळामध्ये मिळाला. व्यवसायपरत्वे अनेक जाती निर्माण झाल्या. कुंभार, लोहार, परीट, तेली, कुणबी, शिंपी, भोई, तांबोळी, लोहार, गवळी, गुरव, महार, मांग, चांभार, वाणी, कोळी अशा कितीतरी जाती केवल व्यवसायानुसार निर्माण झाल्या.

निकृष्टदर्जाची कामे करणाऱ्या वर्गाला अस्पृश्य ठरवून त्यांना वेशीबाहेर ठेवले गेले. इतर जातीच्या वर्गाच्या हातचे अन्नच काय तर त्यांच्या स्पर्शाचा विटाळ ब्राह्मणांना होत असे. देवाची पूजा करणाऱ्या गुरवाच्या हातचे  पाणीही त्यांना वर्ज होते. वेशीबाहेर राहिल्याने शूद्रांच्या  सामाजिक जीवनविकासासही अत्यंत कमी वाव होता. त्यांचे सबंध आयुष्य दारिद्र्यातच गेले. प्रत्येक जाती अंतर्गत उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ असा भाव निर्माण होऊन तो पराकोटीला गेलेला दिसतो. याचा परिणाम रोटी-बेटी व्यवहार बंद झाला व प्रत्येक व्यक्ती आपली जात बंदिस्त  करण्यासाठी धडपडू लागला. जातीसंकेताविरुद्ध वागणाऱ्याला भ्रष्ट मानून त्याला अनेक प्रकारच्या शिक्षा देऊन वाळीत टाकले जाऊ लागले. जातीनिहाय वसाहती निर्माण झाल्या. यादवकाळातच ‘गाव तेथे महारवाडा' असे चित्र निर्माण झाले. अस्पृश्यांचा स्पर्श टाळण्यासाठी त्यांना वेगळ्या विहिरी बांधल्या गेल्या. शूद्रांप्रमाणेच कोल्हाटी, गारुडी, भिल्ल या वन्य जमातींची अवस्थाही भिन्न होती. दयनीय होती. भटक्या वन्य जमाती गावाबाहेर पाल ठोकून वस्ती करत. ते सातत्याने भटकंती करत. शिकार करणे, गावातील लोकांसाठी मनोरंजनाचे खेळ करणे ही कामे ती करत व कसाबसा आपला निवारा करत. ह.श्री. शेणोलीकर सांगतात त्याप्रमाणे माणूस 'गहाण' ठेवण्याची म्हणजेच एखाद्याकडे गुलाम ठेवण्याची प्रथाही यादव काळातच सुरू झाली.

या काळात स्त्रियांच्या जीवनातही कमालीची स्थित्यंतरे आली. स्मृतिकालानंतर स्त्रियांना 'शूद्र' म्हणून लेखले जाऊ लागले. स्त्रीचे जीवन पूर्णपणे परावलंबी बनले. यात भर पडली ती परकीय आक्रमणाची. विवाहित स्त्रियांना सासुरवास व घराण्याची संस्कृती म्हणून अनेक बंधनांचे ओझे पेलावे लागत होते. विधवा स्त्रियांची स्थिती  तर अत्यंत दयनीयहोती. नवऱ्याच्या पश्चात विधवेला तिच्या भावाच्या आश्रयाने राहावे लागे. त्यामुळे भावा घरच्या अनेक कामांना तिला जुंपले जाई. सतीची चाल यादव-पूर्वकालापासून अस्तित्वात होती. पण या कालात या प्रथेला प्रतिष्ठा मिळत गेली. याचे महत्त्वाचे उदाहरण म्हणजे कामाईसा. ही रामदेवराव यादवांची पत्नी. रामदेवरावाच्या मृत्यूनंतर कामाईसेला तिच्या मनाविरुद्ध सती जावे लागले होते. तसेच विधवेचे केशवपन करण्याची चालही रुढ होती. ही चाल म्हणजे जिवंत असूनही मरणयातना भोगण्यासारखे होते. विधवेसाठी अनेक व्रतवैकल्ये व उपास- तापास, परमार्थसाधना म्हणून करावे लागत असत. हेमाद्रीच्या ग्रंथातील व्रतखंडात दोन हजार वृत्ते सांगितलेली आहेत.एकूणच विधवांची स्थिती चिंतनीय होती.

यादवकालीन लोकजीवनामध्ये विविध प्रकारचे गुन्हे घडत. या गुन्ह्याची चौकशी करून न्याय शोधण्याचे कार्य संस्कृतज्ज्ञ शास्त्रीपंडितांनाच होता. यादवकालीन धार्मिक जीवनामध्ये अनेक धर्मांचे अस्तित्व एकाच वेळी दिसून येते. बौद्ध धर्माचा प्रभाव ज्यापद्धतीने होता तसेच वाकाटककाळात वैदिक धर्मालाही राजाश्रय मिळालेला दिसतो. तर राष्ट्रकुटांच्या काळात जैन धर्माचा उत्कर्ष दिसतो. यादवकाळात अनेक धर्मपंथाचा प्रसार महाराष्ट्रभर दिसतो. जैन, नाथ, लिंगायत, महानुभाव, सुफी आणि वारकरी या पंथांनी आपापल्या संप्रदायाचे महत्त्व वाढविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. याकाळात असंख्य देवतांचा उल्लेख समकालीन महानुभाव व वारकरी संप्रदायाच्या साहित्यातून येतो. ग्रामदेवता, वन्य जमातीच्या देवतांचा यात समावेश दिसतो. वारकरी पंथाने ग्रामदेवतांना तुच्छ मानले तर महानुभाव पंथाने पौराणिक देवतांना तुच्छ मानले. अनेक देवतांचे श्रेष्ठत्व लोकांपर्यंत पोहचल्यामुळे श्रद्धेपेक्षा भीतीपोटी देवांची उपासना सामान्यांकडून घडू लागली. याचा परिणाम श्रद्धेचे स्थान अंधश्रद्धेने घेतले. भक्तीपेक्षा भीतीची भावना बळावू लागली.

यातून धर्मभोळेपणा वाढू लागला. ह. श्री. शेणोलीकर सांगतात त्याप्रमाणे देवाच्या नावावर भिक्षा सा मागणारा वर्गही यादवकाळातच निर्माण झालेला दिसून येतो.

एकूणच यादवकाल हा अनेक विषमतांची पायाभरणी करणारा काळ ठरला. वर्णव्यवस्था, जात-व्यवस्था, उच्च- निचता, स्पृश्य-अस्पृश्यता यामुळे माणूस माणसापासून विभागला गेला.

## ३.५ यादवकालीन संस्कृती

विशिष्ट एखाद्या काळातील संस्कृतीविचार मांडत असताना त्या काळातील शिक्षणव्यवस्था, खान-पान, पोशाख पद्धती, भाषा, विविध कलांची जोपासना या बाबींना ध्यानात घ्यावे लागते. यादवकालीन संस्कृतीचा आलेख आपल्याला या बाबी ध्यानात घेऊन मांडावा लागेल.

यादवकाळामध्ये पाठशाळांमधून वेदविद्येचे शिक्षण देण्यास प्रारंभ झाला. यापूर्वी वेदविद्या ही गुरुकुल पद्धतीने दिली जात असे. हा पायंडा या काळात बदलला गेला.त्या काळात संस्कृत भाषेला प्राधान्य होते. वेदांत, मीमांसा व व्याकरण यासारखे विषय संस्कृत भाषेतूनच शिकवले जात असत. पुढे तेराव्या शतकात मराठी आणि कानडी या प्रादेशिक भाषातूनही शिक्षण दिले जाऊ लागले. या काळामध्ये पैठण, नाशिक, पाटण, ठाणे, बीडही नगरे ज्ञानदान देणारी मुख्य केंद्रे होती. ज्योतिषशास्त्रविद्या, शस्त्रविद्या, अश्वारोहण विद्या, न्यायपद्धती, वैद्यकशास्त्र, व्याकरण विद्या अशा विविध विषयातील ज्ञान देणारी विद्यापीठे तेव्हा अस्तित्वात होती.

या काळात सरंजामशाही होती. काळी जमीन हे उत्पन्नाचे एकमेव साधन होते. निरनिराळ्या वर्गाचे आर्थिक हितसंबंध जमिनीशी जोडलेले होते. जमिनीतून अल्प उत्पादन मिळणे हे त्याकाळच्या आर्थिक दुरावस्थेचे प्रबळ  कारण होते. शिवाय निसर्गाचा प्रभाव त्यावर अधिक होता. एकतर पावसाचा अभाव किंवा वारंवार पडणारा पाऊस अशा दोन्ही परिस्थितीमुळे दुष्काळ पडणे व त्यातून दुःखी, कष्टमय जीवन वाट्याला येणे हे अपरिहार्य चित्र होते. ग्रामसंस्था, जातिसंस्था, धर्मसंस्था यांचा एक दबावात्मक हिस्सा, वाटा या मिळणाऱ्या उत्पन्नावर होता.

ह. जी. शेणोलीकर यांनी त्यांच्या पुस्तकामध्ये यादवकाळातील खान-पान व पोशाख पध्दतीवर काहीएक भाष्य केले आहे. या काळामध्ये खाद्यपदार्थामध्ये – पाणीभात, वरणभात, दहीभात, पालेभाज्या, पोळ्या, पुऱ्या, लाडू, घुगऱ्या, मांडे, पापड, कुरवड्या असे कितीतरी पदार्थ समाविष्ट होते. याची वर्णने आपल्याला म्हाइंभटांच्या 'लिळाचरित्रा'तून पहायला मिळतात. ज्यात जेवणाचे पान मांडल्यापासून ते तोंडात सुपारी टाकेपर्यंतची भोजनपद्धतीचे वर्णन येते. यातील पाणीभात हा आपल्या ऐकण्यात वेगळा असलेला पदार्थ. पाणीभात म्हणजे - मडक्यात पाणी घालून त्यात ठेवलेला भात. विशेषतः तो दोन-तीन दिवस टिकत असल्यामुळे दरिद्री व वाटसरूंचा हा मुख पदार्थ असे.

यादवकालीन स्त्रियांचा पोशाख हा लुगडे आणि चोळी असा होता. तर पुरुषांच्या पेहराव्यात मुख्यता आंगी म्हणजेच सदरा आणि पागोटे हे बाहेर वावरताना तर घरामध्ये धोतर आणि

उपरणे वापरत. महानुभाव वाङ्मयात जाडी (सतरंजी) पासवडी (पासोडी), घोंगडे, कांबळ, वाकळ यासारख्या वस्त्रांचा उल्लेख आढळतो. स्त्री अलंकारामध्ये मुदी, टोळबंदी, काकणे, कळाव्या, पागडे, गळ्यातील साखळी, हातात सोन्याचे दोरे, पायवटे, सीसफूल, भवरीया यासारख्या मौल्यवान दागिन्यांचा उल्लेख येतो.

या काळात नृत्य व संगीत कलांचा विकास दिसतो. ओवी, अभंग यासारखे बंदबद्ध लोकसंगीताचे - साहित्याचे प्रकार याच काळात उदयास आले. पुढे नामदेवांनी अभंगाला व ज्ञानेश्वरांनी-महानुभावांनी ओवीला प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यातील छंदाचे रूप निश्चित केले. या कलेप्रमाणेच शिल्पकला वास्तुशास्त्र व हस्तउद्योगांचे उन्नतरूप या काळात दिसते. या आधीच्या काळात कोरीव लेण्याची कला तर होतीच. पण या कलेला मागे ठेवून मंदिरे बांधण्याची कला या काळाने विकसित केली. याचे उत्तम उदाहरण म्हणजे रामदेवराव यादवाचा प्रधान हेमाडपंत याने महाराष्ट्रात अनेक ठिकाणी बांधलेली मंदिरे होत. त्याने विकसित केलेली वास्तुशिल्प पद्धत अनोखी होती. म्हणूनच या पद्धतीला 'हेमाडपंती शिल्पपद्धत'म्हटले जाते. सिन्नर, झोडगे, अंबरनाथ, बळसाणे, औंढे नागनाथ, महेश्वर, मेहेकर या ठिकाणची मंदिरे ही हेमाडपंती शिल्पकलेची उत्तम उदाहरण आहेत.

एकूणच यादवकाळातील सांस्कृतिक विकासाच्या अनेक खुना दिसून येतात. इथे आपण खूप तपशिलाने त्याचा विचार केला नसला तरी उपरनिर्दिष्ट बाबींतून यादवकाळ हा मांस्कृतिकदृष्ट्या कसा समृद्ध होता याचा पुरावा मिळतो. याबाबत शेणोलीकर म्हणतात, “खास मराठ्यांची किंवा महाराष्ट्राची सांगता येतील अशी वैशिष्टये यादवकालात उदयास आली." (शेणोलीकर, पृ. १०३) म्हणजेच या काळातय ही उदयास आलेली ही संस्कृतीची वैशिष्ट्ये आजही संबंध महाराष्ट्रभर विखुरलेली दिसतात. ती अजूनही जतन केली जातात.

## ३.६ यादवकाळात उदयास आलेले संप्रदाय

यादवकाळावील धार्मिक स्थित्यंतरे ही उल्लेखनीय आहेत. वैदिक परंपरेसोबतच अ-वैदिक किंवा वेद परंपरेतील अवडंबर नाकारणारी परंपराही याच काळात उभी राहिली. या काळाने जैन, लिंगायत, महानुभाव, सूफी अशा विविध संप्रदायांच्या उदय-विकासाला हातभार लावला. यातील महत्त्वाच्या संप्रदायांचा आढावा आपण घेऊ.

### ३.६.१. नाथ संप्रदाय -

नाथपंथ हा मूलचा शैव संप्रदायी पंथ आहे. उत्तरेकडील काश्मिरी शैव संप्रदाय हा दक्षिणेकडील शैव संप्रदायातील उपासनेबाबत कडवा नव्हता. याउलट शिव आणि विष्णू यांच्या ऐक्याचा प्रसार-प्रचार त्यांनी केला. त्यामुळे दक्षिणेत व इतर काही प्रांतामध्ये शैव-वैष्णव असे झगडे चालायचे तसे ते महाराष्ट्रात होत नव्हते. त्यामुळेच पुढे नाथ- पंथीय ज्ञानेश्वरांनी शीव-वैष्णव ऐक्याच्या वारकरी पंथाची उभारणी केली. नाथपंथात गुरुभक्ती, ईश्वरभक्ती, त्यानंतर कृष्णभक्ती असा उपासनामार्गाचा पुरस्कार केलेला दिसतो. म्हणूनच नाथभक्त ज्ञानेश्वरांचे गुरुबंधू निवृत्तीनाथ यांना गहिनीनाथांनी बालकृष्ण-भक्तीचीही दीक्षा दिली होती. नाथसंप्रदायाचे सर्व उपासक हे सातत्याने भ्रमण करत असत. त्यामुळे त्यांना अनेक भाषा अवगत झाल्या होत्या. ते बहुभाषी होते. ते ज्या ज्या प्रदेशात जायचे तिथल्या बोलीचा ते आदराने स्वीकार करायचे. संस्कृतपेक्षा प्रादेशिक भाषेला - लोकभाषेला ते

प्रोत्साहन द्यायचे. त्या भाषांमध्येच वाङ्मय निर्माण करायचे. म्हणूनच भारताच्या प्रत्येक भागामध्ये नाथसंप्रदायाचा प्रभाव दिसून येतो.

नाथ संप्रदायातील महत्त्वाचे पुरुष म्हणजे गोरक्षनाथ होय. गोरक्षनाथांचा संचार हा सबंध भारतात होता. त्यांनी त्यांच्या 'महार्थमंजिरी या ग्रंथामध्ये नाथ संप्रदायाचे तत्त्वज्ञान व आचार विचारांचे यथार्थ दर्शन घडविलेले आहे. या खेरीज त्यांचे 'गोरक्षगीता','सिद्धसिद्धांतपद्धती', 'सिद्धसिद्धांतसंग' हे त्यांचे ग्रंथ असल्याचे सांगितले जाते. गोरक्षनाथांच्या नावावर साठ-सत्तर ग्रंथ असले तरी काही पदे आणि 'अमरनाथ संवाद' व 'गोरक्षगीता ही दोनच ओवीबद्ध प्रकरणे मराठीत उपलब्ध असल्याचे दिसते.मच्छिंद्रनाथ-गोरखनाथ यांच्या नात संप्रदायात जालंधरनाथ, कानिफनाथ, चर्पटीनाथ, रेवननाथ, चौरंगीनाथ, गहिनीनाथ इत्यादी ८४ सिद्धांची नावे भिन्नभिन्न परंपरा एकत्र करून सांगितली जातात.मत्सेंद्रनाथ, गोरक्षनाथ व गहिनीनाथ हे नाथ संप्रदायातील सिद्धपदाला पोहचलेल्या चारित्र्यवान व्यक्ती होत. गोरखनाथ हे मत्सेंद्रनाथांचे शिष्य होत. त्यांचा कालखंड इ.स. १०५० ते ११५० असा असल्याचे रा. चिं. ढेरे यांनी नमूद केले आहे. गोरक्षनाथ हे मध्ययुगीन भारतातील एक प्रभावी व्यक्ती होत.

या संप्रदायात कुंडलिनीची जागृती, कठोर ब्रह्मचर्य पालन, वाक्संयम, शारीरिक व मानसिक शुद्धता, ज्ञाननिष्ठा, बाह्य अवडंबराबद्दल तिटकारा, मद्यमांसबंदी, सद्गुरूचा महिमा इत्यादी गोष्टी आचारधर्म म्हणून पाळल्या जातात. किंगरी, मेखला, जाणवे, शृंगी, कथा, दंडा खापरी, अधारि असे या पंथीयांच्या बाह्य वेषाचे स्वरूप आहे. 'हठयोगप्रदीपिका', 'सिद्धसिद्धांतसंग्रह', गोरक्षकृत 'सिद्धसिद्धांतपद्धती' हे या पंथाचे प्रमुख ग्रंथ होय. प्रयाग, आयोध्या, द्वारका, हरिद्वार, बद्रीनाथ, केदारनाथ, वृंदावन, पुष्कर, रामेश्वर, अमरनाथ, पशुपतिनाथ, हिंगलाज, त्र्यंबकेश्वर ही या पंथीयांची तीर्थयात्रेची ठिकाणी होत.

नाथ संप्रदायाचा प्रभाव मुकुंदराजी नाथपरंपरा, चक्रधरांचा महानुभव पंथ आणि ज्ञानेश्वर संप्रदाय यावरती आपल्याला दिसून येतो. अद्वैत तत्त्वज्ञान, योग मार्ग, गुरुभक्ती, भक्तियोग, प्रादेशिक भाषेचे माध्यम यासंबंधी नातपंथीयांनी घालून दिलेला कित्ताच पुढे या पंथांनी चालवलेला दिसतो. त्यामुळे या तिन्ही पंथांमध्ये ऐक्यभाव वर्णन करताना रा. चिं. ढेरे म्हणतात, "गोरक्षनाथांचा विराट आत्मा चक्रधरांच्या नाडीतून वाहात आहे; ज्ञानेश्वरांच्या श्वसनातून दरवळतो आहे... समग्र संतवाणीतून गंगेसारखा धावत आहे; यात शंका नाही. (उद्धृत, ह. श्री. शेणोलीकर, पृ. १५६) म्हणून महाराष्ट्राच्या संस्कृतीमध्ये नाथपंथाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.

तत्कालीन महाराष्ट्रात महानुभाव व वारकरी पंथाच्या उदयापूर्वी नाथपंथाचा प्रभाव अधिक होता. तसेच वारकरी व महानुभाव पंथाशी निकटचा संबंध होता. चक्रधरांचे गुरु गोविंदप्रभू म्हणजेच गुंडम राऊळ हे नाथपंथी चांगदेव राऊळांचे शिष्य होते. तसेच चक्रधर संप्रदायाचे संघटक नागदेवाचार्य हा पूर्वाश्रमीचा नागेंद्र. याला हरिनाथांनी प्रथम नाथपंथाची दीक्षा दिली होती. तर ज्ञानेश्वरांचे गुरुबंधू निवृत्तीनाथ हे नाथपंथी होते. पुढे 'विवेकसिंधु'कार मुकुंदराज हे देखील नाथपंथीयच होते. ते आपली परंपरा आदिनाथ- हरिनाथ - रघुनाथ - मुकुंदराज अशी सांगतात. एकूणच काय तर या तिन्ही परंपरांवर नाथ संप्रदायाचा प्रभाव दिसून येतो.

नाथसंप्रदायाचे योगदान नोंदविताना ह. श्री. शेणोलीकर म्हणतात, “अद्वैत तत्त्वज्ञान, योगमार्ग, गुरुभक्ती, कृष्णभक्ती, सामाजिक बाबतीतील उदार समावेशक दृष्टी आणि देशी भाषेतील वाङ्मयनिर्मिती या गोष्टींचे बाळकडूच नाथपंथीयांकडून या संतमहंतांना मिळाले होते. हेच नाथपंथाचे महाराष्ट्रातील लोकोत्तर कार्य होय.” (ह.श्री. शेणोलीकर, 'प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप')

## ३.६.२. महानुभाव संप्रदाय / पंथ–

महानुभाव संप्रदायाचे मूळ नाव 'परमार्ग' असे होते. शं. गो. तुळपुळेयांच्या म्हणण्यानुसार या संप्रदायाचे ‘महानुभाव’असे नाव पहिल्यांदा संत एकनाथांनी वापरले. या संप्रदायाचा उद्याचा काळ म्हणजे यादवकाळ होय. या काळामध्ये वैदिक धर्माला राजाश्रय मिळाला होता. त्यामुळे या धर्माचे प्रस्थ वाढले होते. अर्थातच चातुर्वर्ण्य व्यवस्थेला खतपाणी घातले गेले होते. यामुळे श्रेष्ठ-कनिष्ठ, उच्च-नीच हा भाव वाढल्याने चातुर्वर्ण्य व्यवस्थेतील तळच्या वर्गातील लोकांचे जीवन गुलामासारखे होते. यातून अशा सर्वसामान्यांना बाहेर काढण्यासाठी वैदिक तत्त्वज्ञानाला नकार महानुभाव पंथाने दिला. ज्ञान आणि भक्ती यांचा समन्वय साधणारे तत्त्वज्ञान या पंथाने सांगितले. तत्काळात विविध देवी-देवतांचे, त्यास अनुसरून येणाऱ्या कर्मकांडांचे, धर्मभोळेपणाचे स्तोम त्यांनी कमी केले. देवतांच्या पूजेचा निषेध केला. फक्त उच्चवर्णीयांनाच पंथाची दिक्षा घेण्याचा त्याकाळात प्रघात होता तो डावलून त्यांनी आपल्या पंथाची दीक्षा स्त्री- शूद्रातिशूद्र बहुजनांनाही दिली.

महाराष्ट्रात उगम पावलेल्या या पंथाचा प्रसार उत्तर भारतात पंजाब आणि काश्मिरपर्यंत झाला. या पंथाचे सर्वेसर्वा चक्रधर स्वामींना मानले जाते. पंचकृष्ण -म्हणजेच श्रीकृष्ण, श्रीदत्तात्रेय, श्रीचक्रपाणी, श्रीगोविंदप्रभू, श्रीचक्रधर हे यातील पाच कृष्ण अवतार मानले जात असून चक्रधर हे त्यातील पाचवा अवतार मानले जातात. महानुभाव पंथाचे मूळ पुरुष हे श्री गोविंदप्रभू उर्फ गुंडमराऊळ हे होत. पण या पंथाचे प्रणेते हे श्री चक्रधर स्वीमींनाच मानले जाते.

### ३.६.२.१ श्री चक्रधर स्वामी – (चक्रधरांचा कालखंड (इ. स. ११९४ ते १२७२)

श्रीचक्रधरांचे मूळ नाव हरपाळदेव. ते मूळचे गुजरात मधील. यादवराज सिंघणाने भाडोचवर स्वारी केली तेव्हा हरपाळदेव त्यांच्याशी लढला. वयाच्या सत्तावीसाव्या वर्षी श. ११४३ मध्ये त्यांचे निधन झाले. यावेळी फलटणच्या श्री चांगदेव राऊळ यांनी त्यांच्या मृत शरीरात प्रवेश केला व तो पुन्हा जिवंत झाला. द्युताचा (जुगाराचा) त्यांना नाद होता. त्यात हसल्यामुळे व पत्नी कमलादेवी हिच्याशीबेबनाव झाल्याने ते रामटेकच्या यात्रेचे निमित्त करून ऋीधपूरला गेले. तिथे गेल्यानंतर श्री गोविंदप्रभूंची भेट झाली. त्यांनी त्यांचे नाव चक्रधर असे ठेवले. त्यानंतर त्यांनी सालबर्डीच्या डोंगरात मौन पत्करून बारा वर्षे तपश्चर्या केली. त्यावेळी मुक्ताबाई नामक योगिनीने त्यांची सेवा केली. कांतीनगरी येथे उधळीनाथ नामक योग्याकडून चक्रधरांना ‘वयस्तंभिनी विद्या' मिळाली. यानंतर त्यांनी बराच काळ देशाटनात घालवला. बारा वर्षाच्या तपश्चर्येनंतर ते वोरंगळला आले व तिथे हंसांबा नामक मुलीशी लग्न केले. पुन्हा वैराग्य आल्याने त्यांनी संन्यासदीक्षा घेतली व देशाटन सुरू केले. सुरुवातीच्या काळी त्यांचे रामदेव, विद्यावंत उर्फ दादोस, बोणेबाई व नागुबाई (बाईसा) हे शिष्य होते.याठिकाणी चक्रधरांची एकाकी (एकाक) अवस्था संपते. दत्तात्रेयाच्या दर्शनानंतर

ते नागदेवचार्याच्या अनुसरणापर्यंत पंथप्रसाराचा पूर्वार्ध संपतो. या अवधीत त्यांना ५०० अनुयायी मिळतात. यात १३ स्त्रियांचाही समावेश होता.

ह. श्री. शेणोलीकर व वा. ना. देशपांडे लिखित 'महाराष्ट्र संस्कृती' या ग्रंथामध्ये चक्रधरांच्या निर्वाणाबाबतचे महत्त्वपूर्ण विविचन येते. तत्कालीन महाराष्ट्रामध्ये वैदिक धर्म, चातुर्वर्ण्य व देवतोपासनेचा अभिमान दृढमूल झाला होता. त्याविरोधी नवा धर्म सांगणाऱ्याला शास्त्रीपंडितांकडून निकराचा विरोध होई. अशा व्यक्तीचा हरतऱ्हेने छळ केला जाई. हा छळ चक्रधरांच्याही वाट्याला आला.  ब्रह्मसानू व महदाश्रम या राजपुरोहितांनी मत्सरभावाने चक्रधरांवर दोनदा विषप्रयोग केला. यंत्रासनपूजेचे वेळी त्यांचा बळी देण्याचे कारस्थान महदाश्रमाने  रचले पण ते व्यर्थ गेले. तेव्हा पाखंडी मताचा प्रसार करण्याच्या गुन्ह्यादाखल प्रथम अवयवविच्छेदनाची शिक्षा व नंतर राजाकडून देहान्ताची शिक्षा चक्रधरांना देण्यात आली. बेलापूर तळ्याजवळ मारेकऱ्यांनी स्वामींना मारले. त्यानंतर स्वामींचे धड व शिर एकत्र झाले. स्वामी चालू लागले. उज्जैनीच्या व्यापाऱ्यांना ते दिसले. त्यांनी'उत्तरापंथे बीजे केले' अशी चमत्कारकथा सांगितली जाते. (ह.श्री.शेणोलीकर : २०२१ : पृ.१६३) या घटनेतील चमत्काराचा भाग सोडला तर तत्काळात वैदिक-अवैदिक हा संघर्ष होताच. त्यामुळे वैदिक धर्माचा पुरस्कार करणारा हेमाद्री  आणि अवैदिक मार्ग सांगणारे चक्रधर यांच्यातील संघर्ष हा अटळ होता हे ध्यानात येते.

एकूणच चक्रधरांनी मांडलेली विचारसरणी ही सर्वसामान्यांना आपलीशी वाटणारी होती. त्यामुळे ते स्त्री-शूद्रातिशूद्र बहुजनांमध्ये लोकप्रिय ठरले होते. याचा मत्सर तत्कालीन पुरोहित व वैदिक परंपरेला मानणाऱ्या लोकांना होता. यातूनच त्यांच्यावर अनेक घातपाताचे प्रसंग ओढवले. इ. स.१२७६मध्ये त्यांचे 'उत्तरापंथे गमन' म्हणजेच निर्याणकाल समजला जातो.

### ३.६.२.२ महानुभावांचे तत्त्वज्ञान -

चक्रधर स्वामींनी त्यांच्या शिष्यांना अनेक प्रसंगी, वेळोवेळी जी तत्त्व, वचने सांगितली त्यांचे संकलन 'सिद्धांत सूत्रपाठ' या ग्रंथामध्ये केलेले आहे. हा ग्रंथ म्हणजे महानुभव संप्रदायाचा वेद होय. यातील तत्त्वज्ञान हे सूत्रानुरूप आहे. यातील सूत्रांची संख्या १६०९ असून यांचे लक्षणपाठ, आचारमालिका, विचारमालिका या भागात  केसोबासांनी वर्गीकरण केले आहे.

- या पंथात श्रीकृष्ण व दत्त या देवतांना मान्यता आहे. पंथाच्या तत्त्वज्ञानानुसार त्याच्याकडे ते द्वैती दृष्टीनेच पाहतात.
- महानुभाव जीव, देवता, प्रपंच व परमेश्वर या वस्तू मुख्य व नित्य अशा मानतात. यासंदर्भात त्यांनी सांगितलेले सूत्र म्हणजे 'देवता या नित्यबद्ध आहेत, जीव बद्धमुक्त आहेत, परमेश्वर नित्यमुक्त आहे व प्रपंच अनित्य आहे.

जीव बद्धमुक्त असणे म्हणजे बद्ध असूनही मुक्तीस पात्र असणारा असा. त्याला मायेचे बंधन नसते. देवता नित्यबद्ध  आहेत म्हणजे देवता ज्ञान, आनंद, ऐश्वर्य देऊ शकल्या तरी त्या परमेश्वर होऊ शकत नाहीत. आणि मोक्ष हा परमेश्वराकडूनच मिळत असतो. म्हणूनच त्यांनी देवतांची पूजा नाकारली. ईश्वर हा अनादि, नित्य, स्वयंप्रकाशी, सर्वव्यापी, आनंददायी असतो. तर प्रपंच हा अनित्य असल्याचे महानुभाव सांगतात. एकूणच आत्मा हा बद्ध असला

तरी त्याची मुक्ती ही परमेश्वराधनेने होऊ शकते असे महानुभव मानतो. म्हणूनच आत्मा आणि परमात्मा म्हणजेच  परमेश्वर हा दोन्ही गोष्टी वेगळ्या आहेत. दोन आाहेत म्हणून हा पंथ द्वैती होय.

- चक्रधरांच्या तत्त्वज्ञानात आत्मज्ञान, भक्ती आणि गुरुकृपा याला महत्त्वाचे स्थान आहे. पण असे असूनही  गुरुवर प्रीती करावी पण त्याला परमेश्वर मानू नये असेही ते नेमकेपणाने सांगतात.

महानुभाव चार युगांचे चार अवतार मानतात. कृतयुगात हंसावतार, त्रेतायुगात- दत्तावतार, द्वापारयुगात - कृष्णावतार, कलियुगात- चक्रधरावतार हे ते अवतार होत. तर श्रीकृष्णप्रभू, श्री दत्तात्रेयप्रभू, श्री चक्रपाणी महाराज, श्री गोविंदप्रभू (गुंडम राऊळ) व सर्वज्ञ-श्री चक्रधरस्वामी असे हे पंचकृष्ण मानले जातात. चक्रधरांच्या वचनांना ‘श्रुती’म्हटले  जाते. तर नागदेवचार्यांच्या वचनांना ‘स्मृती’म्हटले जाते.

### ३.६.२.३ महानुभावांचा आचारधर्म

हा प्रामुख्याने साधकांचा पंथ आहे.त्यामुळे या पंथातील शिष्यांसाठी कडक नियम आणि आचारधर्म होते. या पंथात संन्यस्त व गृहस्थ असे शिष्यांचे दोन वर्ग होते.

- संन्याशासाठी नित्य भ्रमंती, भिक्षाभोजन करावे; एकांतवास पत्करून परमेश्वराचे नामस्मरण करावे असे नियम होते. “'कर्म धर्म विधि : विखो : परित्यजौनि परमेश्वरा शरण रिगावे' जीवेश्वर भेद, भक्तियोग, संन्यास व अहिंसा या चार प्रमुख तत्त्वांच्या आधारावर महानुभावांचा आचारधर्म उभा आहे. (ल. रा. नसिराबादकर : २००६ : पृ. १९)
- महानुभाव पंथाच्या साधकानेसर्वसंगपरित्यागकरूनएकांतवासघ्यावा. खूप दिवस एकाच जागेवर राहून एका स्थानाची सवय नसावी. सतत भ्रमंती करावी. या पंथात साधकांसाठी स्त्रीचे दर्शन वर्ज्य मानले गेले. ज्या गोष्टीतून विकार उत्पन्न होतात त्यांना पाहणे टाळावे हा नियम असल्या कारणाने स्त्रीचे दर्शन वर्ज्य केले गेले.
- महानुभावीयांना नुसतेवैराग्यमान्यनाही. तर ते वैराग्य ज्ञानयुक्तअसावे असे सांगितले गेले. 'ज्ञानेविण वैराग्य ते काई करावे बापेया' असा त्यांचा प्रश्न आहे. आपल्या वैराग्याचे प्रदर्शन न करता केवळ 'मनुष्यमात्र होऊनि असावे.' ' जीवासि वैराग्य मिरउं आवडे हाही एक विकारुचि की गा:' (ल. रा. नसिराबादकर : २००६ : पृ. २०) म्हणजेच जे लोक वैराग्य घेऊन मिरावतात, त्याचे प्रदर्शन करतात तो एक विकारच असल्याचे ते सांगतात. तसेच या वैराग्यात ईश्वरस्मरणावर त्यांचा अधिक भर होता.
- अहिंसा हे महानुभावीय चतुःसूत्रीतील महत्त्वाचे तत्त्व. या अहिंसेचे पालन,'तुमचेनि मुंगी रांड न होआवी' अशा रीतीने करावे असे ते सांगतात. म्हणजेच सर्वात सूक्ष्म जीवाचाही विचार करावा. त्याच्या बाबतीतही अंहिसेचे तत्त्व पाळावे असे ते सांगतात.
- भिक्षा मागतानाही  काही पथ्ये महानुभावात सांगितली आहेत. भिक्षा घेण्यासाठी घर निवडू नये. भिक्षेच्या आशेने ओळखीच्या घरी आणि तोरण लावलेल्या घरी मुळीच जाऊ नये. भोजन हे केवळ देह उभा ठेवण्यासाठी आहे म्हणून भिक्षेचे अन्न ग्रहण करताना त्याची चव घेऊ नये. ते 'नावडत नावडत' सेवावे असे हा पंथ सांगतो.

- काम, क्रोध, लोभ ही तिन्ही नरकद्वारे आहेत. काम, क्रोध, मद, मत्सर यांचा त्याग म्हणजेच संन्यास. अहंकार सोडून द्यावा. म्हणून 'अहंतेचे मूळ सकंदी उपडावे :' असे या पंथात सांगितलेले आहे.

### ३.६.३ लिंगायत संप्रदाय

नाथ व लिंगायत हे दोन्ही संप्रदाय शिवाचे उपासक आहेत. या दोन्ही संप्रदायाचा प्राचीन महाराष्ट्राशी जवळचा संबंध आलेला दिसतो. नाथपंताने महाराष्ट्रातील व त्यानंतर उदयास आलेल्या इतर संप्रदायांवरती एक प्रभाव टाकलेला होता. पण लिंगायत संप्रदायाचे तसे झाले नाही. लिंगायत पंथ/संप्रदाय हा कर्नाटक महाराष्ट्राच्या सीमाभागामध्ये अधिकतेने प्रसारित झालेला दिसतो. यामध्ये बेळगाव, कोल्हापूर, सांगली, सोलापूर या दक्षिण महाराष्ट्राच्या भागात व बिदर कल्याणकडील पूर्व महाराष्ट्रात वीरशैव लिंगायत यांची बरीच संख्या आढळते. महाराष्ट्रामध्ये जी अनेक शिवाची मंदिरे आहेत त्यामध्ये अजूनही काही पुजारी हे जंगम असल्याचे दिसतात. तसेच वाणी आणि कोष्टी यासारखे लिंगायतपंथी व्यावसायिकही सबंध महाराष्ट्रात विखुरलेले आहेत. वीरशैवपंथाचे प्रणेते हे अल्लमप्रभू होते. अल्लम प्रभू व नाथपंथाचे प्रवक्ते गोरक्षनाथ हे दोघे गुरुबंधू होत. अल्लम प्रभुनी गोरक्षनाथांना 'कायासिद्धीची तुच्छता' पटविली असे सांगितले जाते. अल्लम प्रभूनी हठयोगावर अवास्तव भर देण्याच्या कारणावरून त्यांनी नाथपंथावर टीका केली व आपले वेगळे तत्त्वज्ञान मांडले. अल्लम प्रभूंच्या भेटीनंतर गोरखनाथ यांनी रचलेली वचने कानडीमध्ये प्रसिद्ध आहेत. ज्ञानेश्वरांच्या विचारातही वीरशैव संस्काराच्या खुणा आपल्याला दिसतात.

अल्लम प्रभूंनी मांडलेली वीरशैव प्रणाली त्यांचे शिष्य रेवणसिद्ध व मरुळसिद्ध या शिष्यपरंपरेने बसवेश्वरांपर्यंत आणलेली दिसते. यानंतर इ.स.११६० च्या सुमारास बसवेश्वराने वीरशैव किंवा लिंगायत पंथाला एक निश्चित असे स्वरूप दिलेले दिसते. या सुमारास आंध्र- कर्नाटक महाराष्ट्रात 'लाकुलीश पाशुपत संप्रदायाचा' मोठ्या प्रमाणात प्रसार झालेला होता. या संप्रदायातील विद्वान आचार्यांनी मंदिरांची स्थापना, जलाशयांची निर्मिती, अन्नदान व शिक्षण केंद्रे उभी करणे यामध्ये पुढाकार घेतला होता. ही गोष्ट सर्वसामान्यांच्या हिताची असल्याकारणाने महाराष्ट्रात व कर्नाटकमध्ये या संप्रदायाचा प्रभाव आपल्याला दिसतो. महाराष्ट्रामध्ये उत्तर चालुक्यांच्या कारकीर्दीत बौद्ध धर्माचा प्रभाव व जैन धर्माची भरभराट थांबली होती आणि जैन धर्माचा प्रतिस्पर्धी असा वीरशैव लिंगायत पंथ पुढे आला. दुसऱ्या तैलप राजाचा बंडखोर सेनापती बिज्जल कलचुरी याने स्वतंत्र राज्य स्थापले. तो जैन धर्मी होता. तर त्याचा ब्राह्मण प्रधान बसवेश्वर हा शैव उपासक होता. धार्मिक तंट्यामध्ये बिज्जल मारला गेला. त्यानंतर बसवेश्वरांनी संगमेश्वरपाशी शिवस्वरूप धारण केले व त्यांनी मोठ्या हिरीरिने लिंगायत पंथाचा प्रचार व प्रसार केला.

#### ३.६.३.१ म. बसवेश्वर -

महानुभव पंथामध्ये चक्रधरांची विचारसरणी जशा पद्धतीची क्रांतिकारक होती तशीच बसवेश्वरांची विचारसरणी ही क्रांतिकारक होती. त्यांनी गुणहीन ब्राह्मणांच्या वर्चस्वाला नाकारले. तसेच धर्मज्ञान घेणे ही केवळ कोणत्याही एकाच जातीची मिरास नाही असा

निर्वाळा दिला. लोकशिक्षणासाठी त्यांनी लोकभाषा कानडीचा अवलंब करण्यास सुरुवात केली. आध्यात्मिक उन्नतीकरता संन्यास किंवा शारीरिक कष्ट(तप) याची अनावश्यकता त्यांनी नोंदवली. तत्काळामध्ये जातीभेद, अस्पृश्यता यासारख्या अनेक रूढी होत्या. या रुढींना त्यांनी कडाडून विरोध केला व समतेचा पुरस्कार केला. तसेच त्यांनी बालविवाहाला विरोध करून मिश्रविवाह, विधवा पुनर्विवाह यासारख्या पुरोगामी विचारांची पाठराखण केली. महात्मा बसवन्ना यांची ही विचारसरणी एका सुधारकाच्या विचारसरणीसारखी होती आणि म्हणूनच महात्मा बसवेश्वर यांना मध्ययुगातील विषमतेला विरोध करणारे एकमेव वीरभक्त मानले जाते.

### ३.६.३.२ लिंगायत तत्त्वज्ञान-

वीरशैवांना शंकराचार्यांनी सांगितलेला मायावाद मान्य नाही. शंकराचार्यांनी ज्याप्रमाणे सृष्टीला माया म्हणजेच मिथ्या असे मांडले. वीरशैवांना हे मान्य नसण्याचे कारण म्हणजे सृष्टी ही शिवनिर्मित आहे. त्यामुळे ती मिथ्या असू शकत नाही असे त्यांचे मतैक्य आहे. वीरशैव साधकाला शिवाशी ऐक्य संपादन करण्याच्या मार्गात गुरुची अत्यंत आवश्यकता असते असे सांगून त्यांनी गुरुचे महत्त्व पटवून दिले आहे. त्यासाठी जंगमांचा पुरोहितवर्ग निर्माण झाला. इतर भक्तिमार्गी पंथाप्रमाणे हाही गुरुमार्ग होय. वीरशैव संप्रदायात भक्ती व नीती या तत्त्वांना विशेष महत्त्व आहे. त्यांनी मूर्तीपूजा व तीर्थयात्रा या रूढ मार्गांवर टीका केली असून जंगमालाच जगदीश्वर मानले. पंचसुतकाचे बंधन, जातीभेद, स्त्रियांची शिवाशिव, अग्निपूजा, प्रेतसंस्कार इत्यादी गोष्टी वीरशैव म्हणजेच लिंगायत पंथ मानत नाही. हिंदू कर्मकांड व संस्कार यांचा त्यांनी त्याग केला असून चातुर्वर्ण्य, जातींची उच्चनीचता, स्त्री-पुरुष लिंग विषमता या कल्पनांना त्यांनी कडाडून विरोध केलेला दिसतो. म्हणूनच महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जातीतील स्त्री पुरुष या संप्रदायाकडे आकर्षित झालेले दिसतात. 'वीरशैवधर्मनिर्णयटीका' व 'अंष्टावरणटीका' हे दोन ग्रंथ सत्यात्मजांनी यांनी लिहिले असून यामध्ये वीरशैव सिद्धांत व आचारधर्म सांगितलेले आहेत. महाराष्ट्राच्या संस्कृतीत लिंगायत संप्रदायाचा मोठा वाटा असल्याचे दिसून येते. (संदर्भ - ह. श्री. शेणोलीकर, पृष्ठ १५६)

### ३.६.४ जैन संप्रदाय

जैन संप्रदायाची उत्पत्ती ही मराठी भाषेच्या उदया पूर्वी असल्याचे सांगितले जाते. या पंथाचे प्राकृत भाषेतील साहित्य विपुल असून तेराव्या १४व्या शतकापर्यंत महाराष्ट्रातील जैन साहित्याच्या निर्मितीत खंड पडलेला नव्हता. "महाराष्ट्राचे साहित्य, शिल्प व कलावैभव समृद्ध करण्यात बौद्ध आणि जैन या दोन पंथाचा वाटा सिंहाचा आहे." (श्रीधर रंगनाथ कुलकर्णी, पृष्ठ ८७)या संप्रदायाची तत्त्वप्रणाली आणि आचारधर्म हा वैदिक परंपरेपेक्षा वेगळा होता. महाराष्ट्रामध्ये प्राकृत आणि अपभ्रंश भाषातून साहित्य निर्मिती करणाऱ्या जैन परंपरेतच मराठी भाषेचे पहिले उल्लेख आढळतात. या भाषेतून साहित्य निर्मिती करणारे जैन कवी आणि लेखक हे विदर्भ मराठवाड्यातील होते. आजही या भागामध्ये जैनांची अनेक तीर्थस्थाने आपल्याला दिसून येतात. मराठीमध्ये लिहिलेले जैन साहित्य हे पंधराव्या शतकापासूनचे उपलब्ध आहे पण याआधी लिहिलेले साहित्य हे प्राकृत आणि अपभ्रंश भाषेतले असलेले दिसून येते. जैन परंपरेमध्ये लिहिलेला ब्रह्मगुणदास यांचा १४५० मधला ग्रंथउपलब्ध आहे.

### ३.६.५ सूफी संप्रदाय/पंथ -

सूफी संप्रदाय हा परधर्मी भक्तीपंथ आहे. इस्लाम धर्मातील हा एक भक्तीपंथ असून या पंथांनी यादवकाळातच प्रसाराचे कार्य महाराष्ट्रात केलेले दिसते. अब्दुल जब्बार मल्कापुरी या सुफी गृहस्थाने दक्षिणेतील अवलीयांचा परिचय करून देणारा हजार पानांचा ग्रंथ लिहिला आहे. त्यामध्ये साडेपाचशे सुफींचा उल्लेख आहे. त्यात तेराशे पूर्वीच्या ८-१० फकीरांची व धर्मप्रसारकांची नावे आहेत. मोमीन आरिफ, जलालुद्दीन गंजखां, बाबा शर्फुद्दिन, बाबा शम्सउद्दीन यांनी दौलताबाद, हैदराबाद या भागात इस्लाम धर्माचा प्रसार सुरू केला. ह्यात कलंदरने मंगरूळ येथून वऱ्हाड भागात इस्लामचा प्रसार केला. या सर्व मंडळींनी तेथील स्थानिक राज्यांशी व हिंदू लोकांशी झटपटी करूनच आपले बस्तान बसविले असे दिसते. त्यांच्या या धर्मप्रसाराला तत्कालीन राज्य सत्तेचे पाठबळ होते. यासंदर्भात सेतू माधवराव पगडी असे म्हणतात, "मुसलमानांची राजवट दोन प्रकारची होती एक बादशहा, सुलतान, अमीर-उमराव यांची आणि दुसरी मठातील सूफी साधूंची. बादशहांनी आणि सुलतानांनी देशावर राज्य केले तर या सुफी साधूनी लोकांच्या मनावर प्रभाव गाजविला." (सेतुमाधवराव पगडी, पृष्ठ १०४, १९९३)

#### ३.६.५.१ सूफी संप्रदायाचे तत्त्वज्ञान-

मानवाने सर्व सुखे व लागेबांधे तोडून जर कठोर तपश्चर्या केली तर ईश्वराचा साक्षात्कार झाल्या वाचून रहात नाही हे सूफी संप्रदायाचे मूळ उद्दिष्ट होते. सर्वसंगपरित्याग व परमेश्वर चिंतन यावर त्यांचा कटाक्ष होता. काही अभ्यासक असे सांगतात की, सूफी पंथावर वेदांतमताचा प्रभाव पडला असावा. सूफी संप्रदायाचा नाथ संप्रदायाशी व महानुभाव संप्रदायाशी संबंध आला होता यातून याचा एक परस्पर संबंध सूफी संप्रदायातील तत्त्वज्ञानामध्ये दिसून येतो. त्यामुळे द्वैत आणि अद्वैत याचे मिश्रण सूफी संप्रदायामध्ये पाहायला मिळत असले तरी सूफी संप्रदायाचे प्रसारक हे कट्टर मुस्लिम असल्याचे सेतूमाधवराव पगडी आपल्या विवेचनात सांगतात. सूफी पंथातील बऱ्याच कल्पना या भारतातील धर्मपंथाशी जुळणाऱ्या होत्या यामध्ये गुरुभक्तीचे महत्त्व गायलेले आपल्याला पाहायला मिळते. नाम:स्मरण, प्राणायाम व ध्यानधारणा या तिन्हीचे महात्म्य सूफी संतांनी विस्ताराने दिलेले दिसते. नमाज, कुराणपठण (तिलावत) व विशेष प्रार्थना (आवराय) नियमित करण्यावर सूफी संतांचा विशेष कटाक्ष होता. परमेश्वर गीत गायनाने परमेश्वराची आराधना (समा)आणि गुरूच्या पायावर डोके ठेवून वंदन (सिजया) या दोन प्रकारांमुळे सूफिंसंबंधी मुल्ला-मौलवी वगैरे मुस्लिम धर्मपंडितात गैरसमज पसरलेले दिसतात. कारण गुरूच्या पायावर डोके ठेवण्याची परंपरा ही भारतीय वैदिक परंपरेमध्ये पाहायला मिळते. चिश्ती, कादरी, सुहरावर्दी, नक्शबंदी असे चार संप्रदाय भारतातील सूफी पंथात आढळतात. या साऱ्या संप्रदायातून मुस्लिम शर्यतीचे म्हणजेच आचारधर्माचे कटाक्षाने पालन केले जाते. एकूणच यादव काळ हा असा काळ होता ज्या काळाने महाराष्ट्राला सूफी पंथाचा परिचय करून दिलेला दिसून येतो.

सूफी संप्रदाय पहिल्यांदा अस्तित्वात आला तो अरबस्थान- इराणमध्ये. या संप्रदायाचे साहित्य प्रामुख्याने फारसी भाषेत रचण्यात आलेले आहे. सूफी संप्रदायाचे तत्त्वज्ञान हे इस्लामविरोधी असल्याचे अनेक मुस्लिम कर्मठ धर्मपंडितांना वाटत असल्या कारणाने

अनेक सूफी संतांना यासाठी फासावर चढावे लागल्याची उदाहरणे आपल्याला पाहायला मिळतात. हा पंथ दहाव्या शतकात उदयास आलेला दिसतो व मान्यता पावलेला दिसतो. 'मी सत्य आहे' ही या पंथाची मूलभूत धारणा होती. ही धारणा इस्लामच्या तत्त्वप्रणालीशी विसंवादी होती.

सूफी संत इराण-अरबस्थानातून बाराव्या- तेराव्या शतकात भारतात येत होते. आपल्या संप्रदायाचा प्रसार करण्यासाठी सूफी संतांनी निरनिराळ्या भाषेचा अवलंब केलेला दिसतो. महाराष्ट्रात 'सिद्धांची वाणी' अथवा 'बैरागी भाषा' अध्यात्म चर्चेसाठी प्रतिष्ठा पावलेली होती. हीच भाषा सूफी संतांनी दत्तक घेतली. फारसी लिपीतून या भाषेत साहित्य रचण्यास प्रारंभ केला. हीच भाषा कालांतराने 'दखनी भाषा' या नावाने प्रसिद्धीस आली. मराठी भाषिक संतांच्या सहवासात ती वाढली त्यामुळे या भाषेवर मराठी भाषेचा दूरगामी संस्कार झालेला दिसतो.

एकूणच जन्माने मुसलमान असूनही अनेक कवींनी मराठी भाषेतून अध्यात्मपर रचना केलेली पाहायला मिळते. त्या कवींवर भारताच्या आध्यात्मिक परंपरेचा आणि मराठी साहित्याचा प्रभाव आपल्याला दिसून येतो. पुढच्या काळामध्ये शेख महंमद, हुसेन अंबरी, शहामुनी यासारखे अनेक लेखक याच परंपरेतून लिहिताना आपल्याला दिसतात.

### ३.६.६. वारकरी संप्रदाय

वारकरी संप्रदायाला भागवत संप्रदाय असे म्हटले जाते. यादव काळामध्ये उदयास आलेल्या विविध संप्रदायापैकी वारकरी संप्रदाय एवढेच एक अस्तित्व या संप्रदायाचे मुळीच नाही. याउलट तळागाळातल्या लोकांपासून उच्च वर्गापर्यंत लोकांच्या मनावरती अधिराज्य गाजवणारी विठ्ठल ही देवता आणि या विठ्ठलाची पूजा करणारा तो वारकरी संप्रदाय होय. वारकरी संप्रदायाचे आराध्य दैवत म्हणजे पंढरीचा विठ्ठल. हा संप्रदाय म्हणजे विठ्ठल देवतेचा भक्ती करणारा संप्रदाय होय. पंढरपूर म्हणजे पांडुरंगपूर असे मानले जाते. तेथील विठ्ठल ही देवता ज्ञानेश्वर नामदेवांच्या कितीतरी अगोदर अस्तित्वात आल्याचे अनेक शिलालेख व ताम्रपटातील उल्लेखावरून दिसून येते. खुद्द ज्ञानेश्वर व नामदेवांच्या घराण्यातही पूर्वीपासून विठ्ठलाची उपासना चालू असल्याचे त्यांच्या चरित्रावरून दिसून येते.

### ३.६.६.१ संप्रदायाचे तत्त्वज्ञान -

हा संप्रदाय पिंड ब्रह्मांडाच्या एकरुपतेप्रमाणेच जीवा शिवाचे अद्वैत मानतो. विश्व आभासात्मक नसून ते परमेश्वरा इतकेच सत्य आहे असा या संप्रदायाचा उपदेश आहे. ज्ञानेश्वरांची विश्वात्मक देवाची संकल्पना या भूमिकेवरून समजून घेता येते.

ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानाने वारकरी संप्रदायाची पायाभरणी झालेली दिसते. ज्ञानेश्वरांचा 'चिद्विलासवादी पूर्णाद्वैतवाद' हा वारकरी पंथाचा मुख्य तत्त्वसिद्धांत होय. हा काळ असा होता ज्या काळामध्ये व्रतवैकल्ये, तीर्थयात्रा, यज्ञयाग करून स्वर्गसुख मिळवावे, कर्मसंन्यासाच्या नि ज्ञानयोगाच्याद्वारे मोक्ष मिळवावा या गोष्टीसाठी सामान्य लोक झटत असत. त्यामुळे लोकांच्या ज्ञानसाधनेला आणि कर्माचरणाला एक बाधा आलेली होती. या सर्व गोष्टींना वारकरी पंथाने चिद्विलासवादी भक्ती योगाद्वारे हीन ठरवले.

## आचारधर्म व शिकवण -

संत ज्ञानेश्वर-नामदेव-भानुदास-एकनाथ-तुकाराम यांच्या साहित्याने वारकरी संप्रदायाची विचारसरणी दृढ केली आहे. या संप्रदायालाच 'भागवत धर्म' असेही संबोधले जाते. पंढरीचा पांडुरंग हे संप्रदायाचे आद्य दैवत होय."पंढरीचा वास, चंद्रभागे स्नान।आणिक दर्शन विठोबाचे॥" हीच त्यांची आचारसंहिता सांगितली गेली. कीर्तनाने देव प्रसन्न होतो अशी प्रत्येक वारकऱ्याची मनोमन श्रद्धा आहे. विठोबाचे नाम गात रहावे म्हणजेच नामस्मरण हा भक्तीचा पाया त्यांनी सांगितला. कर्मठपणा, वृत्तवैकल्ये, संन्यास इत्यादी गोष्टींचा त्याग या पंथाने शिकवला. संसारात राहून परमार्थ साधता येतो याची शिकवण या संप्रदायाने दिली. कोणत्याही जातीच्या मनुष्यास आध्यात्मिक उन्नती साधता येते याचा विश्वास या संप्रदायाने निर्माण केला. स्त्री शूद्रातिशूद्रांच्या भावनेला अध्यात्म विचाराची जोड दिली. सामाजिक नीतीची शिकवण दिली. पाखंडाचे खंडन करणे हाच धर्म होय. दया, क्षमा, शांती, अहिंसा, समता व मानवता या मानवी जीवनमूल्यांचे स्मरण करून दिले. "दुरितांचे तिमिर जावो, जो जे वांच्छील तो ते लाहो"हा मानवतावादी विचार त्यांनी पसायदानातून सांगितला.

## संत ज्ञानेश्वर -

तेराव्या शतकात देवगिरीस रामदेवराव यादवांची कारकीर्द गाजत होती. संत ज्ञानेश्वर त्यांच्याबद्दल आदराने उल्लेख करतात. "न्यायाते पोखितु क्षितिशु श्रीरामचंद्रू" असा उल्लेख ते करतात. या काळामध्ये वैदिक धर्माच्या उज्ज्वल परंपरेस कर्मठता व पढीक पांडित्य यांनी काळीमा फासला होता. यज्ञयाग, जप, वृत्तवैकल्ये, समराधना यातच सगळा वेळ जात होता. 'चतुर्वर्गचिंतामणी' यासारख्या ग्रंथाची निर्मिती याच काळात झाली होती. जो ग्रंथ २००० व्रते सांगतो. मनन, चिंतनासारख्या गोष्टींचा लोप झाला होता. तर वैचारिक शिकवण जाऊन बिनबुडाच्या धर्मश्रद्धा अस्तित्वात आल्या होत्या. धार्मिक क्षेत्रात स्वार्थ, अंधश्रद्धा, अज्ञान यासारख्या गोष्टींना प्रतिष्ठा मिळाली होती. तर उच्च विचारांची बैठक निर्माण होणे या काळात अशक्यप्राय झाले होते. क्षणिक सुख, अज्ञान, भीती यासारख्या गोष्टीतून अनेक छोट्या-मोठ्या देवतांची निर्मिती होऊन याच देवतांची भक्ती करण्यात श्रेष्ठता मानण्यात सर्वसामान्य माणूस समाधान पावू लागला होता. अशा सर्व गोष्टींना थोपवण्याच्या दृष्टिकोनातून बौद्ध, जैन, महानुभाव, लिंगायत यासारख्या संप्रदायांची निर्मिती झाली होती. ज्याच्यातून त्यांनी आत्मज्ञानाची प्रचिती करून देण्याचा प्रयत्न केला होता. खरे तर या संप्रदायांनी वैदिक धर्माविरुद्ध एक प्रकारचे बंडच पुकारले होते. या काळात सर्वसामान्य लोकांच्या धर्म भावनेला अध्यात्म विचाराची ठाम बैठक मिळवून देण्याशिवाय गत्यंतर नाही याची जाणीव संत ज्ञानेश्वरांना झाली होती. दलितोद्धार आणि धर्मजागृतीचे कार्य या दोन प्रेरणेतून ज्ञानेश्वरांचे कार्य सुरू झाले. शूद्रातिशूद्र लोकांपर्यंत तत्त्वज्ञान, अध्यात्म विचार पोहोचवण्यासाठी ज्ञानेश्वरांनी ग्रंथनिर्मिती केली व वारकरी संप्रदायाची स्थापना झाली.

संत ज्ञानेश्वर आणि नाथ संप्रदाय यांचा खूप घनिष्ठ संबंध आहे. योग मार्गावर नाथ संप्रदाय अधिक भर देत असल्याने या संप्रदायाला या 'योगमार्ग' असेही म्हणतात. हा पंथ नवव्या शतकात अस्तित्वात आलेला व उत्कर्ष पावलेला संप्रदाय आहे. आदिनाथ-मच्छिंद्रनाथ-गोरक्षनाथ-गहिनीनाथ-निवृत्तीनाथ-ज्ञाननाथ ऊर्फ ज्ञानदेव अशी नाथ संप्रदायाची परंपरा

सांगितली जाते. संत ज्ञानदेव हे विद्यापरंपरेने शैव असले तरी कुलपरंपरेने ते वैष्णवच होते. म्हणूनच आपल्या तत्त्वज्ञानाच्या प्रकटीकरणासाठी त्यांनी कृष्णाने सांगितलेली 'भगवतगीता' निवडली.

संत ज्ञानेश्वर यांच्या जन्माबाबत दोन मतप्रवह आहेत. एकतर वि.ल.भावे व शं.वा. दांडेकर यांचे एक मत आहे. तर ल.रा. पांगारकर भिडे, न. चिं. केळकर, रा.द.रानडे यांचे एक मत आहे. या दोन्ही प्रवाहातील मतांचा एकूण विचार करता ज्ञानेश्वरांचा समाधीकाल हा शके १२१८ (इ.स.१२७५) हा सर्वमान्य झाला व त्याच्या आधाराने संतज्ञानदेवांचा जन्मकाल हा शके ११९७ (इ.स. १२७५) हा निश्चितपणे सांगितला गेला आहे. यामध्ये ज्ञानदेवांनी 'ज्ञानेश्वरी'ची रचना ही वयाच्या सोळाव्या वर्षी झाली आहे.

एकूणच संत परंपरा हा भक्तिमार्गातील स्वातंत्र्याची, मुक्तीची संकल्पना होती. हे स्वातंत्र्य जात, धर्म, लिंगभाव अशा कोणत्याही गोष्टीचे निकष न ठेवता मुक्त होते. हा एक ज्ञानमार्गच होता. देवापुढे सर्व समान आहेत हा या परंपरेचा गाभा होता आणि म्हणून स्त्री, शूद्रातिशूद्र या परंपरेचा पाईक झालेला दिसतो. त्यामुळेच या परंपरेत लेखन करणारे संतमेळा या समतेच्या तत्त्वाला अनुसरून भक्तीचा हा मार्ग अनुसरतात. आपल्या काव्यातून या तत्त्वाचा पुरस्कार करतात.

## ३.७ यादवकालीन साहित्य

यादवकाळामध्ये जे संप्रदाय निर्माण झाले त्या संप्रदायाचे तत्त्वज्ञान, आचारधर्म सांगणारे, सांप्रदायिक विचारांना पुढे नेणारे लेखन त्या काळात लिहिले जात होते. या लेखनामागे धर्मप्रेरणा किंवा संप्रदाय प्रेरणा अधिक दिसून येते. तसेच प्राचीन ग्रंथावर भाष्य, टीका हेही एक कारण ग्रंथ लेखनामागे दिसून येते. असे असूनही सर्वच साहित्यातून एक प्रतिभाविष्कार झालेला दिसतो. नव्या विचारांची मांडणी, नव्या समाज घडणीची पायवाट या साहित्यानेच पाडली. यादव काळ असा काळ आहे ज्या काळामध्ये साहित्यातील अनेक प्रकार आकार घेत होते. सामाजिक स्थित्यंतराचे विवेचन करत होते. म्हणूनच या काळातील साहित्याचा मराठी साहित्य परंपरेवर विशेष प्रभाव आहे. या काळातील साहित्याचा आपण आढावा घेऊ.

### ३.७.१ विवेकसिंधू :

मराठीमध्ये आद्य ग्रंथ म्हणून 'विवेकसिंधू' या ग्रंथाला मानले जाते. आणि म्हणूनच मराठी साहित्य परंपरेत मुकुंदराजाना 'आद्यकवी' म्हणून संबोधले जाते. उपनिषदांच्या मंथनातून निर्माण झालेले नवनीत म्हणजेच 'विवेकसिंधू 'होय. 'मराठी भाषेतील उपनिषदच' म्हणून कृ. पां. कुलकर्णी या ग्रंथाचा उल्लेख करतात. याला खास कारणही आहे. पूर्वीपासून वेदांत आणि अध्यात्मासंबंधीचे सर्व ज्ञान फक्त संस्कृत भाषेतच सांगण्याची प्रथा होती. त्यामुळे पंडितांशिवाय किंवा मोजक्या संस्कृतज्ज्ञांशिवाय इतरांना त्याचा स्पर्शही होणे अशक्यप्राय होते. त्यामुळे अध्यात्मज्ञानापासून सर्वसामान्य लोक वंचित होत. अशा सर्वांसाठी या ग्रंथाच्या माध्यमातून मुकुंदराजांनी हे तत्त्वज्ञान मराठीत आणले.

जेया नाही शास्त्रीप्रतीती। नेणती तर्कमुद्रेची स्थिती ।
तेया लागी महन्हाटीया युक्ति । केली ग्रंथरचना ॥
(ल. रा. नसिराबादकर : २००६ : पृ.९ )

असा ग्रंथरचनेचा आपला हेतू मुकुंदराजांनी 'विवेकसिंधू 'च्या शेवटी स्पष्टपणे मांडला आहे. त्यातून अज्ञ जनांविषयीची ग्रंथकारांच्या मनातील आत्मीयताच स्पष्ट होते. या ग्रंथाचे त्यांनी संस्कृतातही रूपांतर केले असून विवेकसिंधू, तत्त्वबोध, महाभाष्य, परमार्थबोध, ब्रह्मावबोध अशा अनेक नावांनी त्याचा उल्लेख केला जातो.

लेखनकाल - विवेकसिंधू'च्या लेखनकालासंबंधी काही आंतरिक प्रमाणे या ग्रंथातच सापडतात. ' विवेकसिंधू 'तील पूर्वार्धाच्या सातव्या प्रकरणात' नृसिंहाचा बल्लाळु । तेयाचा कुमरु जैतपाळु । तेणे करविला हा रोळु । ग्रंथरचनेचा ॥' या ओवीद्वारे जैतपाळाने आपल्यासाठी हा ग्रंथरचनेचा रोळ करविला व त्यामुळे सर्व जग सुखी केले, असे मुकुंदराज म्हणतात. स्वतः मुकुंदराजांनी 'शके अकरा दाहोत्तरू । साधारण संवत्सरू । राजा शारंगधरु। राज्य करी ॥ असा लेखनकाळाचा उल्लेख असला तरी शके १११०त साधारण संवत्सर येत नाही. तो शके ११०९ मध्ये येतो. कृ. पा. कुलकर्णी यांनी गतशक कालगणनापद्धतीच्या आधारे 'विवेकसिंधू' चा लेखनकाल शके ११०९ हा निश्चित केला आहे. (ल. रा. नसिराबादकर : २००६ : पृ.१०)

'विवेकसिंधू'चे पूर्वार्ध आणि उत्तरार्ध असे दोन भाग आहेत. या ग्रंथातील एकूण १६९८ ओवीसंख्या आहे. कृ. पां. कुलकर्णी म्हणतात त्याप्रमाणे 'विवेकसिंधू' हा मुख्यतः शास्त्रीय ग्रंथ आहे व आनुषंगिकरित्या वाङ्मयीन आहे. या ग्रंथामध्ये वेद आणि अध्यात्मशास्त्र हा प्रमुख विषय आहे. त्यामुळे ग्रंथात पारिभाषिक आणि संस्कृत असे बरेचसे शब्द आढळतात. योगवासिष्ठ, स्कंदपुराण भागवत, भगवद्गीता, ब्रह्मपुराण, मत्स्यपुराण, विष्णुपुराण, गुरुगीता इत्यादी ग्रंथांचे मुकुंदराजांनी वाचन निश्चितपणे केले असावे, असे अंतर्गत पुराव्यांवरून स्पष्ट होते. ज्ञानेश्वरी, महानुभावांचे ग्रंथ यांतील ओवीप्रमाणे 'विवेकसिंधू 'तील ओवी साडेतीन चरणांची आहे. त्यावरून या ग्रंथाच्या प्राचीनत्वाची ओळख पटते.

वेदांताबद्दल प्रेम आणि अभिमान मुकुंदराजांच्या मनात असल्याची जाणीव त्यांच्या लेखनातून दिसते. तसेच शंकराचार्य यांचा अद्वैत व रामनुजाचार्यांचा विशिष्टाद्वैत यांचा समन्वय त्यांच्या लेखनात आहे. या ग्रंथाद्वारे त्यांनी अद्वैत तत्त्वज्ञान मांडले. हा मराठीतील पहिला तत्त्वज्ञानपर ग्रंथ आहे. मुकुंदराज हे स्वत: नाथपंथी असल्याने या ग्रंथात योगानुभवाचे वर्णन त्यात येते. सगुण भक्तीचा पुरस्कार त्यांनी केलेला आहे. तसेच गुरुभक्ती आणि गुरुश्रद्धे चा महिमा त्यांच्या ग्रंथातून आढळतो. तत्त्वज्ञान सांगण्यासाठी केवळ संस्कृत भाषाच समर्पक आहे असे मानणारा हा काळ आहे. ज्या काळात मुकुंदराज मराठी भाषेचा पुरस्कार करतात. त्यामुळे त्यांचा हा प्रयत्न अत्यंत महत्त्वाचा आहे.

### ३.७.२ महानुभावीय वाङ्मय

सर्व महानुभाव वाङ्मय पंथनिष्ठेवरच आधारलेले आहे. तीच त्यांची प्रेरणा आहे. पंथाच्या प्रवर्तकांची चरित्रे, लीळा, वचने, आख्यायिका, पंथीय तत्त्वज्ञान आणि आचारधर्म यांचे जतन करणे, त्यांचे दर्शन घडविणे आणि त्यांचा प्रसार करणे ही त्यांची खरी भूमिका. गद्य

आणि पद्य अशा दोन्ही माध्यमांतून त्याची जाणीवपूर्वक निर्मिती झाली आहे. संस्कृतात ग्रंथरचना करावी, हा शिष्टमान्य संकेत रूढ असण्याच्या या काळात चक्रधर व नागदेवाचार्य यांनी आपल्या ग्रंथकारांना कटाक्षाने मराठीतच ग्रंथरचना करण्यास सांगितले.' आपल्या स्वामीचा सामान्यु परिवारु' नागविला जाऊ नये, काठिन्यता चुकवून त्याला परमेश्वरलाभाला वाव असावा म्हणून 'महाराष्ट्रीये निरुपिले कीं गा' असे त्यांनी स्पष्ट सांगितले. प्रथम ही ग्रंथरचना देवनागरीत झाली असली, तरी चक्रधरांनंतर सुमारे साठ-सत्तर वर्षांनी मात्र वाङ्मयगुण-रूपांनी संपन्न असलेले हे ग्रंथभांडार महानुभावप्रणीत सांकेतिक लिपीच्या पडद्याआड अदृश्य झाले. पण गेल्या शंभर-एक वर्षांपासून देवनागरी लिपीतून ते पुन्हा सर्वांपुढे आले आहे.

### ३.७.२.१ लीळाचरित्र -

मराठीतील पहिला चरित्रग्रंथ म्हणून' लीळाचरित्रा 'चे महत्त्व अनन्यसाधारण आहे. महानुभाव संप्रदायाचे संस्थापक श्रीचक्रधरस्वामी यांच्या लीळा (आठवणी) त्यांच्या शिष्याने म्हणजे म्हाइंभट्टाने संकलित करून चरित्ररूपाने मांडल्या. मूळचा अत्यंत गर्भश्रीमंत आणि विद्वान असणाऱ्या म्हाइंभट्टाला आपल्या विद्वत्तेचा अतीव गर्व होता. आपण इतरांना तृणासमान लेखतो याचे चिन्ह म्हणून तो पायात गवताची वाकी घाली. आकाशात एक सूर्य आणि पृथ्वीवरील मी 'अपरसूर्य,' असे तो स्वतःस म्हणवी. पुढे चक्रधरांच्या सहवासात आल्यानंतर मात्र त्याचा अहंकार गळाला आणि तो त्यांचा एकनिष्ठ शिष्य बनला. चक्रधरांच्या प्रयाणानंतर सर्व शिष्य ऋद्धिपुरास एकत्र आले असता, आपल्या परमप्रिय गुरूच्या लीळांचे स्मरण त्यांना होणे अत्यंत स्वाभाविक होते. याच वेळी म्हाइंभट्टास लीळाचरित्राची कल्पना सुचली असावी. म्हाइंभट्टांनी वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन चक्रघरांच्या लीळाचरित्राची विभागणी एकाक, पूर्वार्ध व उत्तरार्ध अशा तीन विभागांत असून एकूण लीळांची संख्या १५०९ इतकी आहे. या तीन विभागांची रचना मात्र उत्तरार्ध-पूर्वार्ध-एकाक अशा क्रमाने झाली असावी, असे शं. गो. तुळपुळे यांना वाटते.

पूर्वार्धात आणि उत्तरार्धात असलेल्या चक्रधरांच्या लीळा सांगणारी अनेक शिष्यमंडळी संप्रदायात होती. कारण या लीळा त्यांच्यासमोरच घडलेल्या होत्या. पण एकाकी अवस्थेतील चक्रधरांचे जीवन फारसे कुणाला माहीत नव्हते. महदायिसेसारख्या जिज्ञासू शिष्येशी चर्चा करताना किंवा काही भक्तांशी बोलताना चक्रधरांच्या मुखातून पूर्वायुष्यातील काही संदर्भ सहजपणे येऊन जात. स्वामींच्या मुखातून ऐकलेल्या अशा काही संदर्भाचा प्रसंगांचा आधार घेऊन त्यांच्या पूर्वजीवनाचा शोध घेण्याचा प्रयत्न ' एकाका 'त झाला आहे. लीळाचरित्राची रचना मात्र इ. स. १२८३ (श. १२०५) मध्ये झाली असावी.

चक्रधर आणि महानुभाव संप्रदाय यांच्याविषयीची वैविध्यपूर्ण माहिती लीळाचरित्रातून प्रगट झाली आहे. चक्रधर हे महानुभावांचे चैतन्यशील असे प्रेरणास्थान होते. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा तो मूलस्त्रोत होता. अनेक घटना, प्रसंगांतून प्रकट होणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व; त्यांच्या उक्तीतून आणि कृतीतून स्पष्ट होणारे महानुभाव संप्रदायाचे तत्त्वज्ञान आणि आचारधर्म; चक्रधरांच्या पदयात्रेच्या निमित्ताने येणारी अनेक व्यक्तींची आणि स्थळांची माहिती; तत्कालीन राजकीय, सामाजिक, व धार्मिक जीवनातील अनेकविध वैशिष्ट्ये, घडामोडी, वृत्ती-प्रवृत्ती यांचे दर्शन लीळाचरित्रातून घडत असल्यामुळे या ग्रंथाला

सांस्कृतिक दस्तऐवजाचे (Cultural Document) महत्त्व प्राप्त झाले आहे. अर्थात चक्रधर हा चरित्रविषय असल्यामुळे त्यांच्या व्यक्तित्वदर्शनावर म्हाइंभट्टाने अधिक भर देणे स्वाभाविक आहे. मात्र म्हाइंभट्टाला केवळ गुरूचे चरित्र लिहायचे नाही, तर लेखनाद्वारे गुरूचे स्मरण करावयाचे आहे. लीळांचे लेखन हे स्मरणाचे माध्यम आहे. त्यामुळे चक्रधरांच्या सौंदर्यवर्णनापासून त्यांच्या तत्त्वनिरूपणापर्यंत; आणि त्यांच्या सूक्ष्म हालचालीपासून अघटित कृतींपर्यंतचे सर्व तपशील वर्णनातून जुळवीत तो स्मरणासाठी श्रीमूर्ती आकाराला आणतो.

### ३.७.२.२ श्रीगोविंदप्रभू चरित्र :

हा म्हाइंभटांचा दुसरा ग्रंथ आहे. चक्रधरासंबंधी 'लीळाचरित्र हा ग्रंथ जसा बनला आहे त्याप्रमाणे चक्रधरांचे गुरु श्रीगोविंदप्रभू यांचा जीवनपट स्मृतीरूपाने या ग्रंथामध्ये आला आहे. या महानुभव पंथांमध्ये या ग्रंथाचा उल्लेख 'रिद्धीपुर लीळा' किंवा 'रिद्धीपुर चरित्र' असा केला जातो. वि.भि.कोलते यांनी प्रथमत:च या ग्रंथाचे नामकरण श्रीगोविंदप्रभूचरित्र' असे केले. महानुभव पंथाच्या दृष्टीने श्रीगोविंदप्रभू म्हणजे परमेश्वराचा अवतार असे मानले जाते. त्यामुळे या ग्रंथाकडे पाहताना महानुभावी धर्मप्रवर्तकांपैकी एका ईश्वरी पुरुषाचे चरित्र म्हणून या ग्रंथाकडे पाहिले जाते. या ग्रंथामध्ये अवताराचे तीन प्रकार येतात गर्भ,पतीत व दवडणे. या तीन प्रकारांमध्ये श्रीगोविंदप्रभू यांचा अवतार हा दवडण्याचा अवतार मानला जातो. यात परमेश्वर मातेच्या गर्भातून एखाद्या जीवाला दवडतो आणि तेथे स्वतः आकार घेतो. अशावेळी दवडलेल्या जीवाचे देहधर्म व स्वभाव त्याला स्वीकारावे लागतात. श्रीगोविंदप्रभू यांनी ज्या जीवाला दवडले होते तो जीव वेडापिसा होता आणि तोच देहधर्म श्रीगोविंदप्रभुंना स्वीकारावा लागला. आणि म्हणून त्यांचा अवतार हा वेड्या पिश्याचा झाला असे अवताराचे विश्लेषण वि. भि. कोलते यांनी दिले आहे.

### ३.७.२.३ दृष्टांतपाठ –

या ग्रंथाचे लेखक केसोबास हे आहेत. अर्थात हा ग्रंथ म्हणजे संपादित ग्रंथ होय. महानुभाव पंथामध्ये चक्रधर स्वामी तत्त्वज्ञान  सर्वसामान्यांना सुलभ करून सांगण्यासाठी अनेक दृष्टांत देत असत आणि हे दृष्टांत या केसोबासांनी या ग्रंथामध्ये संकलित केले आहेत. हे संकलन लोकजीवनामध्ये रुजलेले दृष्टांत केसूबासांनी एकत्र केले. या ग्रंथामध्ये एकूण ११४ दृष्टांत आहेत. हे दृष्टांत म्हणजे उपदेशपर कथाच आहेत. चक्रधरांनी सांगितलेली सूत्रे व दृष्टांत केसोबासांनी निवडले व त्या दृष्टांतातून सूचित केलेले तत्त्व 'दृष्टांतिक या नावाने जोडली. प्रत्येक दृष्टांताचे तीन भाग पडतात. पहिला चक्रधरोक्त सूत्र, नंतर त्या सूत्रातील विचार किंवा तत्त्व पटविणारा दृष्टांत आणि शेवटी त्या दृष्टांतातून त्या सूत्राशी सुसंगत असे काढलेले पारमार्थिक निष्कर्ष म्हणजेच द्रष्टांतिका होय. यादवकालीन नागरी आणि ग्रामीण समाजजीवनाचा परिचयही या ग्रंथातून होतो.

### ३.७.२.४ सूत्रपाठ-

'सूत्रपाठ हा केसोबासांचा दुसरा ग्रंथ. 'लीळाचरित्र या ग्रंथामध्ये चक्रधरांच्या मुखामध्ये जी सूत्रे येतात त्या सूत्रांचे क्रमवार संपादन केसोबासांनी या ग्रंथामध्ये केले. या ग्रंथाचे लेखन इ.स. १२८० (शके १२०२) च्या सुमारास झाले आहे. या ग्रंथामध्ये एकूण १२५५ सूत्रे

आहेत. महानुभावांचे तत्त्वज्ञान या ग्रंथाच्या आधारेच तयार झाले असून संप्रदायातील लोक या ग्रंथाचे आदरपूर्वक पठण करतात. अल्पाक्षरत्व हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे. लहान लहान वाक्यातून या ग्रंथातून येणारी सूत्रे जे महानुभावांचे तत्वज्ञान आहे ते या ग्रंथातून वर्णिले आहे.

### ३.७.२.५ मूर्तीप्रकाश –

केसोबासांनी हा ग्रंथ लिहिला आहे  महानुभव पंथातील चक्रधर स्वामींचे वर्णन, त्यांचे स्वभावविशेष हे या ग्रंथामध्ये आलेले आहेत. केसोबासांना त्यांच्या बालपणापासून चक्रधरांचा सहवास लाभला होता आणि या सहवासाचे अनुमोदन त्यांनी या ग्रंथातून केले आहे. इ.स.१२८९ मध्ये या ग्रंथाचे लेखन त्यांनी केलेले आहे. चक्रधर स्वामींच्या वर्णन हे केवळ या ग्रंथाचे निमित्त आहे. मुख्य गोष्ट म्हणजे परमार्थनिरूपण या ग्रंथातून केल्याचे स्पष्ट दिसते. पण या ग्रंथाचे वर्णन अतिशयोक्ती पूर्ण लेखन म्हणून केले जाते.

### ३.७.२.६ स्मृतीस्थळ –

चक्रधरांच्या नंतर महानुभव पंथाचे नेतृत्व हे नागदेवाचार्यांकडे आले. नागदेवाचार्यांचा जीवनपट या ग्रंथातून येतो. 'लीळाचरित्राप्रमाणे हाही एक चरित्र ग्रंथ म्हणून ओळखला जातो. य. खु. देशपांडे या ग्रंथाचा उल्लेख 'नागदेवाचार्य चरित्र' असे करतात. या ग्रंथामध्ये नागदेवाचार्यांच्या 'स्मृती' म्हणजेच आठवणी संग्रहित केल्या आहेत. श्री चक्रधरांच्या वचनांना 'श्रुती' म्हणतात व भटोबास उर्फ नागदेवचार्यांच्या वचनांना 'स्मृती' असे म्हणतात. या ग्रंथामध्ये एकूण २६१ स्मृती संग्रहित केल्या आहेत. हा ग्रंथ नागदेवचार्य यांच्या मृत्यूनंतर इ.स. १३०८ मध्ये लिहिला आहे. या ग्रंथामधून मराठी भाषेविषयीचा अभिमान प्रकट झाला आहे. महानुभव पंथातील चक्रधरांच्या नंतर महानुभव पंथाला पुढे नेण्याचे काम नागदेवचार्यांनी केले. तसेच चक्रधरांच्या नंतर त्यांच्या लीळा व वचने एकत्रित करणे, पंथाचा प्रसार करणे, ग्रंथकारांना मार्गदर्शन करणे हे कार्य नागदेवाचार्यांनी केले त्यामुळे त्यास अभ्यासकांनी 'ग्रंथकारांचा ग्रंथकार' असे म्हटले. या ग्रंथाचा केवळ एकच एक लेखक नसून अनेक व्यक्तींकडे असलेल्या स्मृती या ग्रंथामध्ये संकलित केल्या आहेत. या ग्रंथाचे लेखक म्हणून नरेंद्र व परशराम यांचे नाव घेतले जाते तर मालोबाज व गुर्जर शिवबास हे स्मृतीस्थळाचे संस्करणकार वाटतात असे वा. ना. देशपांडे यांचे मत आहे.

### ३.७.२.७ महदंबा :

महानुभव पंथामध्ये शुद्ध्राती शूद्र स्त्रिया पुरुषांनाही पंथामध्ये येण्याची व दीक्षा घेण्याची परंपरा रूढ केली गेली होती या पंथामध्ये आलेल्या महदंबा या महत्त्वाच्या कवयित्री होय यांचे मूळचे नाव रुपाई. महदंबा यांच्या पणजीचे नाव महदंबा असे होते त्या विदुषी होत्या त्यांच्या नावावरूनच महदंबा यांचे नाव चक्रधरांनी ठेवले होते महदंबा यांचा बालपणीच विवाह झाल्यामुळे पुढे कालांतराने वैधव्य आल्यानंतर त्या महानुभव पंथात आल्या व चक्रधरांच्या शिष्या झाल्या महदंबा यांना आद्य कवयित्री म्हणून ओळखले जाते महदंबा यांचे धवळे व मातृकी रुक्मिणी स्वयंवर ही कथा काव्य आहेत ही मराठीतील पहिली तथाकाव्य होत तसेच त्यांनी चक्रधरांवर व नागदेवाचार्यांवर उत्स्फूर्तपणे काही ओव्याही रचल्या

आहेत. महदंबा यांनी लिहिलेल्या धवळे या कथाकाव्याचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग पडतात. धवळे म्हणजे लग्नात वरविषयक गायली जाणारी गीते होय.

**पूर्वार्ध -** याची रचना इ. स. १२८७ च्या पूर्वी केव्हातरी झाली असल्याचे सांगितले जाते या पूर्वार्धामध्ये एकूण 83 धवळे आहेत. या भागामध्ये रुक्मिणी हरणाचा कथा भाग आला आहे. यामध्ये सुरुवातीलाच सर्वेश्वराला नमन करून रुक्मिणीचे झालेले हरण कथन केले आहे. भागवत पुराणातील रुक्मिणी हरणाचा प्रसंग यामध्ये वर्णन केला आहे. तसेच श्रीकृष्ण आणि रुक्मिणी यांच्यातील प्रेमभावाचे वर्णनही यामध्ये येते. प्रसंगनिर्मिती सोबतच रुक्मिणी, कृष्ण,बळीभद्र, विप्र यांची व्यक्तिचित्रणेही अत्यंत जिवंत पद्धतीने महदंबेने रेखाटलेली आहेत. त्यामुळे हे कथन मनोरंजन करणारे व कथानकास वेग देणारे आहे.

**उत्तरार्ध -** धवळ्यामधील उत्तरार्धातील काव्याची पूर्णतः रचना महदंबा यांनी केलेली नसून त्यामध्ये अनेकांचा हातभार लागलेला आहे. त्यामुळे महदंबा, म्हाइंभट्ट व लक्ष्मींद्रभट या तिघांकडे या धवळ्यांच्या उत्तरार्धाचे कर्तृत्व जाते. या उत्तरार्धात एकूण ६३ धवळे असून त्याचा लेखनकाल इ. स.१३०८ पूर्वीचा संभवतो. या भागामध्ये कृष्ण रुक्मिणी युद्ध, रुक्मिणीला रथाला बांधून कृष्णाने दिलेली शिक्षा आणि शेवटी मेहुना म्हणून रुक्मिणीची थट्टा केली असे दिलेले उत्तर यासारख्या प्रसंगातून सहजसुंदर विनोद निर्मिती झाली आहे. कृष्णाचे रुक्मिणीसह द्वारकेस आगमन, नगर प्रवेश असे प्रासंगिक वर्णन यामध्ये येते.

**धवळे-** महदंबेनी लिहिलेल्या या धवळ्यांचे विशेष म्हणजे तेराव्या शतकातील विवाह पद्धतीची माहिती याच्यातून होते. तसेच स्वाभाविकता, गतिमानता, सहजसुंदरता, स्त्रीसुलभता असे काही गुणविशेष आपल्याला धवळ्यातून दिसून येतात. तसेच साधेपणा हा या काव्याचा विशेष गुण. साधी भाषा, साधे विचार असे असूनही हे काव्य मनाला भिडते आणि असा प्रयत्न प्रथमच महानुभव पंथातील एका स्त्री शिष्याने करावा हा गौरव म्हणून महदंबा यांना आद्यकवयित्री मानले जाते.

### ३.७.२.८ मातृकी रूक्मिणीस्वयंवर -

महदंबा यांनी दुसरे रचलेले काव्य म्हणजे 'मातृकी रुक्मिणीस्वयंवर' होय. ही रचना ११० ओव्याची असून मातृकांत (अक्षरांत) त्याची रचना आहे. एकूण ओवी संख्या १०९ असून १ ते ८२ ओव्यात क ते क्ष पर्यंत मातृका आहेत. ८३ ते १०१ ओव्यात अ पासून उ पर्यंत व नंतर भ-ट-च-व-म-न-व असा अक्षरक्रम आहे. त्यांच्या या रचनेमध्ये सफाईदारपणा, लयबद्धता, निवेदनातील गतिमानता हे गुणविशेष दिसून येतात. यामध्ये पाल्हाळ टाळून आटोपशीरपणा आलेला दिसतो. या काव्यामध्ये कृष्णवर्णन, विप्राची पाठवणी, कृष्ण दर्शनामुळे रुक्मिणीने सज्जावरून उडी घेणे इत्यादी प्रसंग जे यापूर्वी धवळ्यांमध्ये आलेले आहेत ते जसेच्या तसे घेतलेले दिसतात. याशिवाय महदंबा यांच्या नावावरती काही आरत्या व ओव्या अशा स्फूट रचनाही आहेत. तसेच चक्रधरविषयक एक गीतही लिहिलेले आहे. ज्यामध्ये चक्रधरांच्या सौंदर्याचे वर्णन त्यांनी केलेले आहे.

### ३.७.२.९ साती ग्रंथ :

महानुभव संप्रदायामध्ये साती ग्रंथांना अत्यंत महत्त्वाचे स्थान असून या संप्रदायाच्या प्रारंभीच या ग्रंथाचे लेखन केले गेल्याचे सांगितले जाते. श्रीकृष्ण भक्ती ही या ग्रंथांची भूमिका

असलेली दिसते. तसेच हे काव्यग्रंथ ओवीबद्ध आहेत. हे ग्रंथ लिहिणारे बहुतांश ग्रंथकार हे व्यासंगी पंडित आणि कवी असून काहींना राज दरबारी मान्यताही होती. हे ग्रंथ लिहिणाऱ्या सर्व ग्रंथकारांना श्रीचक्रधरांचे सानिध्य लाभल्याचे सांगितले जाते. श्रीकृष्ण हे या संप्रदायांचे दैवत. त्यामुळे कृष्ण जीवनातील अनेक प्रसंगांवर ह्या ग्रंथातील आशयद्रव्य आधारलेला आहे. यामध्ये रुक्मिणीस्वयंवर शिशुपालवध, उद्धवगीता अथवा एकादशस्कंध, वच्छाहरण, ज्ञानप्रबोध, सह्याद्रीवर्णन, श्रीऋद्धीपूर वर्णन हे सात ग्रंथ येतात.

*** रुक्मिणी स्वयंवर**

रामदेवराव यादवाच्या दरबारातील नरेंद्र या कवीची ही रचना होय. याच्या दोन बंधूंनी सालकवी व नृसिंह यांनी अनुक्रमे 'रामायण' व 'नलोपाख्यान' हे काव्य लिहिले. या दोन्ही काव्याची नरेंद्रने निर्भत्सना केली. तेव्हा या दोघाही भावांनी श्रीकृष्ण कथेवर काव्यलेखन करण्याचे आवाहन नरेंद्र याला केले. या आवाहनातून १८०० ओव्यांचे 'रुक्मिणीस्वयंवर' हे काव्य नरेंद्र या कवीने केलेले दिसते.

यामध्ये रुक्मिणी स्वयंवराचा घटनाप्रसंग आलेला आहे. नरेंद्र या कवीपुढे संस्कृत महाकाव्यांचे आदर्श समोर असल्यामुळे याचा प्रभाव त्याच्या या रचनेवरती दिसतो. स्वयंवरास आलेल्या निरनिराळ्या देशांच्या राजांची नामावली, सूर्यास्त-चंद्रोदय वर्णन, रुक्मिणीच्या विरहावस्थेचे वर्णन, दिव्यांचे वर्णन, नगर, प्रदेश असे अनेक तपशील वर्णने यामध्ये येतात. यासोबतच रुक्मिणीच्या विरह वर्णनात कल्पनारम्यता, भावोत्कटता, प्रीती आणि भक्ती यांचा संगम झालेला दिसतो. भागवत कथेत मुळात नसलेले किन्नराचे उपाख्यान ही नरेंद्रची स्वयं निर्मिती या काव्यामध्ये दिसून येते. त्यांच्या या काव्यातून नरेंद्रचे श्रीकृष्ण कथेवर किती नितांत प्रेम होते याचे जाणीव होते. अलंकारिकता, कल्पनासौंदर्य, भावमाधुर्य, सौंदर्यासक्त वृत्ती असे काही गुणविशेषही या काव्याचे सांगता येतात.

*** शिशुपालवध –**

भास्करभट्ट बोरीकर हे महानुभव पंथाचे बाईदेवव्यासानंतरचे तिसरे आचार्य होय. वेदांतापासून शृंगारापर्यंत विविध शास्त्रात त्यांची गती होती. शिशुपालवध या त्यांच्या काव्यदृष्ट्या सरस असणाऱ्या ग्रंथाची निर्मिती इ.स.१३१३ मध्ये झाली. संस्कृत मधील माघ या कवीने देखील 'शिशुपालवध' नावाचे काव्य लिहिले आहे. या ग्रंथाचा आदर्श बोरीकरांसमोर होता. पण बोरीकरांच्या ग्रंथातील कल्पनाविलास व अलंकारवैभव हे वेगळ्या प्रतिभेचे असलेले दिसते. यावरती कवी नरेंद्र यांच्या 'रुक्मिणीस्वयंवर' या काव्याचा एक प्रभावही दिसून येतो. या ग्रंथामध्ये श्रीकृष्ण आणि रुक्मिणी यांच्या एकांतातील प्रणय, त्या दोघांमधील संवाद, विनोदनिर्मिती, कृष्णाने रुक्मिणीची विरहावस्था, प्रेमकलह इत्यादी प्रसंग येतात. या प्रसंगांमध्ये कामोद्दीपक वर्णने अधिक आली आहेत. त्यामुळे श्रीकृष्णभक्ती हा भाव जरी या ग्रंथामध्ये असला तरीही कृष्ण-रुक्मिणीच्या प्रणय प्रसंगावेळी ती अनेकदा कामोत्तेजक वर्णनाकडे जाताना दिसतो. म्हणून अ.ना.देशपांडे या ग्रंथाविषयी म्हणतात, "बाणा विरक्त जोगिणीचा, पण ओठावर तरंगत असलेला शब्दसमूह मात्र शृंगार गीताचा अशी तिची अवस्था झाली आहे" (उद्धृत, पृ. ३२, ल. रा. नसिराबदकर, २००३) असे म्हणतात. हा ग्रंथ जेव्हा निर्माण झाला तेव्हा भास्करभट्ट बोरीकरांनी हा ग्रंथ बाईदेवव्यासांना दाखवला

त्यावरती बाईदेव्यास म्हणतात, "ग्रंथु निका जाला असे : परि निवृत्ता जोगा नव्हेचि: हा शृंगारिया प्रवृत्ताजोगा जाला असे :' यावरूनच या ग्रंथात असणाऱ्या मर्यादेचे भान वाचकाला येते. मराठी साहित्यात भक्तीला रसपदवी देणारा पहिला कवी म्हणून भास्करभट्ट बोरीकर यांना मान दिला जातो. एकूणच शिशुपालवध या ग्रंथातून तत्त्वदर्शनापेक्षाही पंडित्य, रसिकता आणि अत्यंत शृंगारसक्ती याचे दर्शन वाचकाला घडते आणि म्हणूनच या ग्रंथास 'प्रबंधकाव्य' असे संबोधतात.

*** उद्धवगीता -**

'शिशुपालवध' हा ग्रंथ भास्करभट्ट बोरीकरांनी जेव्हा बाईदेवव्यासांना दाखवला तेव्हा तो ग्रंथ 'निवृत्ता जोगा नव्हेची' असा अभिप्राय दिल्यानंतर त्यांनी ' उध्दवगीता' या ग्रंथाची निर्मिती केली. हा ग्रंथ इ.स. १३१४ मध्ये लिहिला गेला. हा ग्रंथ व्यासांनी लिहिलेल्या भागवताच्या एकादश स्कंधावर आधारलेली मराठी टीका आहे. एकादश स्कंधावर लिहिलेली मराठीतील हे पहिले भाष्य असून यामध्ये श्रीकृष्णाने उद्धवास केलेला उपदेश बोरीकर ८७२ ओव्यांमध्ये सांगताना दिसतात. या ग्रंथाच्या वेगळेपणामुळे आणि त्यातील काव्याच्या ओघवतेपणामुळे बाईदेवव्यासांनी 'आता हो ए कवीस्वर हो : हा आता निवृत्ताजोगा जाला : ऐसे म्हणोनि थोर तोखले' अशी माहिती मिळते. या ग्रंथाच्या नंतरही नरविलापस्त्रोत, अवतारषटक, गद्यचाली, श्रियाष्टक, विरहाष्टक, जयाष्टक इत्यादी रचनाही भास्करभट्ट बोरीकरांच्या नावावर दिसून येतात.

*** वच्छाहरण-**

या ग्रंथाची निर्मिती दामोदर पंडितांनी इ.स.१३१६ मध्ये केली. दामोदर पंडित यांचा महानुभव संप्रदायातील नागदेवाचार्य नेहमीच गौरवपूर्वक उल्लेख करताना दिसतात. भागवताच्या दशम स्कंधातील १२, १३ व १४ या अध्यायातीलअघासुरवधाची व वत्सहरणाची कथा या ग्रंथामध्ये आलेली आहे. त्या कथेच्या आधारे दामोदर पंडित यांनी ५०३ ओव्यांमध्ये हा ग्रंथ लिहिलेला आहे.

अघासुर वध आणि वच्छाहरण या भागवताच्या दशम स्कंधावर मराठीत लिहिले गेलेले पहिले काव्य म्हणजे वच्छाहरण होय. बालपणी श्रीकृष्णाने केलेलाअघासुर वध आणि कृष्णावताराची सत्यासत्यता पारखून पाहण्यासाठी ब्रह्मदेवाने गोपाळांचे आणि त्यांच्या वत्स्यांचे केलेले हरण या कथाभागावर वच्छाहरणाची उभारणी केलेली आपल्याला दिसते. श्रीकृष्ण हे महानुभव पंथाचे आराध्य दैवत. त्यामुळे दामोदर पंडितांनी श्रीकृष्णाच्या जीवनातील या दोन महत्त्वाच्या घटना-प्रसंगावर या ग्रंथामध्ये मराठीतून भाष्य केलेले आहे. या ग्रंथामध्ये श्रीकृष्णवर्णन, यमुनातिरीचे वर्णन, वृंदावन वर्णन अशी काही स्थळ वर्णन येतात तर त्या सोबतच काही व्यक्ती वर्णनेही यामध्ये येताना दिसतात. या ग्रंथामध्ये भक्तीला सर्वश्रेष्ठ स्थान दिलेले आपल्याला पहावयास मिळते. दामोदर पंडितांना 'महानुभाव संप्रदायातील संत कवी म्हणावयास हरकत नाही' असे त्यांच्याबद्दलचे भाष्य अ.ना.देशपांडे यांनी केलेले आहे. दामोदर पंडितानी सुमारे ६० चौपद्या लिहिल्या असून त्यापैकी १९ मराठीत व उरलेल्या सर्व हिंदीत आहेत. यासोबतच त्यांनी काही स्तोत्र रचनांही केलेल्या आहेत.

*** ज्ञानप्रबोध**

या ग्रंथाचे लेखक पंडित विश्वनाथ बाळापूरकर हे असून त्यांनी इ.स.१२३१ मध्ये बाराशे चार ओव्यांचे प्रबंधकाव्य या ग्रंथाच्या माध्यमातून लिहिलेले दिसते. या ग्रंथामध्येही भक्ती भावनेचा विस्तार झालेला दिसतो. या ग्रंथात पंथ प्रवर्तकाचे म्हणजेच श्रीचक्रधरांचे अत्यादर पूर्वक वर्णनही कवीने केलेले आहे. शारदास्तवन, ज्ञानमहिमा, श्रोत्यांचा अनुनय या भागांवर ज्ञानेश्वरांच्या लेखणीची छाप असल्याचे सांगितले जाते. विरक्तीचे व ईश्वर भक्तीचे महात्म्य सांगणारा हा तत्वज्ञानाचा ग्रंथ आहे. महानुभव संप्रदायातील अनेक कवींनी गीतेवर भाष्य लिहिली आहेत. या भाषांपैकी फक्त 'ज्ञानप्रबोध' या ग्रंथालाच 'सातीग्रंथामध्ये' स्थान मिळालेले आपल्याला पाहायला मिळते. पंडित विश्वनाथ यांचा 'ज्ञानचंद्रिका' नावाचा अजूनही एक ग्रंथ त्यांच्या नावावर दिसतो.

*** सह्याद्रीवर्णन -**

पंथीय उपासकांच्या भूमिकेतून रवळोव्यास उर्फ राघोपाध्याय पाथरीकर यांनी इ. स. १३३३ मध्ये सह्याद्री वर्णन नावाचे ग्रंथकाव्य लिहिले. या ग्रंथाचे स्वरूप श्री दत्तात्रेयाचे स्त्रोत सांगितल्याप्रमाणे आहे. महानुभवीय वाङ्ग्यामध्ये थोर अवतारी पुरुषांच्या चरित्रांना त्यांचे नाव न देता ज्या परिसरात त्यांच्या लीळा गाजल्या त्या प्रदेशाचे नाव देण्याचा एक प्रघात दिसतो. उदाहरणार्थ 'ऋद्धीपूरवर्णन'. श्री दत्तात्रेयांचा अवतार जेथे झाला ते स्थान सह्याद्री म्हणून या ग्रंथाचे नाव 'सह्याद्री वर्णन' असे केलेले आहे. या ग्रंथामध्ये ५१७ ओव्या असून त्यामध्ये १६० ओव्या केवळ दत्तात्रेयांचे चरित्र उभे करण्यासाठी वापरल्या आहेत. त्यातही १०५ ओव्यात श्री दत्तात्रेयाचे मूर्ती वर्णन आले असून शेवटच्या ५५ ओव्यात दत्तचरित्र आले आहेत. या ग्रंथा ग्रंथाचा बराचसा भाग हा श्रीचक्रधरांच्या चरित्राने व्यापलेला आहे.

*** श्रीऋद्धीपूर वर्णन**

नरोव्यास उर्फ नारायणव्यास बहाळीये यांनी इ.स.१३६३ मध्ये या ग्रंथाची रचना केली. ऋद्धीपूर हे महानुभावीयांचे पवित्र धर्मक्षेत्र आणि तीर्थक्षेत्र होय. येथे श्रीगोविंदप्रभूंचे वास्तव्य होते. पंथस्थापनाही येथेच झाली. श्रीगोविंदप्रभू आणि चक्रधर यांच्या चरणस्पर्शाने पुनीत झालेली ही भूमी त्यांच्या सहवासाने पावन झालेला हा परिसर असल्यामुळे अनेक बारीकसारीक ठिकाणांचीही वर्णन या ग्रंथांमध्ये आलेले आपल्याला दिसतात. या ग्रंथामध्ये या पंथाविषयीचे गौरवोद्गार काढलेले दिसतात. ऋद्धीपूरचा परिसर, तेथील देवळे, राजमट, रायांगण, सरोवरे, उंबरवट, पडशाळा, महाद्वार, उंबरठा, ओठा इत्यादी स्थळांची सूक्ष्म वर्णने या ग्रंथात आली आहेत. तसेच या स्थळाचे या संप्रदायाच्या अनुषंगाने असणारे महत्त्व विशेषत्वाने नोंदविलेले आहे. या लेखनाला आत्मप्रत्ययाची बैठक असल्यामुळे त्यात काव्यात्मता आणि जिवंतपणा आलेला दिसतो. नरोव्यासांच्या वर्णनात कल्पनारम्यता आणि श्रद्धा यांचा मिलापही दिसून येतो. यासोबतच तत्कालीन भाषेचा वापरही या ग्रंथामध्ये दिसतो. रसाळपणा हा त्यांच्या ग्रंथभाषेचा विशेष नोंदविता येतो. या ग्रंथाद्वारे तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे दर्शन घडून येते. सबंध साती ग्रंथांमध्ये काव्यगुणदृष्ट्या स्वतंत्र आणि वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथ म्हणून श्री 'ऋद्धीपूरवर्णनाचा' उल्लेख केला जातो.

### ३.७.३ वारकरी संप्रदायातील साहित्य निर्मिती -

#### ३.७.३.१. संत ज्ञानेश्वर

*** ज्ञानेश्वरी -**

गीतेच्या १८ अध्यायातील ७०० श्लोकांवर मूळ अध्याय आणि क्रम न बदलता ९००० ओव्यांचे परमसुंदर भाष्य म्हणजे ज्ञानेश्वरी होय. संत ज्ञानदेवांनी इ.स. १२९० (श. १२१२) मध्ये या ग्रंथाची निर्मिती केली.

> शके बाराशतें बारोत्तरें।तै टीका केली ज्ञानेश्वरें ।
> सच्चिदानंद बाबा आदरें।लेखकु जाहला।

या ओवीवरून ज्ञानेश्वरीचा लेखन काल स्पष्ट होतो. तसेच या लेखकाचे लेखनिक हे सच्चिदानंद बाबा असल्याचेही येथे स्पष्ट होते.संत ज्ञानदेव वेदांपेक्षा भगवद्गीतेला महत्त्व देतात. कारण वेदांमध्ये फक्त त्रैवर्णिकांनाच स्थान आहे. पण भगवद्गीतेने मात्र स्त्री-शूद्रातिशूद्रांनाही आपल्यात सामावून घेतले आहे. म्हणून संत ज्ञानेश्वर आपले तत्त्वज्ञान सांगण्यासाठी भगवद्गीता हा पुराणग्रंथ निवडतात. या ग्रंथामध्ये गुरुकृपेचे सामर्थ्य ज्ञानदेवाने वर्णन केले आहे.

> जयाचेनि आठवे ।शब्दसृष्टी आंगवे ।
> सारस्वत आघवे ।जीव्हेसि ये ॥

या शब्दात ते गुरुकृपेचे सामर्थ्य वर्णन करतात. संत ज्ञानेश्वरांनी मांडलेले तत्त्वज्ञान हे अद्वैताचा पुरस्कार करणारे आहे. सर्वत्र एकच आत्मतत्त्व भरून राहिले आहे. त्याखेरीज दुसरे काहीच नाही. आत्माच सर्वत्र भरलेला आहे. शंकराचार्य हे जग मिथ्या मानतात. मूळ तत्त्व आणि जगत यांचा संबंध ते दोरी व सर्पाभास असा सांगतात. पण ज्ञानदेव मात्र ते तसे मानत नाहीत. पाणी आणि तरंग, रत्न आणि त्याची प्रभा, सुवर्ण आणि सुवर्णमणी अशा रूपाने ते ब्रह्म मानतात. म्हणजेच एकाचे अस्तित्व दुसऱ्यावर अवलंबून आहे. “जगातील नानात्त्व म्हणजेच चीदवस्तूची (परमतत्त्वाची) क्रीडाच होय. म्हणजे जगतही परमत्त्वस्वरूपच होय अशी त्यांची धारण आहे. ज्ञानदेवांनी मांडलेल्या या विचारासच ‘चिद्विलास्वाद’ असे म्हणतात.” (नसिराबादकर: पृष्ठ. ५०) परमेश्वराच्या कृपेसाठी कुलाची किंवा जातीची श्रेष्ठता गरजेची नसते. अथवा विद्वत्तेचीही गरज नसते. या ग्रंथामधील तत्त्वज्ञान हे आपोआपच काव्यरूपातून फुलू लागलेले दिसते. हळुवारपणा, कोमलता, धीरोदात्तता अशा काही अंगभूत गुणांमुळे हे काव्य साकारलेले दिसते. तत्त्वज्ञानासारखा रुक्ष विषयीही त्यामुळे कोमलकांत बनताना दिसतो. म्हणूनच ज्ञानदेवांच्या व्यक्तिमत्त्वाचा उल्लेख 'तत्त्वज्ञ कवी' असा केलेला आपल्याला पाहायला मिळतो. ज्ञानेश्वरांनी या ग्रंथामधून शांत, भक्ती आणि वत्सल या रसांना अधिक महत्त्व दिलेले आहे. त्यांच्या या रचनेमुळेच शांतरसाचे महत्त्व उठून दिसते. अनेक विद्वानांच्या लेखणीत सहसा न सापडणारे शब्द संत ज्ञानेश्वरांच्या या ग्रंथातून आणि एकूणच त्यांच्या लेखणीतून दिसतात. यातूनच मराठी भाषेचे असलेले सामर्थ्य त्यांनी इथे गौरविलेले दिसते.

- **अमृतानुभव –**

संत ज्ञानेश्वरांच्या लेखनाचे स्वरूप हे भावात्मक आहे. त्यांचा पहिला ग्रंथ' ज्ञानेश्वरी' हा गीतेवर आधारलेला टीकाग्रंथ असल्यामुळे त्याच्यावरती काहीएक बंधने आपोआप आलेली दिसतात. पण 'अमृतानुभव' या ग्रंथामध्ये मात्र तसे दिसत नाही. त्यामुळे स्वतंत्र प्रतिभेचा ग्रंथ म्हणून 'अमृतानुभव' या ग्रंथाकडे पाहिले जाते. या ग्रंथाचा लेखन काल इ.स. १२९२ आहे. ज्ञानेश्वरांचे वडीलबंधू आणि गुरू संत निवृत्तीनाथ यांनी 'ज्ञानेश्वरी हा टीकाग्रंथ आहे. पण मुकुंदराजांप्रमाणे स्वतंत्र ग्रंथ निर्मिती व्हावी' अशी इच्छा व्यक्त केल्याने ज्ञानेश्वरांनी हा ग्रंथ गुरुच्या आदेशाने लिहिला. या ग्रंथामध्ये पाच संस्कृत श्लोक आणि ८०४ ओव्या असून या ग्रंथाचे एकूण दहा प्रकरणात विभाजन झालेले आहे. “परब्रह्म परमात्मास्वरूप हे एकमेव, अद्वितीय असे तत्त्व सर्वत्र ओतप्रोत भरलेले असून या अनंतदृश्यरूप विश्वात एका परब्रह्माशिवाय अन्य काही नाही. जीवही परब्रह्मरूपच आहे. हा विचार या ग्रंथात ज्ञानदेवांनी प्रतिपादन केला आहे." (नसिराबादकर, पृ.५६)

- **चांगदेवपासष्टी-**

ज्ञानदेवांनी लिहिलेले एक प्रासंगिक  प्रकरण म्हणजे 'चांगदेव पासष्टी' होय. या ग्रंथाचे स्वरूपही तत्त्वज्ञानपर आहे. चिद्विलासवादाच्या भूमिकेतूनच या ग्रंथाची मांडणी झालेली दिसते. तत्त्वज्ञान पटवून देत असताना 'ज्ञानेश्वरी' आणि 'अमृतानुभव' या ग्रंथाप्रमाणेच या ग्रंथातही अनेक दृष्टांतांची योजना ज्ञानदेवांनी केलेली दिसते. आजातवाद, स्फूर्तीवाद, नामरूपातीतता, परमात्म्याची अनिर्वचनीयता इत्यादी तत्त्वे 'चांगदेव पासष्टी' मधून दिसून येतात.

- **ज्ञानेश्वरांची अभंगवाणी-**

ज्ञानेश्वरांची अभंगवाणी ही कीर्तन प्रवचनासाठी जन्मली असल्याचे सांगितले जाते. पंढरीच्या संतमेळ्याशी ज्ञानदेवांचा संबंध आल्यानंतर ही अभंगरचना झाली असावी. तसेच नामदेवांसोबतच्या तीर्थयात्रेतही ही अभंगरचना झाली असण्याची शक्यता सांगितली जाते. संत ज्ञानदेवांच्या नावावरती सुमारे ७६५ अभंग उपलब्ध आहेत. बहुतेक अभंग हे सांप्रदायिक विषयावरती लिहिलेले असून जीवसृष्टी आणि तत्त्वबोध सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावा हा त्यामागील हेतू दिसतो. बरेचसे अभंग कृष्णलीलावर्णनपर व हरीच्या सगुण-निर्गुण रूपाचे वर्णन करणारे आहेत. तसेच विठ्ठलवर्णनपर, पंढरी माहात्म्य सांगणारे अभंग या भागवत संप्रदायातले महत्त्वाचे अभंग ज्ञानदेवांनी लिहिलेले दिसतात.

अवघाची संसार सुखाचा करीन।
आनंदे भरीन तिन्ही लोकी।
जाईन गे माय तया पंढरपुरा।
भेटीन माहेरा आपुलिया।।

ज्ञानेश्वरांनी रचलेल्या बालक्रीडापर अभंगांमध्ये अनेक रूपके दिसतात. टिपरी, पाळणा, घोंगडी, हमामा, फुगडी अशा कितीतरी रूपकांच्याद्वारे भक्तीचे तत्त्व सामान्यांपुढे त्यांनी विशद केलेले आहे. प्रपंचाच्या सोप्या भाषेतून परमार्थाचा विचार त्यांनी या अभंगातून

सांगितलेला दिसतो. 'चंदनाची चोळी माझे अंग अंग जाळी' या विराणीतून प्रपंच आणि परमार्थाचा सुंदर समन्वय त्यांनी घडविला आहे.

'हरिपाठाचे अभंग' हा ज्ञानदेवांच्या अभंगवाणीतील महत्त्वाचा भाग आहे. या अभंगातून भागवत सांप्रदायिकांना वैराग्याचे बोल व नितीबोध ज्ञानदेव ऐकवतात. "देवाचिया द्वारी उभा क्षणभरी।तेणे मुक्ती चारी साधियेल्या।" यासारख्या अभंगातून अत्यंत साध्या आणि सोप्या शब्दातून ते परमार्थ वर्णन करतात. तसेच त्यांच्या अनेक अभंगातून नाम महिमेचे महत्त्व विशद केले आहे. त्यांच्या अभंगामधून अद्वैत्ववाद, विठ्ठलमाहात्म्य, पंढरी महात्म्य, संत समागम, नामस्मरण, सदाचाराचा उपदेश असे कितीतरी विषय आलेले दिसतात. "भावनेची आर्तता, कल्पनेची विशालता आणि शब्दांची सुकुमारता अशा तीन गुणांचे प्रयाग ज्ञानेश्वरांच्या काव्यातून साधले आहे असे मार्मिक शब्दात शं. गो. तुळपुळे ज्ञानदेवांच्या अभंगांचे वर्णन करतात.

एकूणच ज्ञानदेवांच्या या आगाद कार्यकर्तृत्वामुळे, लोकोद्धारासाठी झटण्याच्या त्यांच्या वृत्तीमुळे, लोकभाषेचा स्वीकार आणि पुरस्कार, संस्कृतपेक्षाही व्यावहारिक भाषेतून तत्त्वज्ञान सांगण्याचा प्रयत्न करून सर्वसामान्यांना भक्तिमार्गात आणण्याचा प्रयत्न या सबंध कार्यामुळे संत ज्ञानेश्वरांना 'वारकरी संप्रदायाचा पाया' असे मानले जाते. म्हणूनच 'ज्ञानदेवे रचिला पाया, उभारिले देवालया' असे जे उद्गार काढले जातात ते समर्पक आहेत.

### ३.७.३.२ संत नामदेव :

वारकरी संप्रदायातील अत्यंत महत्त्वाचे संत म्हणजे संत नामदेव होय. संत नामदेव यांचा कालखंड इ.स. १२७० ते इ.स. १३५० असा मानला जातो. नामदेवांचे जन्मगाव हे मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यातील नरसी - बामणी आहे.संत नामदेव-ज्ञानेश्वर हे समकालीन आहेत. 'शतकोटी तुझे करीन अभंग' अशी प्रतिज्ञा करणारे संत नामदेव यांच्या नावावरती अडीच हजार अभंग आढळतात. लौकिक आणि परमार्थिक संघर्षातील नामदेवांच्या मनातील भावदर्शन त्यांच्या अभंगातून होताना दिसते. संत नामदेवांच्या बहुतांश अभंगाचे स्वरूप हे आत्मचरित्रात्मक दिसते. म्हणूनच त्यांना मराठीतील पहिले आत्मचरित्रकार म्हणून संबोधले जाते. मराठीतील पहिले चरित्रकार म्हणून महानुभावी ग्रंथकार म्हाईंभट्ट यांचा उल्लेख केला जातो. त्यानंतर दुसरे नाव संत नामदेवांचे येते. काव्याच्या माध्यमातून त्यांनी पहिल्यांदा संत ज्ञानेश्वरांचे चरित्र लिहिले. यामध्ये त्यांनी आदी, समाधी आणि तीर्थावळी अशा प्रकरणातून ज्ञानेश्वरांचे चरित्र मांडलेले आहेत. संत नामदेवांना संत ज्ञानदेवांविषयी वाटणारा आदर व प्रेम त्यांच्या या चरित्रातून व्यक्त होताना दिसतो. या चरित्रामधील 'आदी' या प्रकरणात 'संन्याशाची मुले' म्हणून लोकांनी जी हेटाळणे केली व त्यामुळे ज्ञानदेवांना झालेल्या मनस्तापाचे चित्रण आलेले आहे. एकूणच संत ज्ञानदेवांच्या सबंध जीवनकर्तृत्वाचा धावता आलेख त्यांच्या या चरित्रातून नामदेवांनी मांडलेला दिसतो. ज्ञानदेवांच्या समाधी प्रसंगाचा उल्लेख ते "बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट।ओघ बारा वाट मुरडताती॥"अशा आर्त शब्दात करतात. "हरिणीविण खोपी पडियेली ओस ।दशदिशा पाडस भ्रमताती॥"अशी ज्ञानदेवांच्या इतर भावंडांची झालेली व्याकुळ अवस्था ते समर्पक शब्दांमध्ये व्यक्त करतात. ज्ञानदेवांचे सामर्थ्य रेखाटताना ते, "काय सांगू देवा ज्ञानोबाची ख्याती, वेद म्हैशामुखी बोलविले" अशा कौतुकपर शब्दातून व्यक्त करतात.

संत नामदेव हे भागवत धर्माचे पहिले प्रसारक होत. नामदेवांनी जनसामान्यांपर्यंत भक्तीचे महात्म्य पोहोचवले. नाम महात्म्य सांगणे व भक्तीचा महिमा विशद करणे हे त्यांच्या एकूण आख्यानक काव्यरचनेमागचा हेतू होता. तसेच आपल्या अभंगवाणीतून त्यांनी ईश्वरास उत्कट भक्ती कशी प्रिय असते हे सांगितले. आपल्यासोबत असणाऱ्या अनेक संत मंडळींची सुंदर चरित्रे त्यांनी रेखाटली. संत गोरा कुंभार, संत जनाबाई, संत चोखामेळा यांच्या जीवनातील एखाद दुसऱ्या घटनेचे नाट्यपूर्ण व चमत्कृतीपूर्ण असे आख्यानस्वरूपाचे चरित्र त्यांनी रचले. म्हणूनच त्यांना चरित्रकार संबोधले गेले. पौराणिक धाटणी व रसाळ निवेदन ही त्यांच्या चरित्राची वैशिष्ट्ये सांगता येतील. याबरोबरच संत नामदेवांनी दशावतार वर्णन, हरिश्चंद्राख्यान, श्रीयाळ आख्यान, ध्रुवाख्यान अशी अनेक आख्यानेही लिहिलेली दिसतात. यासोबतच संसाराशी दुरावा, ईश्वराचे प्रेम, ओढ, आर्तता, शरणागती, परमेश्वर प्राप्तीची तळमळ, परमेश्वर भेटल्यानंतर होणारा आनंद या सगळ्या आत्मपर भावनांचे वर्णन त्यांच्या आत्मपर अभंगातून येताना दिसते. कित्येकदा ते विठ्ठलावरचा अधिकार आपल्या परखड शब्दातून व्यक्त करतात. देवाची भेट होत नाही यातून येणारी व्याकुळता, हतबल अवस्था ते आपल्या अभंगातून व्यक्त करताना दिसतात. “अमृताहुनी गोड नाम तुझे देवा” असा भाव ते आपल्या अभंगातून मांडतात. त्यांच्या इतर अभंगांपैकी 'बाळक्रिडेचे अभंग' हे महत्त्वाचे आहेत. जे श्रीकृष्णाच्या बालपणापासून ते यौवनावस्थेपर्यंतचे विविध प्रसंग त्यातून रेखाटतात. ज्यामध्ये अद्भुतरम्यता, चित्रमयता, नाट्यपूर्णता या वैशिष्ट्यांचा समावेश होताना दिसतो. याशिवाय संत नामदेवांनी काही आरत्या व भूपाळीही रचल्या आहेत. “युगे अठ्ठावीस विटेवरी उभा, वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा” ही आरती नामदेवांनीच लिहिलेली आहे. त्यांच्या अनेक अभंगातून शेत, धेनु, घोंगडे, पांगुळ, जातेअशी अनेक रूपके येताना दिसतात. त्यांचे प्रत्येक अभंग म्हणजे त्यांचे स्वतःचेच एक चरित्र असे त्यांच्या अभंगाचे स्वरूप आहे. त्यांनी हिंदी भाषेमध्ये केलेली रचना संत 'नामदेवजी की मुखबानी' म्हणून प्रसिद्ध आहे. संत नामदेवांच्या एकूण कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला असता त्यांना मराठीतील पहिले भावकवी, पद्य चरित्रकार, आत्मचरित्रकार, आख्यानकवी, भागवत धर्माचे पहिले संघटक आणि प्रचारक, कीर्तनपरंपरेचे प्रवर्तक, आपल्या शिष्याची समाधी बांधणारे गुरु असे संपन्न व्यक्तिमत्त्व म्हणून सर्वांसमोर दिसतात. "नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी" असा एक सकारात्मक भाव आपल्या कीर्तनपरंपरेतून उभे करणारे संत नामदेव हे वारकरी संप्रदायातील व एकूणच मराठी साहित्य परंपरेतील महत्त्वाचे कवी संत म्हणून ओळखले जातात.

### ३.७.३.३ संत मेळा -

संत ज्ञानदेवांनी वारकरी संप्रदायाची स्थापना करून गीताभाष्याच्या निमित्ताने चीद्‌विलासवाद व अजातवादाच्या आश्रयाने आपले तत्त्वज्ञान मांडले व त्या आधारे निष्काम कर्मयोग शिकवला. देव कधीही कोणामध्ये भेद करत नाही. तो दगडात नसून सज्जनात असतो याचे भान करून दिले. स्वतःच्या उद्धारासाठी नाममंत्र जपण्याचा गुरू मंत्र त्यांनी दिला. संसारात राहूनही ईश्वर भक्ती करता येते हे पटवून दिले व समाजातील जातीभेद, स्त्री-पुरुष असा लिंगभेद या शास्त्रप्रामाण्य गोष्टींना नकार देऊन सर्व मानव एक असल्याचा व सर्वांनाही आत्मोद्धाराचा अधिकार असल्याची खात्री पटवून दिली. परंपरागत वैदिक तत्त्वज्ञान नाकारून सर्वसामान्यांना एकत्र आणणारे तत्त्वज्ञान त्यांनी वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून उभे केले. या तत्त्वज्ञानाला पुढे घेऊन जाणारे अनेक संत या

काळामध्ये अठरा पगड जातीतून उभे राहिलेले दिसतात. ही एक आध्यात्मिक लोकशाही होती. म्हणूनच पांगारकर या अध्यात्मिक लोकशाहीला पुढे घेऊन जाणाऱ्या संत मंडळाला 'संतमेळा'असे म्हणतात. या संतमेळ्यामध्ये संत गोरा कुंभार, संत सावतामाळी, संत सेना न्हावी, संत जोगा परमानंद, संत नरहरी सोनार, संत विसोबा खेचर, संत चोखामेळा, संत बंका महार, संत जनाबाई, संत मुक्ताबाई इत्यादी अठरापगड जातीतले संत होते.

- **संत गोरा कुंभार इ.स.१२६७ ते १३०९**

संत गोरा कुंभार यांचे 'सकलसंतगाथा'मध्ये वीस ते एकवीस अभंग उपलब्ध आहेत. पण या अभंगामधून ते परमेश्वर भक्तीचा एक आघात महिमा उलगडून दाखवतात. आपल्या कामांमध्येच परमेश्वर शोधण्याचा विचार संत गोरा कुंभार यांच्या अभंगातून उत्कटपणे येतो. "म्हणे गोरा कुंभार विठ्ठलमंत्र सोपा।एक वेळा बाप्पा उच्चारी रे।" असा नामाचा महिमा ते वर्णन करतात. "देवा तुझा मी कुंभार।नासी पापाचे डोंगर ॥अशा शब्दांमध्ये ते आपल्या सात्विक भावनेचा, परमेश्वर प्रीतीचा उच्चार करताना दिसतात.

- **संत सावतामाळी - इ. स. १२५० ते १२९५**

संत सावतामाळी यांचे 'सकलसंतगाथे'मध्ये फक्त बाराचा अभंग उपलब्ध असले तरी त्यांचे सर्वच अभंग संत मंडळींना मुखोद्गत असल्याचे दिसते. त्यांनी आपल्या व्यवसायातच विठ्ठल पाहिला आणि सारे जीवन विठ्ठलमय केले. "आमुची माळ्याची जात ।शेत लावू बागायत।आम्हा हाती मूठ नाडा।पाणी जाते फुल झाडा॥यासारखी त्यांची रचना ही सहज मुखोद्गत होणारी आहे. विठ्ठल भक्तीसाठी असणारी तळमळ त्यांच्या रचनेतून व्यक्त होते. सगळे जीवनच कसे विठ्ठलमय झाले आहे याचा आनंद ते व्यक्त करतात.

> "कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ॥
> लसूण मिरची कोथिंबीरी । अवघा झाला माझा हरी ॥"

हा अभंग त्यांच्या या आनंदाची प्रचिती करून देतो. अत्यंत साधी, प्रेमळ व उत्कट वाणी हे त्यांच्या अभंगाचे विशेष सांगता येतात.

- **नरहरी सोनार -**

शैव संप्रदायाचे कट्टर असणारे नरहरी सोनार हे नंतर संत ज्ञानदेवांच्या सहवासात आल्यानंतर विष्णूभक्त झाले. त्यांना योगमार्गाचेही ज्ञान झाले. नरहरी सोनार हे व्यवसायाने सराफी होते. सावता माळी यांनी ज्या पद्धतीने आपला व्यवसाय विठ्ठलमय केला त्याच पद्धतीने त्यांनी देखील आपला व्यवसाय विठ्ठलमय केला.

> "देवा तुझा मी सोनार । तुझे नामाचा व्यवहार ॥
> देह बागेश्री जाणे । अंतरात्मा जाण सोने ॥"

अशा पद्धतीने त्यांनी आपल्या व्यवसायातच विठ्ठलाचे दर्शन घडवले. तसेच त्यांनी आपल्या अभंगातून अद्वैत विचार मांडला. 'सकलसंतगाथे'मध्ये त्यांचे ३४ अभंग उपलब्ध आहेत. या

अभंगांमध्ये त्यांचे काही अभंग हे नाममहात्म्य सांगणारे देखील आहेत. "नाम फुकाचे फुकाचे।देवा पंढरीरायाचे।।"यातून नाम महात्म्य स्पष्ट होते.

- **संत चोखामेळा**

संत चोखामेळा जे वारकरी संप्रदायातले एक महत्त्वाचे संत कवी होत. संत चोखामेळा यांच्या नावावरती ' 'सकलसंतगाथे'मध्ये' ३४९ अभंगांची नोंद आहे. तसेच त्यांच्या नावावर 'विवेकदर्पण'नावाचे एक प्रकरणही सापडते. बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व करणारे संत चोखामेळा हे या संत मेळ्यातील अत्यंत महत्त्वाचे कवी होत. "हीन याति माझी देवा ।कैसी घडे तुमची सेवा।।" असा प्रश्न ते विठ्ठलाला आपल्या अभंगातून विचारतात. "जोहार मायबाप जोहार तुमच्या महाराचा मी महार" असे रूपकात्मक अभंगही त्यांनी लिहिलेले आहेत. त्यांच्या सर्वच अभंगातून तत्कालीन सामाजिक जीवनामध्ये दलितांवर होणाऱ्या अन्यायाची बोच सातत्याने व्यक्त होताना दिसते. पण असे असूनही परमेश्वर प्राप्तीचा मार्ग वारकरी संप्रदायाने खुला केल्यामुळे ते परमेश्वरभक्तीचा मार्ग आजमावतात. "देहासी विटाळ म्हणती सकळ । आत्मा तो निर्मळ शुद्ध बुद्ध ।।" अशी समज ते आपल्या अभंगातून व्यक्त करतात. संत चोखामेळा हे मंगळवेढ्याचे राहणारे अनेक तीर्थक्षेत्रे करून ते शेवटी पंढरपुरी आले व तिथे त्यांना शांती सुख मिळाले. अनेक ठिकाणी त्यांना मिळालेली बोचक वागणूक वारकरी संप्रदायामध्ये मिळाली नाही आणि म्हणूनच ते पंढरीस नामदेवांच्या कीर्तनामुळे हरिनामाशी एकरूप झाले. "कोण तू सोहळा कोण तू ओवळा । दोन्हीच्या वेगळा विठू माझा।।" असे उद्गार काढून विठ्ठल आणि भक्ताच्यामध्ये कोणतीही दरी नसल्याचे पटवून देतात. विठ्ठल दर्शनाची तळमळ त्यांच्या अनेक अभंगातून दिसून येते. त्यांची प्रत्येक रचना ही भावकविताच आहे. संत चोखोबा यांच्या व्यतिरिक्त त्यांच्या घरातील त्यांची पत्नी सोयराबाई, मेहुना बंका, धाकटी बहीण निर्मळा, आणि मुलगा कर्ममेळा या परिवाराने देखील विठ्ठल भक्तीचे महात्म्य सांगणाऱ्या अभंगरचना केल्या आहेत.

- **संत सेना न्हावी -**

संत सेना न्हावी यांनी संत निवृत्तीनाथ व संत ज्ञानदेवांना आपल्या गुरुस्थानी मानलेले दिसते. संतांचा उल्लेख ते 'मायबाप कृपावंत' असा करतात. सेना न्हावी हे मूळचे जबलपूर जवळील बांदूगडचे. तीर्थाटन करता करता ते महाराष्ट्रात आले आणि पंढरपूर भेटीनंतर तिथे झालेला आनंद ते "जाता पंढरीसी सुख वाटे जीवा।आनंदे केशवा भेटताची।।" अशा रचनेतून व्यक्त करतात. नाम महात्मे पटवून देत असताना ते "घेता नाम विठोबाचे, पर्वत जळती पापांचे" आणि "मुखी नाम नाही, त्याची संगती नको पाही" अशा रचनेतून व्यक्त करतात. साधुसंत व धर्मातून दिसणारा ढोंगीबाजपणा त्यांना रुचत नाही. त्यावर ते कडाडून टीका करतात. जातीहिनतेचे दुःख त्यांनी वारकरी संप्रदायात अनुभवले नाही. त्यामुळे मानवतावादाचा पुरस्कार देखील ते करतात. "आम्ही वारिक वारीका।करू हजामत बारीका।।" या अभंगातून आपला व्यवसायही कसा विठ्ठलमय झाला आहे याचे वर्णन ते करताना दिसतात.

- **परिसा भागवत -**

परिसा भागवत हा संत नामदेवांचा शिष्य होय. सुरुवातीला परिसा भागवत यांनी 'यातीहीन म्हणून संत नामदेवांची हेटाळणी केली होती. पण पुढे त्यांच्या सहवासात नामदेवांचे श्रेष्ठपण ध्यानात आल्यानंतर ते त्यांचे शिष्य बनले. "परसा वदे नामयासी।तुझे पूर्वज माझे चरणापाशी।।जरी तू हरिदास झालासी । तरी याती हीनची।।" अशी नामदेवांची हेटाळली त्यांनी केली होती. त्याच परिसा भागवताने पुढे "दुधावरील साय ते मी वानू काय । तैसे गाणे गाय नामदेव ।।" अशी नामदेवांची स्तुती केलेली आपल्यास पाहायला मिळते. परिसर भागवत यांच्याबद्दल फारशी माहिती उपलब्ध नाही.

- **विसोबा खेचर-**

विसोबा खेचर म्हणजे संत नामदेव यांचे गुरु होय आणि संत ज्ञानदेवांचे शिष्य होत. यांना संत ज्ञानदेवाकडून अद्वैताचा बोध झाला तर योगाची दीक्षा त्यांना सोपानदेवांकडून मिळाली असे सांगितले जाते. 'सकलसंतगाथे' मध्ये विसोबा खेचर यांचे फक्त दोनच अभंग उपलब्ध आहेत.

- **संत मुक्ताबाई-**

संतमेळ्यामधील वयाने सर्वात लहान असूनही कर्तृत्व व विचाराने उच्च अधिकार स्थानावर असणाऱ्या कवयित्री म्हणजे संत मुक्ताबाई होय. संत मुक्ताबाई यांच्या अभंगरचना या संत ज्ञानदेव, त्यांचे भावंडे आणि इतर संतांच्या सहवासामध्ये झालेल्या आहेत. त्यांच्या अभंगांमध्ये विषय विविधता दिसून येते. पंढरीमहात्म्य, नाममहात्म्य व संतसमागम यासारखे विषय त्यांच्या अभंगातून येतात. "मुंगी उडाली आकाशी । तिने गिळीले सूर्याशी।।थोर नवलाव झाला।वांझे पुत्र प्रसवला।।" अशी कूट रचना त्या करताना दिसतात. संत ज्ञानदेवांना निराशा येऊन ते जेव्हा ताटी लावून घेतात तेव्हा त्यांना उपदेश करणारे अभंग मुक्ताबाईने लिहिले. या अभांगांना 'ताटीचे अभंग म्हणून ओळखले जाते. ज्यामध्ये मुक्ताबाईंच्या मनातील सर्व आर्त भावना व्यक्त झालेल्या आपणास दिसून येतात. भावनेची कोवळीकता हे त्यांच्या अभंगाचे वैशिष्ट्य सांगता येते.

- **संत जनाबाई-**

या संत कवींच्या बरोबरच अनेक संत स्त्रियांनी आपल्या काव्यलेखनीतून हा समानतेचा विचार रुजविण्याचे काम केले. त्यांनी त्या त्या कालपटावर आपला ठसा उमटविलेला दिसतो. हेच त्यांच्या अभंगाचे शक्तीस्थान आहे. पौराणिक घटनापर, कृष्णलीलेचे वर्णन करणारे, समकालीन संतपरंपरेचा आराखडा मांडणारे, बोधपर, तत्त्वज्ञ स्वरूपाचे, नामस्मरण व विठ्ठलाचा भक्तिमहिमा वर्णन करणारे, नामदेवांच्या कुटुंबाबद्दलच्या जिव्हाळ्याचे वर्णन करणारे व वैयक्तिक जीवनानुभवाचे चित्रण करणारे असे अनेकविध आशय-विषय जनाबाईच्या अभंगातून आल्याचे दिसतात. ते अनुभवविश्व कधी हळुवार, कधी सूचक तर कधी थेटपणे आल्याचे दिसतात. मराठी साहित्यातील काव्यपरंपरेचा इतिहास समृद्ध होण्यास जनाबाईंची ही लेखनी पोषक ठरली आहे. त्याच्या या कर्तृत्वामुळेच त्यांना 'संत वाटिकेतील जाईची वेल'ही उपाधी दिली गेली आहे.

संत जनाबाई यांच्या नावावर 350 इतक्या अभंगांची नोंद आहे. संत नामदेव व समकालीन संत, जनाबाईंना जाणवणारा पोरकेपणा, विठ्ठलाच्या भक्तीची लागलेली आस, स्त्री म्हणून, दासी म्हणून समाजाने दिलेली वागणूक, यातून दलित म्हणून येत राहिलेली तीव्र जाणीव, भक्तीभावातील तन्मयता,संताची लक्षणे काय असावीत यावर केलेले भाष्य, मदतनीस असणाऱ्या विठ्ठलाचे रूप, समाजवर्तनातील योग्य-अयोग्यतेवर परखड भाष्य करणे अशी अनेक सूत्रे जनाबाईंच्या काव्यात दिसतात. जनाबाईंच्या भक्तीसाधनेची रीत निराळी आहे. हातात टाळ-विणा घेऊन जनाबाई भक्तीची उपासना करत नाहीत. किंबहुना त्यांना तितका वेळही नाही. याऊलट त्याचे दोन्ही हात सतत कामात गुतलेले आहे. या कामाच्या रगाड्यात विठ्ठलासाठी असा निवांत वेळ त्यांच्याकडे नाहीं भक्तीसाधनेसाठी त्या नामस्मरणाची साधी पद्धत अवलंबितात.

"नाम फुकट चोखट । नाम घेतां नये वीट।।
वाचें नाम विट्ठलाचें । तेणें सार्थक देहाचें।।

किंवा

दळिता कांडिता । तुज गाईन अनंता ॥१॥
न विसंबे क्षणभरी । तुझे नाम गा मुरारी ॥२॥

ही त्यांच्या भक्तिअराधनेची रीत आहे.

एकूणच यादवकालीन समाजजीवन आणि वारकरी परंपरेने उभी केलेली आध्यात्मिक लोकशाही याचे प्रकटीकरण जनाबाईंच्या या अभंगातून होते. बारा बलुतेदारी, व्यावसायिकता, वर्णव्यवस्था, जातव्यवस्था यामध्ये विभागलेल्या या लोकांना भक्तीची, नामस्मरणाची कवाडे कधीच खुली नव्हती. संतमेळ्यातील संतानी ती खुली करण्याचे केलेले कार्य म्हणजे बंडखोरी होय. ही बंडखोरी जातीने हीन मानलेल्या संतांनी आपल्या नवनिर्माणक्षम लेखनीने केली.

## ३.८ समारोप

तत्कालिन समाजात आर्थिक गुलामगिरीपेक्षा बौद्धिक गुलामगिरी वेदनादायी होती. लोकांमध्ये पराकोटीचा धर्मभोळेपणा, रुढींचावास होता. जन्मसिद्ध जातिव्यवस्था व कर्मवाद यामुळे व्यात्तित्व विकासाला वाव नव्हता. या अशा केविलवाण्या परिस्थितीतून जन सामान्यांना मुक्त करण्यासाठी संत संप्रदाय, चळवळ उदयास आलेली दिसते. महाराष्ट्रातील भक्ती संप्रदाय म्हणजेच वारकरी संप्रदाय. जात-धर्माच्या पलीकडे जाऊन सकल मानव समूहाला समानतेची शिकवण देणारा व भक्तीची कवाडे खुली करणारा हा संप्रदाय होय. या संप्रदायाची पायाभरणी संत ज्ञानदेवांनी केली तर त्याचा कळसाचा मान संत तुकारामांना जातो. ही चळवळीची पार्श्वभूमी धार्मिक आणि सांस्कृतिक बाबींशी जोडलेली होती. जातव्यवस्था मोडीत काढणे सहजसाध्य नव्हतेः तर या पल्याड असलेल्या आत्मविकासाला चालना देण्याचे काम या वारकरी संप्रदायाने केले. ग्रामसंस्थेतील आलुतेदार - बलुतेदार या वारकरी पंथाचे चाईक होते. ब्राहमण, सुतार, सोनार, कुंभार, अठरापगड जातसमुदायातील तेली, माळी, कुणबी, न्हावी, महार अशा लोक

यात समाविष्ट केले होते. कोणत्याही जातीतील व्यक्तीला भक्तिमार्गाद्वारे माध्यात्मिक उन्नती साधून नैतिक सामर्थ वाढवता येईल. सांसारिक दुःखावर मात करून परमार्थ साधता येईल याचा विश्वास या चळवळीने स्त्री-शुद्रातिशूद्रांमध्ये निर्माण केला.

## ३.९ संदर्भसूची


१. तुळपुळे, शं. गो. १९७३ : 'यादवकालीन मराठी भाषा', व्हीनस प्रकाशन, पुणे, प. आ. १९४२, दु. आ. १९७३

२. भावे, वि.ल., १९८२ : 'महाराष्ट्र सारस्वत,' खंड-१, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई प.आ. २८०८-९९, सहावी आ १८८२०

३. भावे, वि.ल., १९८३ : 'महाराष्ट्र सारस्वत', खंड-२, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई प.भा. १८९८-९९, सहावी आवृत्ती - १८८३.

४. सरदार, गं. बा २००६ : 'संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती', लोकवाङ्मय गृह, मुंबई, प. मा. १९५०, सातवी आवृत्ती २००६.

५. कुलकर्णी, श्रीधर रंगनाथ, १९९५ : 'मध्ययुगीन मराठी साहित्य : एक पुनर्विचार', राजहंस प्रकाशन, पुणे, प आ. १९९५.

६. नसिराबादकर, ल. रा. २००३ : 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर, सातवी आवृत्ती २००३.

७. देशपांडे, अ. ना. : 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, व्हीनस प्रकाशन, पुणे पूर्वार्थ (१९६६), उत्तरार्थ (१९६९).

८. पगडी, सेतुमाधवराव १९९३ : 'सूफी संप्रदाय: तत्त्वज्ञान आणि कार्य', परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई, दु. आ. १९९३

९. नरे-पवार, संध्या, २०१८ : 'या विठठलापायी जातीची वेस मी ओलांडली बाई', 'मुक्त षब्द' संपा. येषू पाटील, नोव्हेंबर-डिसेंबर, दिवाळी 2018.

१०. मुसळे, सीमा, २०१३ : 'संत जनाबाई', विद्रोही सांस्कृतिक चळवळ प्रकाशन,कोल्हापूर

११. शेवडे, इंदुमती, १९८९ : 'संत कवयित्री', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

१२. इर्लेकर, सुहासिनी, २००२ : 'संत जनाबाई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. प.आ.२००२

१३. ढाले, राजा २००९ : 'वाळवंटाची लेक : संत जनाबाई', शब्द दीपोत्सव, २००९.

१४. डॉ. गोसावी, र. रा. 'सकलसंतगाथा', खंड पहिला, सारथी प्रकाशन, पुणे, जुलै, २०००

## ३.१० अधिक वाचनासाठी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | देशपांडे, अ. ना. | : | ‘महानुभाव संतांची सामाजिक आणि वाङ्मयीन कामगिरी’, महानुभाव साहित्य प्रकाशन. |
| २. | शेणोलीकर, ह. श्री. देशपांडे, प्र. ना. | : | ‘महाराष्ट्र संस्कृती : घडण आणि विकास,' डायमंड, पब्लिकेशन. |
| ३. | शेणोलीकर, ह. श्री. देशपांडे, प्र. ना. | | 'महाराष्ट्राचा सामाजिक, सांस्कृतिक इतिहास,' के सागर, पब्लिकेशन. |

## ३.११ सरावासाठी प्रश्न

**अ. दीर्घोत्तरी प्रश्न**

१. यादवकालीन साहित्य परंपरेतील प्रमुख ग्रंथकारांचा आढावा घ्या.

२. यादवपूर्वकाल व यादवकाल यातील राजकीय व सामाजिक परिस्थितीचे विश्लेषण करा.

३. यादवकालीन संस्कृतीचे वेगळेपण विस्ताराने नोंदवा.

४. वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान सांगून या संप्रदायातील महत्त्वाच्या लेखनकृतींचा परिचय करून द्या.

**ब. लघुत्तरी प्रश्न**

१. नाथ संप्रदायाचे विशेष

२. लिंगायत संप्रदाय

३. साती ग्रंथ

४. संत नामदेवांचे लेखन कर्तृत्व

❖❖❖❖

# ४

# बहामनीकालीन समाज आणि संस्कृती

**घटक रचना :**

४.० उद्देश

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.३ बहामनी राज्याची स्थापना आणि वाटचाल

४.४ बहामनीकालीन समाजजीवन

४.५ बहामनीकालीन आर्थिक परिस्थिती

४.६ बहामनीकालीन महाराष्ट्रीय नेतृत्वाचे कर्तृत्व

४.७ बहामनीकालीन महाराष्ट्राचे धार्मिक नेतृत्व

४.८ समारोप

४.९ प्रश्नावली

४.१० संदर्भ

## ४.० उद्देश

१) विद्यार्थी बहामनी शासनकालाच्या स्थापनेच्या पार्श्वभूमीविषयी समजेल.
२) विद्यार्थ्यांना बहामनीकालीन समाजजीवनाचा परिचय होईल.
३) विद्यार्थ्यांना बहामनीकालीन आर्थिक स्थितीची माहिती मिळेल.
४) विद्यार्थ्यांना बहामनीकालीन महाराष्ट्रीय नेतृत्वाचे कर्तृत्व तसेच धार्मिक नेतृत्वाविषयी समजून घेता येईल.

## ४.१ प्रास्ताविक

महाराष्ट्रात बहामनी राज्याची स्थापना इ..स.१३४७ साली झाली असली तरी महाराष्ट्राचे स्वातंत्र्य इ.स. १२९६ मध्येच समाप्त झाले होते. मधल्या अर्धशतकाच्या काळात महाराष्ट्रात अनेक स्थित्यंतरे घडून गेली. या काळात इतिहास घडवणाऱ्या काही प्रेरक शक्ती होत्या. अल्लाउद्दिन खिलजीचे देवगिरीवरच्या आक्रमणाने मागील दीड हजार वर्षांच्या स्वातंत्र्याला सुरुंग लागला. अर्थात हा योगायोग किंवा अचानक घडलेले नव्हते. १२९६ पासून ओळीने चार वेळा यादवांचा पराभव झाला होता. स्वराज्य सांभाळण्याची शक्ती यादवांकडे राहिली नव्हती. उत्तर भारतातील राजकीय परिस्थितीचे आकलन करण्यात

यादव चुकले होते. यादवांचे पतन आणि बहामनीचा उदय त्याचबरोबर बहामनी काळातील महाराष्ट्राची एकूणच सामाजिक आणि सांस्कृतिक स्थिती याचा परिचय होणे आवश्यक आहे.



## ४.२ विषयविवेचन

रामदेवराव यादवाच्या मृत्यूनंतर (इ.स.१३१०-११) दिल्लीचा बादशहा अल्लाउद्दीन खिलजी याने यादवांचे साम्राज्य संपवून आपले वर्चस्व प्रस्थापित केले. अल्लाउद्दीन खिलजीच्या अस्तानंतर दिल्लीत जी अराजकता निर्माण झाली. या संधीचा फायदा घेण्याच्या दृष्टीने रामदेवरावचा जावई हरपाळदेव याने स्वतंत्र होण्याचा प्रयत्न केला. मात्र दिल्लीच्या तख्तावर बसताच अल्लाउद्दीनचा मुलगा मुबारक खिलजीने हरपाळदेवाला ठार मारले. आणि तेव्हापासून म्हणजेच इ.स.१३१७ च्याआसपास महाराष्ट्रावर इस्लामी सत्तेचे वर्चस्व निर्माण झाले. तेव्हापासून ते पुढची जवळजवळ तीन शतके छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यस्थापनेचे कार्य सुरू होईपर्यंत महाराष्ट्र मुस्लिम राजवटीखाली होता. या तीन शतकाच्या कालावधीत महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात खूप स्थित्यंतरे घडून आली. अर्थात या तीन शतकांपैकी दीड शतक बहामनी शासक सत्ताधारी होते. या कालावधीतील स्थित्यंतरांविषयी या घटकात जाणून घ्यावयाचे आहे.

## ४.३ बहामनी राज्याची स्थापना आणि वाटचाल

**इ**.स.१३२४ मध्ये दिल्लीत राज्यक्रांती होऊन तुघलक घराण्याच्या ताब्यात राजसत्ता गेली. इ.स.१३२४ ते १३५० हा काळ महंमद तुघलकच्या राजसत्तेचा समजला जातो. या काळात दिल्लीच्या मध्यवर्ती सत्तेने दक्षिण भारतातील मदुराईपर्यंत वर्चस्व स्थापित केले होते. मात्र तुघलकच्या या वर्चस्वाला बहामनी सत्तेने जबरदस्त शह दिला. इ.स.१३४७ मध्ये हसन-गंगू–जाफर खान याने बहामनी राज्याची स्थापना केली. जाफरखानपूर्वी दिल्लीस गंगू नावाच्या ब्राह्मणाच्या घरी गुलाम होता. या गुलामाची इमानदारी पाहून गंगूने दिल्लीच्या सुलतानाकडून त्याला सरदारकी दिली आणि पत्रिका पाहून 'तुला राज्यप्राप्ती होईल'असा आशीर्वाद दिला. महंमद तुघलकाच्या वेळी याने दौलताबादचा किल्ला जिंकून 'जाफरखान' हा किताब मिळवला. त्यामुळे हा निसंदेह पराक्रमी होता यात कुठलीही शंका असण्याचे कारण नाही. एकूण बहामनी सुलतानांची संख्या अठरा होती मात्र त्यांतील पहिला सुलतान हसन-गंगू – जाफर खान उर्फ अल्लाउद्दिनशहा (१३४७-५८), त्याचा मुलगा महंमदशहा (१३५८ - ७५), फिरोजशहा (१३९७-१४२२), अहंमदशहा वली (१४२२-१४३५) व अल्लाउद्दिनशहा (१४३५-५७) हे कर्तबगार होते. बाकीचे कर्तव्यशून्य होते असे म्हटले तरी वावगे ठरू नये, अशी परिस्थिती होती. 'केंब्रिज हिस्टरी ऑफ इंडिया' या ग्रंथात सर वूलसे हेग यांनी नोंदवलेले आहे, 'दारू' या वंशाला शापच होता. अठरा सुलतानांपैकी बहुतेक सर्व कट्टे दारुडे होते. त्यामुळे चहाडखोर, तोंडपुंजे, आपमतलबी यांचाच दरबारात भरणा असे आणि त्यांच्या सांगण्यावरून हे सुलतान वाटेल ती अनन्वित व क्रूर कृत्ये करीत.' (महाराष्ट्र संस्कृती, डॉ.पु.ग.सहस्त्रबुद्धे,पृ.३००) पंधराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत दक्षिणेतील आंध्र, कर्नाटक आणि महाराष्ट्र या प्रांतातील बऱ्याच मोठ्या प्रदेशावर बहामनी घराण्याची सत्ता होती. दीडशे वर्षांच्या कालावधीत महाराष्ट्रातील

दौलताबाद तसेच कर्नाटकातील 'गुलबर्गा' आणि 'बिदर' या ठिकाणी बहामनी राज्याच्या राजधान्या होत्या. दीडशे वर्षांचा कालखंड बहामनी सत्तेसाठी अजिबात शांतीपूर्ण राहिला नाही. या कालावधीत त्यांना अनेक पातळ्यांवर संघर्ष करावा लागला. विशेष म्हणजे सत्ताविस्तार करत असताना बहामनी राज्यकर्त्यांना स्थानिक सत्ताधीशांशी खूप झगडावे लागले. कोकणात माहीम, संगमेश्वर आणि दाभोळ या ठिकाणी हिंदू राजांची स्वत्तंत्र राज्ये होती. जव्हार व बागलाण येथेही स्थानिक स्वतंत्र राज्ये होती. संगमेश्वरच्या राजांनी तर १४७२ पर्यंत झुलवत ठेवले. महंमूद गवानसारख्या पराक्रमी प्रधानाला सातत्याने दोन वर्षे संघर्ष करावा लागला. महमूद गवानच्या फारसी पत्रातील मजकूर खूपच बोलका आहे. तो लिहितो, "संगमेश्वरच्या राजाचा प्रदेश आणि त्याचे अनेक किल्ले पाहून खात्री झाली की, केवळ शौर्याने आपण हा भाग जिंकून घेऊ हा विचार व्यर्थ आहे. संपत्ती मुबलकपणाने खर्च करणे हाही उपाय अंमलात आणला पाहिजे.'(महाराष्ट्र आणि मराठे, सेतूमाधवराव पगडी,पृ.२६) बहामनी सेनापती खलप हसन बसरी याच्या फौजेचे कोकणात शिर्क्यांनी केलेले शिरकाण प्रसिद्ध आहे. 'गुलशने इब्राहिमी' (१५९४-९५) या ग्रंथात कोकणच्या जंगलातील कत्तलीचे सविस्तर वर्णन आहे. वऱ्हाडातील गोंड राजांनीही १४२२ मध्ये बहामनी शासकांना प्रखर विरोध केला. कर्नाटकातील विजयनगरच्या हिंदू साम्राज्याने तर बहामनी सत्ताधीशांमध्ये प्रचंड दहशत निर्माण केली होती. खानदेशातील फारुकी घराणे त्याचबरोबर नाशिक आणि ठाणे जिल्ह्याच्या काही भागावर सुलतानाचे शासन होते त्यांनीही बहामनी राजवटीला विरोध केला. बहामनी सत्तेच्या दीडशे वर्षांच्या काळात महाराष्ट्राच्या कोणत्याना-कोणत्या कोपऱ्यातून विरोधाचे बिगुल वाजत राहिले. हे जरी मान्य केले तरी डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे म्हणतात त्याप्रमाणे, महाराष्ट्राच्या दोन तृतीयांशपेक्षा अधिक भागावर बहामनींचे पोलादी वर्चस्व प्रदीर्घ काळ टिकून होते, ही गोष्ट नाकारता येणार नाही."

## ४.४ बहामनीकालीन समाजजीवन

इ.स.१२९५ मधील अल्लाउद्दीन खिलजीच्या आक्रमणाने व्रतवैकल्ये, धार्मिक उत्सव, कर्मकांडात आकंठ बुडालेल्या यादवकालीन महाराष्ट्राला जबरदस्त हादरा बसला. अल्लाउद्दीन खिलजी या सारख्या क्रूर आक्रांताच्या स्वारीने महाराष्ट्राने स्वातंत्र्य गमावले त्याबरोबरच वेगळ्या अशा इस्लामी धर्म आणि संस्कृतीचा प्रभाव मान्य करावा लागला. बहामनी राजवटीने तब्बल दीड शतक (इ.स.१३४७ ते १४९०) महाराष्ट्र भूमीवर सत्ता गाजवली. अस्मिता बधिरलेल्या या काळाचे वर्णन करताना सेतुमाधवराव पगडी लिहितात, "राजकीय क्षेत्रात मराठ्यांना कसलेच स्थान राहिले नाही. क्षात्रवृत्तीचे मराठे खेड्यापाड्यातून शेतीव्यवसाय करून उदरनिर्वाह करू लागले. राजाश्रय तुटला म्हणून अनेक विद्वान ब्राह्मण घराणी पैठण, कऱ्हाडसारखी स्थाने सोडून उत्तरेत काशी, प्रयाग क्षेत्री आणि दक्षिणेत विजयनगरच्या राज्यात गेली. काही ब्राह्मण कोकणात आश्रयाला गेले." (महाराष्ट्र आणि मराठे, पृ. ७) मुस्लिमातही स्थानिक मुस्लिम आणि बाहेरून आलेले मुस्लिम, धर्मप्रसारक मौलवी, सूफी, काझी आणि शियापंथी, सुन्नीपंथी असा भेद होताच. त्यांच्यातही संघर्ष चालूच होते. बहामनी सत्तेची मुख्य ताकद परदेशातून आलेले मुस्लिम होते. या परदेशी मुसलमानांसंदर्भात डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे लिहितात, "हे परदेशी लोक सहजगत्याच धाडसी असत. नाना देश पाहिल्यामुळे संकटे भोगल्यामुळे, त्यांची बुद्धी चतुरस्त्र झालेली असे व कर्तबगारीही वाढलेली असे. त्यामुळे दक्षिण्यांना स्पर्धेत सहज मागे

टाकून भराभर ते वरच्या जागा मिळवीत आणि सर्वत्र आपले वर्चस्व प्रस्थापित करीत. यामुळे दक्षिणी लोकात त्यांच्याविषयी तीव्र मत्सर व द्वेषभाव निर्माण होऊन त्यातून अनेक अनर्थ निर्माण झाले.' (महाराष्ट्र संस्कृती, पु. ग. सहस्रबुद्धे, पृ.३०२) हे जॉर्जिया, तुर्कस्तान, इराण, इराक या भागातून आलेले होते. खलफ हसन बसरी नावाचा बहामनी सेनापती मूळचा इराकमधील होता. सुलतान कुलीकुतूबशहा आणि वजीर महमूद गवान इराणचे होते. पुढील काळात स्थानिक मुस्लिमांना परदेशी मुस्लिमांचे वर्चस्व डोईजड वाटू लागले. यामुळेच की काय स्थानिक मुस्लिमांनी हिंदूंशी राजकीय सलोखा करायला सुरुवात केली. पण याचा अर्थ असा नव्हे की बहामनी राज्यकर्ते आरंभापासून सहिष्णू होते. ते सतत हिंदू जनतेला काफर मानत राहिले आणि राजकीय आणि सांस्कृतिक वर्चस्व लादत राहिले.

बहामनी सत्तेच्या दीडशे वर्षांच्या काळात सूफी संप्रदायाने राजसत्तेच्या आश्रयाने आपला प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अल्लाउद्दीनच्या स्वारीनंतर मुंतोजबोद्दीन जर्जरीबक्ष याच्या नेतृत्वाखाली सातशे सूफी दिल्लीहून महाराष्ट्रात खुलताबादला आले होते. पुढील काळातही संख्या हजारोंच्या वर गेली. राजाचा आशीर्वाद असल्याने सूफींसाठी वातावरण अनुकूल होते. स्वाभाविकपणे सूफींचे प्रस्थ वाढत गेले. मात्र सूफींचे तत्त्वज्ञान मराठी समाजाला आकृष्ट करू शकले नाही. बहामनी काळात वारकरी संप्रदायाची लोकप्रियता वाढतच गेली. कान्होपात्रा, दामाजी, भानुदास, सेना न्हावी हे संत बहामनी काळातच उदयाला आले. दत्त संप्रदाय याच काळात प्रसिद्धीस पावला. मुसलमान राजसत्तेला सूफींच्या साह्याने धार्मिक वर्चस्व निर्माण करणे शक्य झाले असले तरी, वारकरी आणि दत्त संप्रदायाच्या कार्यामुळे इस्लामी धर्मप्रचाराला चाप बसला यात शंका असण्याचे काहीच कारण नाही.

## ४.५ बहामनीकालीन आर्थिक परिस्थिती

बहामनीकालीन राजवटीतील आर्थिक परिस्थिती कशी होती यासंबंधीची माहिती फारशी उपलब्ध नाही. सुलतान फिरोझच्या काळात परदेशाबरोबर व्यापारी संबंध होते. गोवा व दाभोळ या बंदराची भरभराट झाली होती. यावरून महाराष्ट्राची आर्थिक स्थिती चांगली असावी असा अंदाज बांधता येतो. शहरांची वाढ झाली होती. परदेशातून आलेले मुस्लिम शहरात वसाहत करून राहत होते. सूफींवर राजसत्तेचा वरदहस्त होता त्यामुळे तेही शहरात राहत होते. महाराष्ट्रातील ग्रामजीवन परंपरागत होते. पाटील व देशमुखांची वतने बहामनी राज्यकर्त्यांनी मान्य केल्याने देशावर असलेल्या राजवटीचे त्यांच्या दृष्टीने फारसे महत्त्व नव्हते. खेड्यातील जनतेच्या गरजा मर्यादित होत्या. खेडी स्वयंपूर्ण होती. लढाईचा काळ सोडला तर इतर वेळी खेड्यांतील जीवन सुरक्षित होते. दुष्काळाने मात्र सामान्य जनतेचे कंबरडे मोडले होते. इ. स.१४६८-१४७५ मधील दुर्गादेवीचा दुष्काळ भयंकर होता. प्रा. ह. श्री. शेणोलीकर आणि डॉ. प्र. न. देशपांडे बहामनी राजसत्ता प्रदीर्घ टिकण्यामागे दुष्काळ हे कारण असावे असे म्हणतात.

(महाराष्ट्र संस्कृती: घडण आणि विकास, शेणोलीकर/ देशपांडे, पृ. २१०) इ. स. १४४८-१४७८ या कालखंडात रचल्या गेलेल्या महिकावतीच्या बखरीतील पुढील उल्लेख महत्त्वपूर्ण आहे. 'या मध्ये हे राज्यकुळ खल्लक सैनिक ईनामक सर्व रईत अजम सेक आलावदिनाची जालि ॥ या उपर देसा मध्ये ते हि बहुत यवन जाले ॥ राज्य अभिमान

सांडला ॥ शस्त्रे सोडली ॥ कृषि धरली ॥ सोमवंशि कारकोणि गावखोति ताडखोति ताडमदिरेस उदिम धरिला ॥' यावरून तत्कालीन परिस्थितीची काहीशी कल्पना येते.

## ४.६ बहामनीकालीन महाराष्ट्रीय नेतृत्त्वाचे कर्तृत्व

बहामनी रियासतीत यादव, निंबाळकर, सावंत, सुर्वे, शिर्के, भोसले अशी घराणी पराक्रम गाजवत होती. ही घराणी यादवांच्या कारकीर्दीत किंवा त्यांच्या पूर्वीही उत्तरेतून येऊन इकडे स्थायिक झाली होती. यांतील काहींनी यादवकाळात पराक्रम दाखवून आपली ओळख निर्माण केली होती. बहामनीकाळात यांतील बऱ्याचशा घराण्यातील पुरुष पाचशे ते पाच हजार स्वारांचे मनसबदार होते. मुरार जगदेव, जगदेवराव पवार, लखुजी जाधवराव, मालोजी, शहाजी भोसले असे काही असामी तर आदिलशाही, निजामशाही या राज्यात सेनापती पदांपर्यंतही गेले होते. मात्र यांच्यापैकी कोणीही मुस्लिम सत्तेला आव्हान दिलेले आढळत नाही. प्रत्येकाने आपापल्या जहागिऱ्या, मनसबदाऱ्या, वतने मिळवण्यात व राखण्यात धन्यता मानली होती. हे सर्वच अत्यंत इमानेइतबारे, खुशीने सुलतानाची सेवा बजावत होते. भोसल्याचा मूळ पुरुष सजनसिंह व त्याचा पुत्र दिलीपसिंह यांनी हसन गंगू यास बहामनी सत्ता स्थापन करण्यास साह्य केले होते. बहामनी वजीर महंमद गवानने जेव्हा १४६९ साली कोकणावर स्वारी केली तेव्हा कर्णसिंह व भीमसिंह हे दोघे त्याच्याबरोबर होते. १४५३ साली बहामनी सेनापती मालक उत तुजार याने कोकणावर स्वारी करून राजे शिर्केंचा पाडाव केला. बहामनी सेनापतीच्या धमकीला घाबरून वरवर धर्मांतरास मान्यता देणाऱ्या शिर्क्यांनी खेळण्याचा सरदाराची मदत घेतली. या दोघांनी मुस्लिम सेनेला डोंगरात घेरून पाडाव केला आणि कोकणाचे स्वातंत्र्य अबाधित ठेवले. पुढे १४६९ साली महंमद गवान कोकण जिंकण्यात यशस्वी झाला. त्या लढाईत कर्णसिंहने धन्याची चाकरी बजावत रणांगणी देह ठेवला. सुलतानाने खुश होऊन कर्णसिंहचा मुलगा भीमसिंहला 'घोरपडे' किताब आणि मुधोळजवळ ८४ गावांची जहागीर नेमून दिली. बहामनी सत्ता स्थापन झाल्यापासून शंभर सव्वाशे वर्षे कोकणात शिर्के यांनी आपली सत्ता टिकवली मात्र मराठ्यांची संघटना करून बहामनीच्या तावडीतून महाराष्ट्राला मुक्त करण्याचा विचार त्यांच्या मनात आला नाही. उलट दुसऱ्या बाजूला बहामनी सुलतान महाराष्ट्र जिंकून स्वस्थ बसले नाहीत वरंगळ आणि विजयनगरवर अखंड आक्रमण करत राहिले. एकूणच महाराष्ट्रीय तत्कालीन नेतृत्व सर्वच बाबतीत उदासीन होते असे म्हणता येते. क्षात्रधर्माचा लोप या कारणामुळे हे नेते समाजरक्षण व धर्मरक्षण करण्यात अपयशी झाले असा निष्कर्ष डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे यांनी मांडला आहे. ( महाराष्ट्र संस्कृती, डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे, पृ.३३५)

## ४.७ बहामनीकालीन महाराष्ट्राचे धार्मिक नेतृत्व

तत्कालीन धर्मशास्त्रज्ञांनी आपल्या आसपासच्या परिस्थितीचा अजिबात विचार केलेला नव्हता हे प्रकर्षाने जाणवते. बहामनी सुलतान व त्यांचे सरदार हे दीन, अनाथ, हिंदू प्रजेवर अत्याचार, जुलूम करत होते, स्त्रियांवर जुलूम करीत होते, मंदिरे उध्वस्त करीत होते, मुर्त्या तोडत होते, लुटपाट करीत होते, शेती होत नव्हती, जोडीला दुष्काळ होताच. एकंदरीत प्रजेची स्थिती मोठी दयनीय होती. या सर्वांचे धर्मशास्त्रज्ञांना सोयरसुतक नव्हते. या

संकटांवर काहीतरी उपाय करावा असे त्यांना वाटले नाही. धर्मशास्त्रज्ञांच्या उदासीन वृत्तीविषयी डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे लिहितात, "धर्माचा व या दीनदशेचा, त्यांच्या लेखी, काही संबंधच नव्हता. धर्मामुळे अभ्युदयही साधला पाहिजे, समाजाची धारणा झाली पाहिजे, धर्मनियम हे समाजाच्या प्रभावाखाली, उत्कर्षासाठी केलेले असतात, लोकसंग्रह हे धर्माचेच कार्य आहे, हा प्राचीन थोर धर्मवेत्त्यांचा विचार या शास्त्रीपंडितांच्या दृष्टीपुढे कधीही नव्हता." ( महाराष्ट्र संस्कृती, डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे, पृ. ३४२)प्रजा मुस्लिम आक्रमणाला बळी पडत असतानाच्या परिस्थितीत धर्मवेत्त्यांनी रूढ धर्मतत्वांचा पुनर्विचार करून, धर्मसुधारणा करणे आवश्यक होते. समाजविघातक रूढी त्याज्य ठरवून, नव्या तत्त्वांचा समाजाला उपदेश द्यायला हवा होता. हे धर्मवेत्त्यांचे कामच असते. बहामनीकालीन शास्त्रीपंडितांनी असे तर काही केले नाहीच उलट धर्माला समाजविमुख, वैयक्तिक, कर्मकांडयुक्त रूप देऊन महाराष्ट्र समाजाची एक प्रकारे अधोगतीच केली.

डॉ. काणे धर्मशास्त्रज्ञांच्या कार्याचे विवेचन करताना म्हणतात, "या काळात मुस्लिम सर्वत्र देवळे पाडीत होते. लोकांना सक्तीने बाटवीत होते. अत्याचार करीत होते. पण त्यावेळचे धर्मशास्त्रज्ञ व्रते, प्रायश्चित्तविधी, श्राद्धविधी, तीर्थयात्रा, अशाच यावर आपले सर्व बुद्धिबळ खर्च करीत होते. सर्व भारताला घेरीत चाललेल्या राजकीय व धार्मिक घोर आपत्ती विषयी ते अगदी अलिप्त होते. त्या संबंधीच्या सुखद अशा अज्ञानातच ते राहत होते." (धर्मशास्त्राचा इतिहास, खंड ५ वा, पृ. ४७) वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की धर्मशास्त्रज्ञांनी तत्कालीन समाजाचे नेतृत्व न करता अधोगतीस जात असलेल्या समाजाकडे पाठ फिरवली.

**आपली प्रगती तपासा :**

प्रश्न : बहामनीकालीन समाजजीवन स्पष्ट करा.

## ४.८ समारोप

रामदेवराव यादव जिवंत असेपर्यंत मुस्लिम शासकांनी दक्षिणेत प्रवेश केला नव्हता. त्याच्या मृत्यूनंतर दिल्लीचा बादशहा अल्लाउद्दिन खिलजीने दक्षिणेत जम बसवला. त्याच्या क्रूर शासनकाळात महाराष्ट्रात अराजकता माजली होती. इ.स.१३१७ च्या दरम्यान रामदेवरावचा जावई हरपाळदेवने खिलजीचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला परंतु मुबारक खिलजीने त्याला ठार केले. तेव्हापासून महाराष्ट्रावर इस्लाम सत्तेने जे वर्चस्व स्थापित केले त्यामुळे महाराष्ट्राचे संपूर्ण समाजजीवन ढवळून निघाले. सुमारे दीडशे वर्षे बहामनी शासक महाराष्ट्रात सत्ताधीश राहिले

## ४.९ प्रश्नावली

### अ. दीर्घोत्तरी प्रश्न

१) बहामनी सत्तेच्या स्थापनेविषयी विवेचन करा.

२) बहामनीकालीन समाजजीवनाचा आढावा घ्या.

३) बहामनीकालीन राजवटीच्या काळातील महाराष्ट्राची आर्थिक स्थिती कशी होती ? ते लिहा.

**ब) टीपा लिहा.**

१) बहामनीकालीन महाराष्ट्रीय नेतृत्व
२) बहामनीकालीन धार्मिक नेतृत्व

## ४.१० संदर्भ ग्रंथ


१) सहस्रबुद्धे, पु.ग.;महाराष्ट्र संस्कृती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २०२० (पुनर्मुद्रण)

२) शेणोलीकर, ह.श्री., देशपांडे प्र.न.; महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, १९७४.

३) जोशी, प्र.न.; मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास (प्राचीनकाळ : प्रारंभापासून पेशवाई अखेरपर्यंत ), प्रसाद प्रकाशन, पुणे, १९७८.

४) मालशे, स.ग.(संपा.);मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड दुसरा भाग दुसरा, इ.स.१३५० ते १६८०, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, २०१० (दु.आ.)

५) गद्रे, ना.कृ.; महाराष्ट्र महोदयाचा पूर्वरंग, सचिव, महाराष्ट्र राज्य, साहित्य – संस्कृति मंडळ, मुंबई, १९७१ ( संस्कारित आवृत्ती )

६) दडकर, जया आणि इतर (संपा.); मराठी वाङ्मयकोश आरंभापासून १९२० पर्यंतचा कालखंड, जी.आर.भटकळ फाउण्डेशन, मुंबई, १९९८.

७) नसिराबादकर, ल.रा.; प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास,फडके प्रकाशन, कोल्हापूर,

८) शेणोलीकर, ह.श्री.; प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, १९७४.

९) भावे, वि.ल.; महाराष्ट्र सारस्वत, खंड १, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,

१०) जोशी, महादेवशास्त्री (संपा); भारतीय संस्कृतिकोश, सहावा खंड, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, १९७० (प्र.आ.)

११) जोशी, लक्ष्मणशास्त्री (संपा); मराठी विश्वकोश, खंड११, सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, १९८२ (प्र.आ.)

१२) पांगारकर, ल.रा.; मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड दुसरा (एकनाथ-तुकारामांचा काल), विदर्भ मराठवाडा बुक कंपनी,पुणे-२, १९७२ (दु.आ.)

१३) भावे, वि.ल., महाराष्ट्र सारस्वत, पुरवणी तुळपुळे शं.गो., पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८२ ( सहावी आवृत्ती)


❖❖❖❖

# ५

# बहामनीकालीन संप्रदायांचे तत्त्वज्ञान
# (दत्त व सूफी संप्रदाय)

**घटक रचना :**

५.० उद्देश

५.१ प्रास्ताविक

५.२ विषयविवेचन

५.३ दत्त संप्रदाय

५.४ श्रीनरसिंह सरस्वती जन्म आणि बालपण

५.५ श्रीनरसिंह सरस्वतींचे कार्य

५.६ दत्त संप्रदायाचे तत्त्वज्ञान

५.७ योगमार्ग

५.८ दत्तसंप्रदायाचा आचारधर्म

५.९ गुरुचरित्र : संप्रदायाचा वेद

५.१० सूफी संप्रदाय

५.११ सूफींचे भारतातील संप्रदाय

५.१२ सूफी तत्त्वज्ञान

५.१३ अध्यात्म मार्गातील सात टप्पे

५.१४ सूफींचे त्रिप्रवास

५.१५ सूफी आणि योगमार्ग

५.१६ प्रेमभक्तीचे महत्त्व

५.१७ गुरुभक्ती

५.१८ समारोप

५.१९ प्रश्नावली

५.२० संदर्भ ग्रंथ

## ५.० उद्देश

१) विद्यार्थी दत्त आणि सूफी संप्रदायांचे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीतील योगदाना विषयी जाणून घेतील.

२) विद्यार्थी श्रीनरसिंह सरस्वतींच्या कार्याशी परिचित होतील.

३) विद्यार्थ्यांना दत्तसंप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचा परिचय होईल.

४) विद्यार्थी सूफींच्या भारतातील संप्रदायांविषयी जाणून घेतील.

५) विद्यार्थ्यांना सूफी संप्रदायाचे तत्त्वज्ञान, अध्यात्म मार्गातील सात टप्पे आणि सूफींच्या त्रिप्रवासाची माहिती होईल.

## ५.१ प्रास्ताविक

महाराष्ट्रातील समाजजीवनात अनेक संप्रदायांनी आपला महत्त्वपूर्ण ठसा उमटवलेला आहे. या संप्रदायांनी केवळ महाराष्ट्राचे आध्यात्मिक नव्हे तर तसेच वैचारिक उन्नयनही केले आहे. या संप्रदायांच्या प्रेरणेतून मध्ययुगीन मराठी वाङ्मयाची निर्मिती झालेली आहे. प्रत्येक संप्रदायाचे स्वतंत्र तत्त्वज्ञान असले तरी ईश्वराप्रती असलेला आदरभाव, श्रद्धा यांसारख्या काही गोष्टी मिळत्या-जुळत्या होत्या. प्रस्तुत घटकात दत्त आणि सूफी संप्रदायांचा अभ्यास करायचा आहे.

## ५.२ विषयविवेचन

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाची जडणघडण करण्यात अनेक संप्रदायांचे योगदान राहिलेले आहे. नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त, समर्थ, वीरशैव, नागेश, सूफी, आनंद या संप्रदायांच्या भरणपोषणाने मराठी मन उत्तरोत्तर समृद्ध होत गेले आहे. या सर्वच संप्रदायांनी सर्वसामान्यांच्या हृदयात स्थान निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. या सर्वच संप्रदायांच्या विचाराचा मूळ गाभा 'जगा आणि जगू द्या' हाच आहे. समता, बंधूता, मानवता, भूतदया या सूत्रांच्या पायावर सर्व संप्रदायांची इमारत उभी आहे. त्यामुळेच अनेक वादळात हे संप्रदाय तग धरून आहेत.

## ५.३ दत्त संप्रदाय

दत्त उपासना प्राचीन काळापासून प्रचलित असली तरी चौदाव्या शतकात महाराष्ट्रात तिला सांप्रदायिक स्वरूप प्राप्त झाले. श्रीनरसिंह सरस्वतींच्या अवतार कार्यातून दत्त संप्रदायाची खऱ्या अर्थाने ओळख झाली असे म्हटले तर वावगे ठरू नये. र. रा. गोसावी यांच्या मते तेराव्या शतकापासून महाराष्ट्रात आवेगाने वाहू लागलेल्या भक्तिसरितेला येऊन मिळालेला दत्तसंप्रदाय हा चौदाव्या शतकातील एक वैशिष्ट्यपूर्ण प्रवाह आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाच्या जडण-घडणीत या प्रवाहाने मोलाचे कार्य केलेले आहे.

## ५.४ श्रीनरसिंह सरस्वती जन्म आणि बालपण

दत्तात्रेयाचे दुसरे अवतार आणि श्रीपाद श्रीवल्लभाचे उत्तरावतार म्हणून दत्त संप्रदायात श्रीनरसिंह सरस्वतींची ख्याती आहे. 'गुरुचरित्र' या प्रसिद्ध ग्रंथाचे चरित्रनायक तेच आहेत. या ग्रंथाच्या ११ ते ५१ अध्यायांत त्यांचे चरित्र वर्णिलेले आहे. कुरवपूर येथील ज्या अंबिका नामक ब्राह्मण स्त्रीला श्रीपाद वल्लभांनी आशीर्वाद दिला होता, तीच अंबिका 'अंबा भवानी' या नावाने लाड कारंजा या गावी वाजसनेयी शाखेच्या ब्राह्मण कुळात जन्म झाला. तिचा विवाह त्याच गावातील माधव नावाच्या शिवव्रती ब्राह्मणाशी झाला. विवाहानंतर पूर्वसंस्कारानुसार ती शनिप्रदोषव्रताचे आचरण करीत राहिली. या व्रताचरणाला सोळा वर्षे झाल्यावर तिने शिवाच्या कृपेने शके १३०० च्या सुमारास एका बालकाला जन्म दिला ते बालक म्हणजेच श्रीनरसिंह सरस्वती होत. नरसिंह सरस्वतींच्या कालनिर्णयासंबंधी दोन मते आहेत. एका मतानुसार त्यांचे जन्मवर्ष इ.स.१३७८ असून इ.स.१४५८ ला त्यांचे निजानंदगमन झाले. दुसऱ्या मतानुसार इ.स.१४५८ हे त्यांचे जन्मवर्ष असून, इ.स.१५१८ हे निजानंदगमन वर्ष आहे. जन्मतःच ॐकार उच्चार करणारे हे बालक पुढे सात वर्षांपर्यंत मूक होते. पुढे मौजीबंधनाच्या वेळी गायत्री मंत्राची दीक्षा मिळाली. पुढील काळात त्यांनी काशी, बद्रीकेदार, प्रयाग, त्र्यंबकेश्वर, बासरगाव, परळी- वैजनाथ, भिलवडी, नरसोबाची वाडी (अमरापूर), गाणगापूर असा प्रवास व वास्तव्य केले. शेवटी श्रीशैल मल्लिकार्जुन या प्रसिद्ध साधनक्षेत्राच्या ठिकाणी आले. तेथील पाताळगंगेत त्यांनी शके १३८० ( सन १४५८ ) मध्ये चिरसमाधी घेतली.

## ५.५ श्रीनरसिंह सरस्वतींचे कार्य

श्रीनरसिंह सरस्वतींनी आपल्या आयुष्यात तीन तपे असे प्रदीर्घ भ्रमण केले त्यामुळे त्यांना अवनतीला गेलेल्या समाजाचे जवळून दर्शन झाले. अशा प्रसंगी धर्म, संस्कृती, भाषा आणि समाजजीवन यांची परंपरा टिकवून धरण्याचे आणि ती संवर्धित करण्याचे कार्य ज्यांच्या हाती आहे अशा ब्राह्मण वर्गाला प्रथम जागृत करण्याची त्यांना आवश्यकता भासली. या वर्गाची लाचारी आणि वृथा दंभ घालवण्याच्या दृष्टीने प्रयास केला. विस्कळीत होत असलेल्या समाजाला स्थिर करण्याच्या उद्देशाने स्व-कर्तव्याचरणाचा वर्णाश्रम धर्म पुन्हा प्रतिपादला. ते स्वतः संन्याशी असले तरी त्यांच्यात लोककल्याणाची तळमळ जागी होती. स्वत्वाच्या जाणिवेने जागृत झाल्याशिवाय समाज प्रतिकार करणार नाही हे त्यांनी जाणले होते. म्हणूनच वर्णाश्रम धर्माची पुन्हा स्थापना करण्याची गरज वाटली. तत्कालीन समाज खासकरून ब्राह्मण व क्षत्रिय हे आपले कर्तव्य विसरून परकीयांची सेवा करीत होते. हा समूह स्वाभिमान विसरून परकीयांना शरण गेला होता. श्रीनरसिंह सरस्वती यांनी आपल्या लोकोत्तर व्यक्तिमत्त्वाची छाप त्यांच्यावर पाडून स्वधर्माची महती पटवून दिली. हे कार्य करत असताना त्यांनी कुठलाही भेदभाव केला नाही. त्यांच्या कृपाप्रसादाने जसे ब्राह्मण लाभान्वित झाले तसे शूद्र, स्त्रिया, मुसलमान सुद्धा पावन झाले.

## ५.६ दत्त संप्रदायाचे तत्त्वज्ञान

श्रीनरसिंह सरस्वतींनी दत्तसंप्रदायाचे प्रवर्तन केले, असे लौकिक अर्थाने म्हटले जात असले तरी श्रीनरसिंह सरस्वतींनी अशा प्रकारे संप्रदायप्रवर्तन प्रत्यक्षरित्या न करता

परंपरेने चालत आलेल्या दत्तोपासनेचा एक गुरुमार्ग प्रवर्तित केला. त्यालाच पुढे जाऊन दत्त संप्रदाय म्हटले जाऊ लागले. दत्तसंप्रदायाचे तत्त्वज्ञान अद्वैत वेदान्तालाच अनुसरून आहे. स्वतंत्रपणे तत्त्वज्ञानाचे विवरण करणारा ग्रंथ या संप्रदायात उपलब्ध नसला तरी त्याचे सिद्धान्त 'त्रिपुरारहस्याचा ज्ञानखंड' (दत्त भार्गव संवाद, मराठी अनुवाद कै. वा.मा.जोशी), 'दत्तप्रबोध, ' दत्तमाहात्म्य' या ग्रंथात आले आहेत. दत्तप्रबोध या ग्रंथात अनन्तसुत विठ्ठलांनी दत्त-अनसूया संवादरूपाने जीव, जगत, ईश्वर यांसंबंधी तत्त्वज्ञान सांगितले आहे. उदाहरणार्थ, ब्रह्म म्हणजे काय व ते कसे जाणावे? असा प्रश्न अनसूयेने विचारला असता, दत्तात्रेय उत्तर देतात, "ब्रह्म हे अखिल, अभंग, निरूपाधिक, निःसंग, करून अकर्ते, भोगून अभोक्ते, शुद्ध, शांत, निर्गुण, निरामय, नित्यानंद व मनाला गोचर असे आहे. ब्रह्माण्ड रचणारे आणि इंद्रियांना प्रेरणा देणारे तेच आहे. ते जगदरूपाने नटले आहे. त्याला ज्ञानदृष्टीने जाणता येते." याच प्रश्नोत्तर स्वरुपात पुढील तत्त्वविवरण केले आहे. प्रकृतीचे स्वरूप सांगताना तिला 'मूळ परब्रह्माची त्याहून निराळी नसलेली जी इच्छाशक्ती, ती प्रकृती' असे म्हटले आहे. ही इच्छाशक्ती अपरिचित असून तिच्यातून त्रिगुणात्मक माया, भूतसृष्टी व तिन्ही लोक उत्पन्न होतात.

जीवासंबंधी 'जे मूळ परब्रह्मरूप आहेत, परंतु भिन्न भिन्न देह धारण केल्यामुळे ते भिन्न दिसतात.' असे म्हटले आहे. ईश्वराचे मूळ स्वरूप पुढीलप्रमाणे वर्णिले आहे; 'ब्रह्मा, विष्णु, महेश, सूर्य, अग्नी इत्यादी अनेक रूपे अनेकांनी मानली आहेत. परंतु ती एकाच देवाची रूपे आहेत. हा ईश्वर शरीरी वा स्थूलस्वरूप नसून, तो केवळ चैतन्यमय आहे. हे स्वरूप कोणाला दिसण्यासारखे आहे, ते कसे आहे, हे सांगता येणार नाही. विचाराने अहंभाव दूर सारून जे उरते; आणि ज्याचा त्याग करता येत नाही, तेच आत्मस्वरूप होय. ईश्वर आणि आत्मा हे भिन्न नाहीत. 'दृष्टीला भासणारे जड जगत चैतन्याहून निराळे नाही. सृष्टीच्या पूर्वी स्वतंत्र असलेल्या परमेश्वराने इच्छा स्वातंत्र्याने हे ब्रह्माण्ड निर्माण केले. हे जग त्याच्या संकल्पातून निर्माण होते, राहते व लयही पावते. आरशातील प्रतिबिंबाप्रमाणे जगत परमेश्वराच्या स्वरूपावर प्रकट झाले आहे.' हे जगतस्वरूपाविषयीचे दत्त संप्रदायाचे विचार आहेत. (पाच भक्तिसंप्रदाय, र.रा.गोसावी, पृ.२६८)

## ५.७ योगमार्ग

दत्त संप्रदायात सध्या उत्कट भक्तीला महत्त्व असले तरी प्राचीन परंपरेत हे योगाला महत्त्व देत होते. प्रा.गोसावी म्हणतात त्याप्रमाणे श्रीदत्तात्रयाने सहस्त्रार्जुनाला अष्टांगयोग समजावून सांगितलेला आहे. याचे कारण आज त्रिमूर्ती दत्तात्रेयाच्या स्वरुपात विष्णूच्या अंशाला प्राधान्य दिले असले, तरी दत्तात्रेयाचे मूळ स्वरूप शिवसंबद्ध असावे. त्यातूनच दत्तोपासनेच्या प्राचीन परंपरेत योगसाधना, तंत्रमार्ग इत्यादींना प्राधान्य मिळाले असावे. आजचा त्रिमुखी दत्त मात्र शुद्ध भक्तिभावावर अधिष्ठित झालेला दिसून येतो. मंत्रप्रभावालाही याच्या प्राचीन परंपरेत महत्त्वाचे स्थान होते.

## ५.८ दत्तसंप्रदायाचा आचारधर्म

प्रत्येक संप्रदायाचा स्वतःचा असा आचारधर्म असतो. हा संप्रदाय गुरूला प्राधान्य देणारा आणि सगुणोपासक आहे. दत्ताच्या सगुण साक्षात्कारासाठी उपासक कठीण अनुष्ठान

करतात. कायाक्लेश आणि आत्मक्लेशावर यांचा भर असतो. सांप्रदायिक दत्तात्रेयाच्या सगुण रूपाची पूजा करत असले तरी काही ठिकाणी मूर्तीऐवजी दत्ताच्या पादुकांची आराधना केली जाते. हा संप्रदाय गुरुसंप्रदाय असला तरी यात अन्य संप्रदायांसारखी गुरुशिष्य परंपरा निर्माण होऊ शकली नाही. सर्व अनुयायी दत्तात्रयालाच आपला गुरू मानतात हेही त्याचे कारण असू शकते. 'गुरुविण विद्या कैची' अशी श्रद्धा उपासंकात अवश्य आहे. मात्र गुरू परंपरा दिसत नाही. गुरूचे नेतृत्व नसल्यामुळे संघटना बांधणी झाली नाही. या संप्रदायातील सिद्ध पुरुष वेळोवेळी उपदेश करत राहिले आणि अनुयायी आचरण करीत राहिले. गुरुचरित्र या ग्रंथात काही असे आचार सांगितले आहेत ज्यांचा आणि परमार्थमार्गाचा अर्थाअर्थी काहीच संबंध जाणवत नाही. हे आचार साधकास कर्मकांडासाठी प्रेरित करतात. असे सर्व असूनही प्रा.गोसावी यांचे पुढील मत विचारणीय आहे. ते लिहितात, 'आचारधर्मातील काही अतिरेक सोडला, तर वेदाचार, शास्त्राचार, श्रेष्ठाचार, वृद्धाचार, कुलाचार, देशाचार, जनाचार, लौकिकाचार इत्यादी आचार निश्चितपाने उदात्त विचारसरणीतून निर्माण झालेले आहेत, याविषयी संदेह राहत नाही.' (पाच भक्तिसंप्रदाय, र. रा. गोसावी, पृ.२७१)

## ५.९ 'गुरुचरित्र' : संप्रदायाचा वेद

दत्त संप्रदायाचे मान्य ग्रंथ 'गुरुचरित्र', 'दत्तप्रबोध', 'दत्तमाहात्म्य' आणि 'गुरुलीलामृत' हे आहेत. यांतील 'गुरुचरित्र' हा ग्रंथ या संप्रदायाचा वेद मानला जातो. या ग्रंथाचे कर्ते सरस्वती गंगाधर आहेत. ग्रंथाच्या तिसऱ्या प्रकरणात ग्रंथकर्त्याविषयी माहिती आलेली आहे. सरस्वती गंगाधर रचित गुरुचरित्राचे ५१ अध्याय असून ओवीसंख्या ७४९१ इतकी आहे. मंगलाचरण, दत्तावतार चरित्र, श्रीपाद वल्लभ यांचे चरित्र, श्रीनरसिंह सरस्वतींचे अवतार चरित्र अशी या ग्रंथाची रचना आहे. गुरुभक्ती आणि प्रसाद हे या ग्रंथाचे दोन प्रमुख विशेष आहेत. चौदाव्या शतकांतील महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब हे या ग्रंथाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. दोन दत्तावतारांच्या चरित्रांविषयी प्रसंगाप्रसंगाने ब्राह्मणांचा आचारधर्म, सतीधर्म, व्रते, तीर्थे असे अनेक विषय रचनाकाराने हाताळले आहेत. वाङ्मयीन दृष्ट्या गुरुचरित्राचे मूल्यमापन करताना श्री.ज.स.करंदीकर लिहितात, 'वाङ्मयाच्या दृष्टीने पाहिल्यास श्रीगुरुचरित्र हा ग्रंथ श्रीधर कवीच्या शिवलीलामृतापेक्षाही सरस आहे. श्रीधराच्या वर्णनात नव्या कल्पना व कवित्वस्फूर्ती अल्पांशाने आढळते. त्याचे वर्णन नेहमीच पाल्हाळीक व ठराविक ठशाचे असते. त्यांत नाविन्य, अद्भुतरम्यता, रसाविर्भाव गुरुचरित्राच्या मानाने कमीच दिसून येतो.' करंदीकर शिवलीलामृताशी गुरुचरित्राची यासाठी तुलना करतात की दोन्ही ग्रंथांत दहा ते बारा कथासारख्या आहेत.

## ५.१० सूफी संप्रदाय

'सूफी' शब्दाची परिभाषा करण्याचा प्रयत्न आतापर्यंत अनेक विद्वानांनी केलेला आहे. काही विद्वानांच्या मते, 'सूफी' शब्द 'सफ' (रंग/पंक्ती) पासून निर्माण झाला आहे. न्यायदानाच्या अंतिम दिवशी जे लोक पहिल्या पंक्तीत उभे असतील–अल्लाजवळ असतील. त्यांना 'सूफी' म्हटले पाहिजे. शेख बशीर बिन हारिसुलहाफी यांचे मते 'सूफी' हा शब्द 'साफ' (शुद्ध) मधून निर्माण झाला. (सूफी संप्रदायाचे अंतरंग, अलीमवकील, पृ.१३) मदिन्याच्या मशिदीसमोर

एक 'सुफ्फा' (चबुतरा) होता. या चबुतऱ्यावर बसणाऱ्या लोकांना 'सूफी' म्हटले जाई. हे लोक अल्लाहच्या नामस्मरणात मग्न असत. जाडेभरडे वस्त्र धारण करून ज्यांनी भौतिक जगाशी नाते तोडले ते 'सूफी' ही व्याख्या इब्न खल्दून, एडवर्ड ब्राऊन, निकोल्सन, डॉ.जकी मुबारक आणि डॉ.मीर वलिउद्दिन यांसारख्या विद्वानांनी मान्य केली आहे. शेख बसरी म्हणतात त्याप्रमाणे ज्याला जमीन आसरा देत नाही आणि आकाश छत देत नाही तो सूफी. 'सूफी भौतिक जगापासून तुटलेला आणि परमेश्वराशी जोडलेला असतो असे.' असे सूफीविषयी शेख अबू बक्र शिबली यांचे मत आहे. (सूफी संप्रदायाचे अंतरंग,अलीम वकील,पृ.१५) मुहंमद पैगंबरांच्या वेळी 'सूफी' शब्दाचा वापर होत नसे. हसन बसरींच्या काळात 'सूफी' हा शब्द रूढ झाल्याचा दिसून येतो. मुहंमद बिन इसहाक यांच्या लेखनात सूफी शब्दाचा उल्लेख आलेला आहे.

'सूफीसंप्रदाय' इस्लाममधील एक भक्तिसंप्रदाय आहे. इस्लामच्या स्थापनेनंतर तीनशे वर्षांनी सूफीसंप्रदायाचा इराणमध्ये उगम झाला. सेतू माधवराव पगडी यांच्या मते, "मुसलमानी परंपरेप्रमाणे सूफी पंथाला सुरुवात महमंद पैगंबरांपासूनच झाली. महमंद पैगंबरांला परमेश्वराचा साक्षात्कार दोन प्रकारे झाला असे मानण्यात येते. एका साक्षात्काराचे दृश्य फल म्हणजे कुराण होय. दुसरा साक्षात्कार महमंद पैगंबरांना समाधी अवस्थेतून झाला. कुराणांतून प्रगट झालेले ज्ञान हे सर्वांच्याकरिता आणि दुसऱ्या प्रकारचे ज्ञान ही गूढ विद्या. ही विद्या गुरुपरंपरेनेच मुमुक्षूकडे पोहोचावयाची. या विद्येलाच सूफींची विद्या म्हणतात." इस्लामी धर्मशास्त्राला 'शरीयत' म्हणतात; तर पैगंबरांना झालेल्या साक्षात्कारावर आधारलेल्या सूफींच्या गूढवादी सिद्धांतांना 'तरकित' म्हणतात. इस्लामला सुरुवातीपासूनच अंतरंगातून आलेल्या आध्यात्मिक अनुभवांना सैद्धांतिक रूप देणाऱ्या परंपरेची व त्या आध्यात्मिक जीवनाची वाटचाल करताना मार्गदर्शकाची आवश्यकता होती. ही गरज सूफींनी पूर्ण केली.

## ५.११ सूफींचे भारतातील संप्रदाय

अली उल हुजवेरी (इ.स.१००० ते १०६२) हा भारतातील पहिला सूफी प्रचारक. महम्मद गझनीच्या काळापासून सूफींच्या भारतातील आगमनास सुरुवात झाली होती. अनेक ठिकाणी सूफीवादाचे उच्चाटन होऊ लागले. त्यांची उपासनाकेंद्रे उध्वस्त होऊ लागली. परिणामतः हे सूफी अफगाणिस्तानात आणि भारतात आले. (पाच भक्तिसंप्रदाय, र. रा. गोसावी, पृ.४०४ )थोर सूफी 'संत हुजविरी' यांच्यानंतर भारतामध्ये चिश्तिया, सुहर्वर्दिया, कादरिया आणि नक्शबंदी हे संप्रदाय निर्माण झाले.या संप्रदायांचा थोडक्यात परिचय करून घेऊयात.

- **चिश्तिया संप्रदाय :** ख्वाजा अबू इसहाक शामी चिश्ती (इ.स.११४२-१२३६ ) हे या संप्रदायाचे संस्थापक होत. हे मूळचे सिस्तानचे राहणारे. प्रथम लाहोर, नंतर दिल्ली आणि मृत्यूपर्यंत अजमेर येथे त्यांनी वास्तव्य केले. यांनी इ.स. ११६२ मध्ये शहाबुद्दीन घोरीच्या सेनेबरोबर भारतात येऊन या संप्रदायाची अजमेरला स्थापना केली. त्यावेळी दिल्लीचा शेवटचा हिंदू राजा पृथ्वीराज चव्हाण यांची कारकीर्द चालू होती. ख्वाजा अबू इसहाक शामी चिश्ती यांच्याविषयी मुसलमान बादशहापासून अमीर-उमराव आणि गरीब – श्रीमंतांनाही अपार भक्ती होती. गुरू शेख उस्मान हारुनी यांच्याबरोबर ते मक्का-मदिनेस

गेले असता पैगंबराकडून मुहिनोद्दीनला हिंदुस्थानात जाऊन धर्मप्रचाराचा आदेश मिळाला. अजमेरला आल्यानंतर त्यांच्याकडून हजारो हिंदूंनी त्यांच्याकडून इस्लामचा स्वीकार केला. वहदतल वजूद या सिद्धान्ताचा पुरस्कार हा संप्रदाय करतो. कुतुबुद्दीन बख्तियार काकी, शेख फरीदोद्दीन गंज शक्कर, निजामोद्दीन औलिया, खलिफ अहमद निजामी, अमीर खुस्त्रो यांसारखे अनेक थोर संत या संप्रदायात होऊन गेले.

- **सुहर्वर्दिया संप्रदाय** : या संप्रदायाची स्थापना बगदादमध्ये शहाबुद्दीन सुहर्वर्दी यांनी केली. हे या संप्रदायाचे प्रसिद्ध संत आहेत. यांचा आवारिफुल मारिफ म्हणजे परमात्म–ज्ञानाच्या देणग्या हा महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. हा ग्रंथ सूफींचा मार्गदर्शक ग्रंथ आहे. भारतात ही शाखा बहाउद्दीन झकारिया (इ.स.११८२-१२६७)यांनी आणली. राज्यकर्त्यांच्या मदतीने धर्मप्रचार करणाऱ्या या संप्रदायाची उत्तर व दक्षिण भारतात अनेक केंद्रे होती. सिंधपासून मुलतानपर्यंतचा प्रदेश या संप्रदायाचे प्रचारकेंद्र बनला होता. या संप्रदायाविषयी डॉ.अलीम वकील लिहितात, “या संप्रदायाने अनेक इस्लामेतर बाबी स्वीकारल्या. सूफींमध्ये असे संप्रदाय होते की, त्यांच्यावर प्रखर टीका केली जात असे. आपल्यावर टीका व्हावी या हेतूने ते विचित्र पद्धतीने वागत.” (सूफी संप्रदायाचे अंतरंग,अलीम वकील, पृ.६१)

- **कादरिया संप्रदाय** : बगदादला अब्दुल कादर गिलानी (इ.स.११३४-१२२३) या महान संताच्या नावावरून या संप्रदायास हे नाव पडले. यांनी सतत धर्माचा प्रचार केला. यांना निरनिराळ्या नावांनी संबोधले जात होते. उदा. ‘पीरे पीरान’ म्हणजे संतांचा संत, ‘गौसुल आशम’ म्हणजे महादाश्रय, ‘महबुब सुभानी’ म्हणजे परमेश्वरप्रिय, आणि ‘मोहिओद्दीन’ म्हणजे धर्मोद्धारक. त्यांच्या परंपरेतील सय्यद महंमद गौस पंधराव्या शतकाच्या पूर्वार्धात हिंदुस्थानात आला आणि त्याने या संप्रदायाची येथे स्थापना केली. मोगलांच्या काळात या संप्रदायाची हिंदुस्थानात भरभराट झाली. यातील थोर संत आपल्या उत्तुंग आध्यात्मिक जीवनामुळे समाजावर प्रभाव गाजवत होते. मुहम्मद मीर या संप्रदायातील महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व. दारा शुको व जहानआरा हे त्यांचे शिष्य होते. मीर यांची लाहोरला कबर आहे. ‘सुरुवातीस हिंदूंशी सहिष्णू वृत्तीने वागणाऱ्या आणि सांस्कृतिक धार्मिकदृष्ट्या उदारमतवादाचा पुरस्कार करणाऱ्या या संप्रदायास औरंगजेबापासून धर्मवेड्या वृत्तीने पछाडले आणि संप्रदायाची धर्मप्रसारक आक्रमक वृत्ती बळावत गेली आणि संप्रदायास उतरती कळा प्राप्त झाली.’ (पाच भक्तिसंप्रदाय, र.रा.गोसावी, पृ.४०७) वा.सी. बेन्द्रे आणि रा.चिं. ढेरे यांनी शेख महम्मदांच्या ‘योगसंग्रामा’ तील गुरुपरंपरेच्या आधारे महाराष्ट्रातील संत एकनाथांची गुरुपरंपरा ही कादरी परंपरेतील असल्याचे सांगितले आहे. यावरून महम्मद गौस-राजे महम्मद (शेख महम्मदाचा पिता) – चांद बोधले – जनार्दनस्वामी- एकनाथ अशी एकनाथांची गुरुपरंपरा ही या कादरी – सूफी – संप्रदायातील असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

- **नक्शबंदी संप्रदाय** : या संप्रदायाची स्थापना ख्वाजा बहाउद्दीन नक्शबंद (इ.स.१३१८-१३८९ ) यांनी केली. तुर्कस्थानमध्ये या संप्रदायाची स्थापना झाली. कपड्यांवर छापे मारण्याचा व्यवसाय केल्याने या संप्रदायातील अनुयायांना नक्शबंदी हे नाव मिळाले. काही भाष्यकारांच्या मते, आध्यात्मिक मानसिकतेचे चित्र रेखाटण्याच्या कलेमुळे त्यांना हे नाव पडले. हिंदुस्थानात या संप्रदायाची स्थापना सोळाव्या शतकात बाकी बिल्ला बेरंग यांनी केली. इस्लामी तत्त्वांशी जवळीक साधणारी तत्त्वप्रणाली त्यांनी मांडली. ‘बहदतल वजूद’ आणि ‘बहदतल शुजूद’ या दोन्ही सिद्धांतांमध्ये सांगड घालण्याचा

प्रयत्न त्यांनी केला. 'बहदतल वजूद' मध्ये सृष्टी परमेश्वराचा आविष्कार मानली जाते; तर 'बहदतल शुदूल' मध्ये तिला परमेश्वराचे प्रतिबिंब मानले जाते. हा संप्रदाय प्राणायाम, अधोमुखी दृष्टी, यात्रा, एकांतवास व आत्मविस्मृती या आठ नियमांवर भर देतो.

## ५.१२ सूफी तत्त्वज्ञान

भारतीय वैदिक तत्त्वज्ञान आणि सूफी संप्रदायाचे तत्त्वज्ञान आणि आचार यांत साम्य दिसून येते. कोण, कोणाकडून, कोणत्या संदर्भात प्रभावित झाले हे शोधणे मोठे जिकिरीचे आहे. इ.स. आठव्या शतकात उदयास आलेला हा संप्रदाय प्रथम देहदंडनावर भर देत होता. ईश्वरविषयक भय हा त्यांचा परमार्थप्रवणतेचा मूळ स्रोत होता. पुढे जाऊन ख्रिश्चन, बौद्ध, नवव्या शतकात ग्रीक प्लेटोवादाचा त्यांच्यावर प्रभाव पडत गेला. खास करून भारतीय अध्यात्मवादाचा यांच्यावर विशेष प्रभाव पडला. भारतीय धर्मपंडितांच्या प्रभावामुळे मानसिक उन्नयनावर यांनी भर दिला. या प्रभावाविषयी र.रा.गोसावी लिहितात, "बगदादचा खलिफा जगातील अनेक धर्मपंडितांच्या सभा घेऊन धार्मिक चर्चा घडवून आणीत असल्याचा ऐतिहासिक पुरावा दिला जातो. त्यामुळे वेदोपनिषदांच्या परंपरेने आलेले अद्वैत तत्त्वज्ञान इस्लामच्या स्थापनेनंतर तीन शतके ओलांडल्यावर स्थापन झालेल्या सूफीसंप्रदायात प्रविष्ट झाले असावे, असे म्हणणे काळाच्या संदर्भात सुसंगत ठरते." (पाच भक्तिसंप्रदाय, र.रा.गोसावी, पृ.४१०) अलबेरुनीने इ.स.१०३० च्या सुमारास कपिलाचे सांख्यदर्शन, पतंजलीची योगसूत्रे आणि भगवद्गीता या ग्रंथांचे अनुवाद केले आहेत. अनेक संस्कृत ग्रंथांचा अनुवादही यादरम्यान अरबीत झालेला आहे. त्यामुळे ओघानेच भारतीय अद्वैत तत्त्वज्ञान आणि योगमार्ग यांचा प्रभाव सूफींवर पडला. सूफी संप्रदायाची तात्त्विक भूमिका क्रमाक्रमाने उत्क्रांत होत गेलेली आहे. र.रा.गोसावी या तात्त्विक भूमिकेचे पाच प्रवाह मानतात.

- **पहिला प्रवाह -** पहिल्या प्रवाहाचा उगम श्रेष्ठ सूफी संत 'हुसेन – बिन-मन्सूर' (अल हल्लाज) यांच्या विचारांतून झाला. आत्मा आणि परमात्मा यांच्या एकात्मतेचा घेतलेला ध्यास म्हणजे त्याचे संपूर्ण जीवन होय. या एकात्मतेच्या प्रत्यक्ष अनुभवास 'अनल हक' असे म्हटले जाते. या उच्चतम आध्यात्मिक पातळीवरून त्याच्या गूढवादाची तत्त्वे साकार झाली आहेत. त्याच्या सिद्धान्तानुसार निर्मितीवरून परमेश्वर सर्वकाही होता, प्रकट व्हावे अशी त्याला इच्छा झाली. प्रेमरूप साधनाने त्याने विश्वरूप धारण केले. म्हणजे विश्वनिर्मितीपूर्वी परमेश्वर एकमेवाद्वितीय होता. या एकात्मतेतून विश्वातील अनेकता निर्माण झाली. हे सर्व काही प्रेमामुळे झाले. म्हणून या परमेश्वराच्या प्राप्तीचा मार्ग म्हणजे प्रेम वेदान्तातील निर्विकार, एकमेवाद्वितीय परम पुरुष हे परमात्मतत्त्व व त्याच्या शक्तीला कार्यान्वित करणारी प्रकृती हे परमेश्वराचेच अंगभूत तत्त्व मानले आहे. सूफींची तत्त्वदृष्टी त्याच्याशी जुळणारी आहे. त्या परमत्त्वतत्त्वाशी प्रेमातून ऐकात्म्य साधता येते, ही कल्पना अद्वैताच्या जवळ जाते. पण हे अद्वैत वेदान्त्यांचे केवलाद्वैत नाही. या तत्त्वज्ञानाचा व गूढ अनुभूतीचा प्रचार करणाऱ्या मन्सूरला कडव्या इस्लामींनी फासावर चढवले.

- **दुसरा प्रवाह -** तात्त्विक विचारांचा दुसरा प्रवाह 'सीना' याने सुरू केला. परमेश्वराचे अलौकिक आणि विश्वव्यापक स्वरूप आणि अद्वैतवादी दृष्टी यांमुळे हिंदू अध्यात्मवादाला हाही विचारप्रवाह निकटचा वाटू लागला. 'सर्वकाही परमेश्वरात आहे आणि परमेश्वर

सर्वांभूती', हे या विचारसरणीचे प्रमुख सूत्र होय. ज्ञानातून त्या सर्वव्यापकाचा अनुभव घेता येतो. हे अनुभव हेच सत्य. तेव्हा या अनुभवाच्या मुळाशी असलेले ज्ञान हेच अंतिम सत्य. हे बहुविध विश्व माया आहे, अज्ञान आहे. ज्ञानाने आत्मा व परमात्मा यांचे ऐक्य अनुभवास येते. असेच शंकराचार्यांचे तत्त्वदृष्टीला जवळ जाणारे तत्त्वज्ञान 'इब्न सीना' ने सांगितले.

- **तिसरा प्रवाह -** 'सुऱ्हावर्दी' यांनी प्रचलित केला. ईश्वरात विलीन होईपर्यंत आत्म्याला पुर्नजन्म प्राप्त होतो. परंतु परमेश्वरावरील निःस्सीम प्रेम, श्रद्धा, पश्चाताप, त्याग, जप यांद्वारे आत्मा मुक्त होतो व साधक अद्वैत स्थितीतील आनंद उपभोगू शकतो. या स्थितीत साधकाचे लौकिक अस्तित्व संपलेले असते. या परमोच्च अनुभूतीला या विचारधारेत 'फना' असे म्हणतात. हिंदूंत यालाच अद्वैतानुभूती म्हणतात. या परमतत्त्वाच्या अनुभूतीत सीनाला अक्षय सौंदर्य दिसते. सुऱ्हावर्दीला परंज्योती दिसते, तर अरबीला दर्शन घडते.

- **चौथा प्रवाह -** 'इब्न अल अरबी'ने चौथा विचारप्रवाह प्रवर्तित केला. त्यांच्या मते निसर्ग आणि मानव यांत परमेश्वराचेच प्रतिबिंब दिसते. अलौकिक भावशून्यतेच्या उच्चतम कोटीला पोहोचणे हे या विचारधारेचे प्रमुख सूत्र आहे. ही अवस्था ज्ञानाने प्राप्त होते. श्रद्धा व अविरत चिंतनाने हे ज्ञान प्राप्त करून घेता येते. या विचारांत त्यांनी सर्व धर्मपंथीयांना समाविष्ट करून घेतले आहे.

- **पाचवा प्रवाह -** पाचवी विचारधारा 'अब्दुल अल करीम जीली' यांनी प्रवर्तित केली. त्यांच्या मते सर्व विश्व हे परमात्म्याचेच स्वरूप आहे. त्या रूपाशी एकरूप होणे या सर्वोच्च अवस्थेला 'नुस्खा' असे म्हटले आहे. एकेश्वरवादावर अधिष्ठित झालेल्या या विचारधारेत उच्च कोटीचा गूढवाद सामावलेला आहे. भारतीय वेदान्त तत्त्वज्ञानाचा त्याच्यावर विशेष प्रभाव दिसून येतो. त्याच्या समन्वयशील दृष्टीला सर्व निष्ठा, सर्व पूजा त्या परमेश्वराच्या स्वरूपाचाच अनुभव प्राप्त करून देतात. त्यांतील फरक केवळ आभासात्मक आहे. त्याच्या वेगवेगळ्या नावांनी त्या वेगळ्या वाटतात, पण त्या सर्व मिळून पूर्णत्वच निर्माण होते, असाही विचार जिली यांनी मांडला आहे. आत्मा आणि परमात्मा यांचे प्रेममार्गाने – भक्तीप्रेमाने अनुभवाला येणारे ऐक्य म्हणजेच 'ईश्वरदत्त हकीकत'. ही अद्वैतस्थिती हाच एकूण सूफींचा प्रेममार्ग आहे.

## ५.१३ अध्यात्म मार्गातील सात टप्पे

आध्यात्मिक जीवनातील प्रगतीला सूफी पंथात 'मार्ग' म्हणतात आणि प्रवाशाला 'सालिक' म्हणतात. सालिकला परमेश्वराचे ज्ञान म्हणजे 'मारिफत' संपादण्याकरिता योग्य ती शिकवण देणे हा सूफींचा हेतु आहे. निरनिराळ्या आध्यात्मिक स्थानातून भक्ताला जावे लागते. त्याला 'मुकामात' म्हणतात. यांतून आलेल्या निरनिराळ्या अनुभवांना 'अहवाल' म्हणतात. मार्गाला 'अतरिकन' आणि परमेश्वराच्या मिलनाला 'फनाफिल हकीकत'म्हणतात. म्हणजे परमात्म्यांत विलीन होणे. परमेश्वर आणि मनुष्य यांतील अंतराचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे – " परमेश्वराभोवती ७० हजार प्रकाश आणि अंधाराचे पडदे आहेत. ते पडदे दूर केले तर परमेश्वराचे तेजाने सर्व भस्म होऊन जातील. यांतील अर्धे पडदे प्रकाशाचे आणि बाहेरील अर्धे अंधाराचे आहेत. आत्म्याला परमात्म्याशी मीलन होण्याच्या पंथांत सात मुक्काम लागतात. प्रत्येक मुक्कामाला दहा हजार पडदे नाहीशे होतात. शेवटच्या मुक्कामाला हे सर्व

पडदे नाहीशे होऊन शुद्ध झालेला आत्मा परमात्म्याच्या समोर उभा राहतो." (सूफी संप्रदाय : तत्त्वज्ञान आणि परंपरा,सेतु माधवराव पगडी,पृ.८)

अध्यात्मसाधना करताना भक्ताचा जीव सात टप्प्यांतून जातो. त्याला मकामात (मुक्काम) म्हणतात. अध्यात्म मार्गावरील सात मुक्काम पुढीलप्रमाणे आहेत –

१. 'उबुदियात' = सेवा. यांत मुमुक्षूला पश्चाताप होतो. आत्म्याचा आळस जाऊन आपल्या हातून घडलेल्या गोष्टींसंबंधी जाणीव व पश्चातापही होऊ लागतो.

२. 'इष्क' = प्रेम. यांत परमेश्वरी कृपेने आत्म्याला परमात्म्यासंबंधी ओढ लागू लागते.

३. 'जोहद' = निवृत्ती, त्याग.

४. 'मारिफत' = ज्ञान. त्यागात परमेश्वराला सोडून बाकी सर्व गोष्टींचा त्याग ही अभिप्रेत आहेत, आणि मारिफतमध्ये भक्त हा परमात्म्याच्या रूपगुणांचे ध्यान करू लागतो. हे ज्ञान 'इम्लि' म्हणजे ग्रंथावरून प्राप्त झालेले आणि 'हाली' म्हणजे ध्यानातून प्रगट झालेले असते. मारिफतमध्ये सर्व गोष्टींतून लक्ष वाटून घेऊन एका परमेश्वरात लावणे हे असते.

५. 'वजद' = उन्मनी अवस्था. यात परमेश्वराच्या ध्यानाने उन्माद अवस्था प्राप्त होते. याठिकाणी अशी अवस्था प्राप्त करून घेण्याकरिता भक्त हा ध्यानधारणा इ. करत असतो. प्रोफेसर निकोल्सनच्या मते सूफीझमचा पाया एका तत्त्वावर आहे आणि ते म्हणजे आत्म्याची जाणीव नाहीशी होते तेव्हा परमेश्वराचा साक्षात्कार होतो. उन्मनावस्थेतून आत्म्याचा संबंध परमात्म्याशी होऊ शकतो.

६. 'हकिकत'= परमेश्वरस्वरूपाचा पूर्ण प्रकाश या ठिकाणी मुमुक्षूच्या हृदयात पडतो. हा प्रकाश पडल्यावर मुमुक्षूला 'तवक्कुल' म्हणजे परमेश्वराबद्दल पूर्ण शरणागतीची भावना निर्माण होते. पण यात फक्त परमेश्वरालाच शरण जाणे आणि तोच एकमेव सत्य हे जाणणे याला 'तौहिद' म्हणतात. परमेश्वर सोडून दुसऱ्या कुणावरही निष्ठा ठेवणे म्हणजे त्या दुसऱ्या कुणाची व परमेश्वराची गल्लत केल्यासारखे होय.

७. 'वसल' = मीलन. या टप्प्यात मुमुक्षूला परमात्म्याचा साक्षात्कार होतो. यानंतर 'फना' व 'बखा' म्हणजे आत्मविस्मृती आणि 'परमेश्वरात जीवन कंठणे' चा अनुभव येतो. वसलच्या टप्प्यात भक्तांचे हृदय समाधानाने परिपूर्ण होते. हे समाधान म्हणजे परमेश्वराच्या इच्छेवर पूर्ण निष्ठा आणि त्याचे सहर्ष स्वागत असे या समाधानाचे दोन पैलू आहेत. म्हणजे परमेश्वर करील त्याच्यावर समाधान किंवा परमेश्वराला समाधान होईल तेच करणे.

## ५.१४ सूफींचे त्रिप्रवास

काही सूफींच्या मते आत्मोद्धाराचे तीन मार्ग किंवा प्रवास आहेत :-

१. 'सयरील्ला'= परमेश्वरापर्यंत प्रवास. यांत मुमुक्षू सृष्ट जगांतून परमेश्वराच्या आज्ञेने निर्माण झालेल्या जगापर्यंत प्रवास करतो. यांत तो वाहिदियांत आणि वहदत या दोन स्थानातून पार पडतो. हा प्रवास 'हकीकते महंमदी' मध्ये संपतो.

२. 'सैरेफिल्ला' परमात्म स्वरुपात प्रवास. यात मुमुक्षू परमेश्वर स्वरुपात प्रविष्ट होतो. हे अहदियातचे स्थळ आहे. या टप्प्यावरच मन्सूरने अनलहकचे उद्गार काढले.

३. 'सैर अनिल्ला' म्हणजे परमेश्वरापासून प्रवास. यात प्रगट विश्वाकडे आत्म्याचा प्रवास. परंतु परमेश्वर स्वरूपाचे ज्ञान घेऊन हे पहिले स्वरूप नष्ट करणे म्हणजे फना झाल्यानंतर. जीवन म्हणजे बका. (सूफी संप्रदाय : तत्त्वज्ञान आणि परंपरा,सेतु माधवराव पगडी,पृ.११)

## ५.१५ सूफी आणि योगमार्ग

सूफींवर योगमार्गाचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. यासंदर्भात र.रा.गोसावी यांनी मौलिक विचार मांडलेले आहेत. त्यांच्या मते पतंजली योगसूत्रे, कुंडलिनी योग यांचा अभ्यास अनेक प्रमुख सूफींनी केलेला होता. 'शिबली' च्या मतानुसार सूफींत 'इंद्रियदमन व श्वासनिरोधन' या यौगिक प्रक्रियांचा समावेश होतो. श्वास व उच्छवास यांचे जाणीवपूर्वक नियंत्रण केले जाते. आत येणारा व बाहेर जाणारा श्वास 'ला-इलाह' या पवित्र उच्चारणाबरोबर मार्गक्रमण करतो. श्वास नाभीपासून मेंदूपर्यंत कसा येतो व परततो, याचे वर्णन शिबलीने केले आहे. या भौतिक साधनेतून समाधीअवस्था प्राप्त करून घेणे हा उद्देश होय.

## ५.१६ प्रेमभक्तीचे महत्त्व

सूफी प्रेमभक्तीला अधिक महत्त्व देतात. परमेश्वरास प्रिया व स्वतःस प्रियकर मानून आपल्या प्रेयसीच्या प्राप्तीसाठी रात्रंदिवस तळमळणाऱ्या व त्यांच्या विरहात उत्कट प्रीतीचा अनुभव घेणाऱ्या समर्पित भक्तिभावाचा हा एक उच्च आदर्शच मानावा लागेल. प्रेमातून जग व परमेश्वर जिंकता येतो, हा सूफींचा आत्मविश्वास साधकास वैश्विक पातळीवर नेणारा आहे. हिंदू संतांनीही भक्तीतील हा मधुरभाव अनुभवलेला आहे. तथापि त्यांनी स्वतःकडे प्रेयसीची भूमिका घेऊन परमेश्वररूपी प्रियकराला आळवले आहे.

## ५.१७ गुरुभक्ती

सूफी पंथात गुरुभक्तीचे अतिशय महत्त्व आहे. परमेश्वराच्या मार्गात प्रगती करण्याकरिता गुरू असणे आवश्यक आहे. याला ते शेख, पीर किंवा 'मुर्शीद' म्हणतात. शिष्याला 'मुरीद' म्हणतात. आणि उपदेश घेणाऱ्याला 'बैत' म्हणतात. शिष्यामध्ये गुरू अध्यात्माची जाणीव उत्पन्न करून देतो. आपली आध्यात्मिक शक्ती शिष्याकडे दिली जावी. म्हणून पीर किंवा गुरू ध्यानाचा जो प्रकार उपयोगात आणतात त्याला 'तवज्जू' म्हणतात. अशाच प्रकारचे ध्यान मुरीद किंवा शिष्याने गुरुची आध्यात्मिक शक्ती आपल्यालाही लाभावी या निमित्ताने करावयाचे असते. गुरुभक्तीत गुरु सांगेल ते करण्याची तयारी मुर्शीदने ठेवावी लागते.

**आपली प्रगती तपासा :**

**प्रश्न :** सूफी संप्रदायाचा परिचय करून द्या.

## ५.१८ समारोप

दत्त आणि सूफी संप्रदायांनी मध्ययुगीन महाराष्ट्रीय जीवनावर छाप सोडलेली आहे. दत्त संप्रदाय हा चौदाव्या शतकातील एक वैशिष्ट्यपूर्ण प्रवाह आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीत या प्रवाहाने मोलाचे कार्य केलेले आहे. श्रीनरसिंह सरस्वती यांच्यापासून या संप्रदायाला वेगळी ओळख मिळाली. गुरुचरित्र या संप्रदायाचा महत्त्वाचा ग्रंथ आहे. दत्त संप्रदायाचे तत्त्वज्ञान अद्वैत वेदान्ताला अनुसरून आहे. या संप्रदायात योगाला महत्त्व आहे. सूफी संप्रदाय हा इस्लामचा भक्तिसंप्रदाय आहे. महम्मद गझनीच्या काळापासून सूफींच्या भारतातील आगमनास सुरुवात झाली होती. भारतामध्ये सूफींचे चार संप्रदाय निर्माण झाले. भारतीय वैदिक तत्त्वज्ञान आणि सूफींचे तत्त्वज्ञान आणि आचार यांत साम्य दिसून येते. सूफींच्या तात्त्विक भूमिकेचे पाच संप्रदाय आहेत. सूफी अध्यात्म मार्गाचे सात टप्पे मानतात. सूफींच्या मते आत्मोद्धाराचे तीन मार्ग आहे. सूफी संप्रदायात गुरुभक्तीला खूप महत्त्व आहे.

## ५.१९ प्रश्नावली

### अ. दीर्घोत्तरी प्रश्न

१) ‘दत्तसंप्रदायाचे तत्त्वज्ञान अद्वैत वेदान्तालाच अनुसरून आहे’ या विधानाची चर्चा करा.

२) सूफींच्या भारतातली संप्रदायांचा परिचय करून द्या.

३) सूफी संप्रदायाचे तत्त्वज्ञान विशद करा.

४) सूफींच्या अध्यात्म मार्गातील सात टप्पे कोणते ते लिहा ?

### ब) टीपा लिहा.

१) दत्त संप्रदायाचा आचारधर्म

२) गुरुचरित्र

३) सूफींच्या त्रिप्रवास

४) सूफी आणि योगमार्ग

## ५.२० संदर्भ ग्रंथ

१. गोसावी, र.रा.; पाच भक्तिसंप्रदाय, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००८ (ति.आ.)

२. ढेरे, रा.चिं.; दत्त संप्रदायाचा इतिहास, नीलकंठ प्रकाशन, पुणे, शके १८८५. (दु.आ.)

३. वकील, अलीम; सूफी संप्रदायाचे अंतरंग, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २०००.

४. सरदार, गं.बा.; संत साहित्याची सामाजिक फलश्रुती, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९७० (ति.आ.)

५. पगडी, सेतु माधवराव; सूफी संप्रदाय ( तत्त्वज्ञान आणि परंपरा), परचुरे ग,पां. प्रकाशन मन्दिर,गिरगांव, मुंबअी ४, १९५३

६. जोशी, महादेवशास्त्री (संपा);भारतीय संस्कृतिकोश, सहावा खंड, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, १९७० (प्र.आ.)

७. जोशी, लक्ष्मणशास्त्री (संपा); मराठी विश्वकोश, खंड ११, सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, १९८२ (प्र.आ.)

❖❖❖❖

# ६

# बहामनीकालीन मराठी भाषा आणि वाङ्मयाचे स्वरूप व वैशिष्ट्ये

**घटक रचना :**


६.० उद्देश

६.१ प्रास्ताविक

६.२ बहामनीकालीन परिस्थिती

६.३ बहामनीकालीन मराठी साहित्य

६.४ बहामनीकालीन मराठी भाषा

६.५ मराठीचा अन्य भाषांशी संबंध

६.६ समारोप

६.७ सरावासाठी प्रश्न

६.८ संदर्भ


## ६.० उद्देश

१. बहामनीकालीन परिस्थितीचा अभ्यास करणे.

२. बहामनीकालीन मराठी साहित्याविषयी जाणून घेणे.

३. बहामनीकालीन मराठी भाषेचे स्वरूप अभ्यासणे.

४. बहामनीकालीन मराठी भाषेचे वैशिष्ट्ये अभ्यासणे.

५. बहामनीकालीन मराठीचा अन्य भाषांशी संबंध समजावून घेणे.

## ६.१ प्रास्ताविक

भाषेच्या स्वरूपावर वाङ्मयावर त्या त्या काळातील राजवटीचा किंवा राजकारणाचा बराच परिणाम होत असतो. राज्यक्रांती बरोबरच धर्मक्रांती, समाजक्रांती व भाषाक्रांती होत असते. काळानुरूप साहित्यातही बदल होत असतो. भाषापरिवर्तन होण्यास राज्यपरिवर्तनच व्हावे लागते हे कृ.पां.कुलकर्णी यांचे ठाम मत आहे. या मतानुसार मराठी भाषेच्या उद्गमापासून तो तिच्या वर्तमानकालीन स्थितीपर्यंत जे कालखंड आहेत त्यांना कुलकर्णी यांनी राजवटीवरून नावे दिलेली आहेत. कुलकर्णी यांनी मराठी भाषेचे पाच

कालखंड पाडलेले आहेत. ते १. यादवकालीन, ६.बहामनीकालीन, ३.शिवकालीन, ४.पेशवेकालीन, ५.आंग्लकालीन असे आहेत. प्रस्तुत घटकात बहामनीकालीन भाषा व वाङ्मयाच्या स्वरूप व वैशिष्ट्यांचा विचार केलेला आहे.

## ६.२ बहामनीकालीन परिस्थिती

बहामनीकालीन मराठी भाषेचा अभ्यास करताना इ.स.१३५० -इ.स.१६०० या काळाचा प्रामुख्याने विचार केला आहे. यादवकाळातील मराठी भाषा जरी बाल्यावस्थेत असली तरी तिचे स्वरूप प्रगल्भ होते. अलंकार लेण्यांच्या ऐश्वर्यासारख्या गुणांनी समृद्ध होती. यादवांच्या आश्रयाखाली मराठी भाषा वृद्धिंगत होत जास्तीत जास्त परिपक्व होण्याकडे वाटचाल करत होती. मात्र ही परिस्थिती लवकरच बदलली. इस्लामच्या आक्रमणाने समाजव्यवस्था, ग्रामव्यवस्था, धर्म, आचार त्याचबरोबर भाषा या बाबी पूर्णपणे उध्वस्त होत गेल्या. या संदर्भात कृ.पां.कुलकर्णी लिहितात, 'तुर्कांनी हिंदूंच्या मूर्ती फोडण्यास सुरुवात करून उत्तर हिंदुस्थानात जो धार्मिक आकांत केला, तोच करण्यास ह्या कालापासूनच त्यांनी सुरुवात केली. ह्या राज्यक्रांतीने सर्व महाराष्ट्र देश मुळासकट हादरून गेला. ह्या राज्यक्रांतीला आरंभ जरी तेराव्या शतकात झाला तरी तिचे भयंकर परिणाम चौदाव्या शतकातच भोगावे लागले. देवगिरीच्या जाधवांची मध्यवर्ती केंद्रसत्ता नाहीशी झाल्यावर तिच्यावर अवलंबून असलेल्या इतर सत्ता उखडून टाकण्यास मुसलमानास वेळ लागला नाही. अशा रीतीने हिंदू भाषा, धर्म व संस्कृती ही त्रयी ज्या राज्यांच्या आधारावर होती तो आधारच काढून टाकल्यामुळे तिला लुळी पांगळी करून तिच्या ठिकाणी महंमदी यांनी आपली भाषा, धर्म व संस्कृती ही त्रयी स्थापण्यास सुरुवात करून थोड्याच वेळात सर्व क्षेत्र काबीज करण्याचा चंग बांधला. (मराठी भाषा उद्गम आणि विकास, कृ. पां. कुलकर्णी, पृ. २३२) दुसऱ्या बाजूला चौदाव्या शतकाच्या शेवटी पडलेल्या बारा वर्षांच्या दुर्गादेवीच्या दुष्काळाने महाराष्ट्रात हलाखीची परिस्थिती निर्माण झाली. या प्रतिकूल वातावरणात आणि भयंकर आपत्तीत धर्म, भाषा आणि संस्कृतीची 'न भूतो न भविष्यती' अशी पीछेहाट झाली.

## ६.३ बहामनीकालीन मराठी साहित्य

बहामनी काळात अनेक महत्त्वपूर्ण कवी होऊन गेले. नरसिंह सरस्वती व जनार्दनस्वामी या दोहोंच्या वाङ्मयकृती उपलब्ध नसल्या तरी यांच्या शिष्यांनी जी साहित्यरचना केली त्यामुळे मराठी भाषा आणि साहित्य निश्चितच लाभान्वित झाले आहे. सरस्वती गंगाधराने रचलेला गुरुचरित्र ग्रंथ महत्त्वपूर्ण आहे. गुरुचरित्र या ग्रंथात एकूण ५२ अध्याय आहेत व ७४९१ ओव्या आहेत. मंगलाचरण, गुरुभक्ती आणि गुरुप्रसाद हे या ग्रंथाचे प्रमुख विषय आहेत. गुरुचरित्राचे विशेष म्हणजे वेदान्त आणि क्रियाशून्य भक्तीला येथे स्थान नाही. नरसिंह सरस्वती या व्यक्तीपेक्षा गुरू या पदाला आणि गुरु-शिष्य या नात्याला गुरुचरित्रात खूपच महत्त्व दिलेले आहे. गुरुची कृपा प्राप्त करणे, ऐहिक आणि पारमार्थिक जीवनातील यश मिळविणे याचे मार्गदर्शन करणारा हा उत्तम ग्रंथ आहे. दत्त संप्रदायाचे अनुयायी श्रीपाद श्रीवल्लभ आणि नृसिंह सरस्वती या दोघांना श्री दत्तात्रेचा अवतार मानतात. त्यामुळे त्यांच्या विषयी या ग्रंथात विशेष वर्णन आलेले दिसून येते. याला दत्त संप्रदायाचा वेद म्हटले जाते. वर्तमान काळातही या ग्रंथाचे पारायण करणारी भाविक मंडळी आढळतात. या ग्रंथात विविध व्रत- वैकल्ये, तीर्थक्षेत्र आणि यात्रा यांची वर्णने आहेत. ब्राह्मणाने कसे वागावे

याविषयी नियम सांगितले आहेत. अश्वथ, औदुंबर, भस्म इ. दत्त संप्रदायाशी संबंधित महत्त्वाच्या संकल्पना यात स्पष्ट करून सांगितल्या आहेत. अंगाला भस्म विलेपन कसे करावे, शिवपूजा कशी करावी याचेही मार्गदर्शन ग्रंथात केलेले आहे. महिलांसाठी पातिव्रत्य आणि आतिथ्य म्हणजे अतिथी सत्कार याचे महत्त्व या ग्रंथातून विशद केलेले आहे. धर्माधर्मात भाईचारा वाढवा, समाजात शांतता प्रस्थापित व्हावी याविषयी या ग्रंथात विवेचन केलेले आहे. तत्त्कालीन परिस्थितीत हे अत्यंत आवश्यक होते, कारण त्याकाळी महाराष्ट्रावर इस्लाम शासकांची सत्ता होती. संत भानुदास या काळातील महत्त्वाचे संत होत. विजयनगरच्या श्रीकृष्ण राजाने पंढरपूरच्या विठ्ठलाची मूर्ती विजयनगरला नेली होती. ती मूर्ती संत भानुदासांनी परत आणली. संत भानुदासांच्या कुळातच संत एकनाथांचा जन्म झाला. एकनाथांना जनार्दनस्वामींनी अनुग्रह दिला होता. संत एकनाथांची प्रचंड ग्रंथरचना आहे. चतुःश्लोकी भागवत, एकनाथी भागवत, रुक्मिणीस्वयंवर, भावार्थ रामायण हे ग्रंथ आणि स्फुट प्रकरणात हस्तमलक, स्वात्मसुख, शुकाष्टक, आनंदलहरी, गीतासार, चिरंजीवपद, गीतामहिमा यांचा समावेश होतो. ज्ञानेश्वरीचे संशोधन हे एकनाथांचे सर्वात महत्त्वाचे भाषिक कार्य आहे. एकनाथपंचक म्हणून एकनाथ, दासोपंत, रामाजनार्दन, जनी जनार्दन, विठा रेणुकानंदन यांचा उल्लेख केला जातो. एकनाथांच्या समकालीन दुसरे प्रमुख ग्रंथकार आंबेजोगाईचे दासोपंत आहे. हे दत्त संप्रदायातील महत्त्वाचे ग्रंथकार आहेत. त्यांचे शंभराच्या जवळपास ग्रंथ आहेत. ‘महाराष्ट्रकवी’ मासिकात त्यांच्या ४८ ग्रंथांची यादी दिलेली आहे. असे म्हणतात की दासोपंताना रोज ढबू पैशाची शाई लागत असे. दासोपंत यांनी गीतेवर पाचग्रंथ लिहिलेले आहेत. यावरून त्यांच्या व्यासंगाचा परिचय होतो. दत्तात्रेयमाहात्म्य हा ग्रंथ आणि नामामृतस्तोत्र, प्रबंधस्तोत्र, शिवस्तोत्र, गुरुस्तोत्र, षोडशस्तोत्र इत्यादी स्तोत्रेही त्यांनी लिहिली आहेत. वाचकीपूजा, महापूजा, मानसिकपूजा अशीही त्यांची काही रचना आहे. याशिवाय ‘पदार्णव’ या त्यांच्या पदसंग्रहात, सव्वा लाख पदे आहेत. ‘वाक्यवृत्ती’ हा त्यांचा गद्य ग्रंथ आहे. यांपैकी ‘गीतार्णव’, ‘ग्रंथराज’ आणि गीतार्थबोधचंद्रिका’ हे उल्लेखनीय ग्रंथ आहेत.

सव्वा लाख ओवीसंख्या असलेला ‘गीतार्णव’ ग्रंथ अर्णव म्हणजेच सागरासारखा विशाल वाटतो. आजपर्यंत यातील फक्त १२,०५५ ओव्याच प्रकाशित झालेल्या आहेत. सविस्तर विवेचन हे दासोपंतांचे खास वैशिष्ट्य आहे. ‘गीतार्णव’ हा ग्रंथ कोणत्याही भाष्याच्या आधारे लिहिला नसून तो केवळ स्वानुभवाने लिहिला आहे असे कवीचे मत आहे. ‘स्वानुभव येथेचि प्रमाण’ असे कवीने स्पष्ट म्हटलेले आहे. या ग्रंथाची भाषा सुबोध व चटकदार आहे असे ल. रा. नसिराबाद यांनी स्पष्ट म्हटलेले आहे. ‘ग्रंथराज’ हा दासोपंताचा आणखी एक महत्त्वाचा ग्रंथ आहे. यातून स्वधर्माची ज्योत तेवत ठेवण्याचा संदेश कवीने दिलेला आहे. लोकांच्या अभिप्रायाची फिकीर कवी करीत नाही. ‘ग्रंथराज’ या ग्रंथाची छाप रामदासांच्या ग्रंथावर पडलेली आहे. काही विद्वान ग्रंथराज या ग्रंथास दासबोधाचा पूर्वावतार मानतात. दासबोध आणि ग्रंथराज यांतील अध्यात्म विषयात आणि त्यांच्या विवेचनातही बरेच साम्य आहे. ‘गीतार्थ बोध चंद्रिका’ हे गीतेवरील छोटे भाष्य दासोपंतांनी रचलेले आहे. यातील ओवीसंख्या ८८८९ एवढी आहे. दासोपंतांनी पंचीकरणावर केलेली रचना ४० फूट लांब पासोडीवर लिहून काढलेली आहे. एकनाथ आणि दासोपंत यांच्यानंतर नाथ, विठा, रेणुकानंदन, जनीजनार्दन, रामाजनार्दन, महालिंगदास, नरसिंह, विरेश्वर, रंगनाथ व नामदेवांच्या नावावर मोडणारे विष्णुदासनामा हे त्यांपैकी मुख्य होत. ह्या साधुसंतानी

आपल्या वाणीच्या सामर्थ्याने मराठीची जोपासना करून एका बाजूने फारसी भाषेचा हल्ला होत होता तरी त्यांनी मराठीचे सत्त्व कायम राखिले. एकनाथपूर्वकालीन कालखंडातील मराठी साहित्याविषयी ल.रा.नसिराबादकर लिहितात,'..... दत्त संप्रदायातील सरस्वती गंगाधर यांनी काही महानुभाव व जैनधर्मीय कवींनी या काळात ग्रंथरचना केली. पण महानुभावांची ग्रंथरचना सांकेतिक लिप्यांच्या पडद्याआड दडून राहिली. गोमंतकातही मराठीतून काही वाङ्मयनिर्मिती झाली. पण पोर्तुगीज राजवटीची दडपणे झुगारून पुढे येण्यासाठी तिला बराच अवधी लागला आणि त्यासाठी ग्रंथकार – संशोधकांना बराच झगडाही करावा लागला. त्यामुळे या कालखंडातील मराठी वाङ्मयाचे प्रतिनिधित्व करण्याचे श्रेय 'गुरुचरित्र'कार श्रीसरस्वती गंगाधर यांनाच द्यावे लागते.' नसिराबादकार यांचे उपरोक्त विचार स्वीकारणीय आहेत. (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, ल.रा. नसिराबादकर, पृ.१२७)

## ६.४ बहामनी कालीन मराठी भाषा

कृ.पां.कुलकर्णी यांनी बहामनीकालीन मराठी भाषेचे स्वरूप सांगण्याचा प्रयत्न केलेला आहेत. 'मराठी भाषा उद्गम आणि विकास' या आपल्या ग्रंथात कुलकर्णी या संदर्भात विवेचन करतात. त्यांच्या मते, एकनाथकालीन पद्यवाङ्मयात आढळून येणारी भाषा आणि उत्तरकालीन मुक्तेश्वर, श्रीधर व महीपती वगैरे कवींची भाषा पाहिली तर ह्या दोन्ही भाषांत कालाचे अंतर विशेष असून देखील त्या भाषांच्या स्वरुपात फरक दिसून येत नाही. उत्तरकालीन संतांनी पूर्वीच्या भाषेचा साचाच वापरला आहे. वर उल्लेख केलेल्या ग्रंथात कुलकर्णी यांनी पाटांगणात येथील अस्सल ज्ञानेश्वरी आणि एकनाथांनी संशोधलेली ज्ञानेश्वरी ह्या दोन्हींच्या भाषेची तुलना करून एकनाथकालीन मराठी भाषेचे स्वरूप उलगडून दाखवण्याचा प्रयत्न केलेला आहे. ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या शेवटी एकनाथ लिहिताना,

'शके पंधराशतें सावोत्तरीं । तारणनाम संवत्सरीं ।<br>
एकाजनार्दनेंअत्यादरीं। गीता ज्ञानेश्वरी प्रति शुद्ध केली ॥<br>
ग्रंथ पूर्वीच अतिशुद्ध । परीं पाठांतरें शुद्धाबुद्ध ।<br>
तेशोधोनीएवंविध। प्रतिशुद्ध सिद्ध ज्ञानेश्वरी ॥'

पाठांतराने अशुद्ध झालेली ज्ञानेश्वरीची भाषा एकनाथांनी शुद्ध केली म्हणजेच त्यांनी त्या भाषेला आपल्या काळाचे वळण दिले. खालील यादवकालीन व बहामनीकालीन भाषेची काही उदाहरणाने तुलना केली आहे.

**वर्णप्रक्रिया**

| यादवकालीन | बहामनीकालीन |
|---|---|
| रुतु | ऋतु |
| रिणिया | ऋणिया |
| गाजति | गर्जती |
| मांडियेला | मांडलेया |
| कैसीकैसीं | कसकसे |
| रोसे | रोषे |
| निनाले | निघाले |
| वेचले | वेचिले |
| नोहे | नव्हे |
| काइ | काय |
| चले | चळे |
| जाला | झाला, जाहाला |
| पुडुती | पुढती |
| उभगला | उबगला |
| दोसे | दोषें |
| वोझे | ओझे |
| साच | सत्य |

**प्रत्ययप्रकिया**

| यादवकालीन | बहामनीकालीन |
|---|---|
| तेयांते | तयातें |
| सांख्यवेदांताचा | सांख्यवेदांतांच्या |
| डोलेया | डोळ्या |
| मानु | मान |
| देवो | देव |
| पडिभरू | पडीभरू |
| तेया | तया |
| ऐसैया | ऐसा |
| जाला | जाहला |
| नव्हे | नाहीं |
| आतेल | आतल |
| एया | इया |

| | |
|---|---|
| तूझा | तुझ्या |
| नांव | नाम |
| आंतु | आतुल |
| आगा | अगा |
| राहाटी | राहटी |
| सकल | सगळा |
| दिवो | दिवस |
| पुरुषा | पुरुखा |
| पावेया | पावया |
| तूझे | तुझे |
| हो | जी |
| जाणसि | जाणसी |
| जिवा | जीवा |
| विषि | विषयीं |
| होतु | होतां |
| इये | ये |
| लागि | लागी |
| वेचता | वेचिता |
| वेडेया | वेड्या |

यादवकालीन मराठी भाषा आणि बहामनीकालीन मराठी भाषा ह्या दोहोंत कसा फरक पडला हे वरील दोन्ही तक्त्यांवरून कळते. यादवकालीन मराठी शुद्ध रूप पुढे जाऊन संस्कृतमय बनलेले दिसते. रुतु, रिण, साच ह्या अस्सल देशी उच्चारांच्या ऐवजी ऋतु, ऋण, सत्य संस्कृत शब्द आले. प्रत्ययप्रक्रियेतही फरक पडला. तेया, तेयाते, लोकांचेया, डोलेया यांच्याबद्दल तया, तयाते, लोकांचिया, डोलेया असे फरक झालेला दिसतो. नामाचे प्रथमेचे एकवचन, सर्वनामांची रूपे, वर्तमान व भविष्य काळांची क्रियापदांची रूपे याबाबतीत बहामनीकालीन मराठीत स्पष्ट फरक पडलेला आहे. 'मानु' बद्दल 'मान', 'तुसी' ऐवजी 'तुजसि' , 'म्हणौनि' बद्दल 'म्हणोनी' , 'साघैन' बद्दल 'सांगेन'अशी रूपे झालेली आहेत.

एकनाथांच्या भागवताच्या आधारे तत्कालीन भाषेचे स्वरूप समजावून घेण्याचा पुढे प्रयत्न केलेला आहे.

**नामांची रूपे**

| | |
|---|---|
| प्रथमा | अधिवासु, विश्वासु |
| द्वितीया | कोण्हा, रावळा |
| तृतीया | विश्वासें, नारदें |
| चतुर्थी | वधार्थ, शापार्थ |
| पंचमी | धर्माहूनि, तुजपासी |
| षष्ठी | लहरीचिया, सेवेचिए |
| सप्तमी | रणीं,दशमीं |

**विभक्तीचे प्रत्यय**

| **विभक्ती** | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| प्रथमा | अ,उ, ऊ, ओ, इ (स्त्री) | - |
| द्वितीया | अ,आ,आं,सी, ते, तें, लागी, प्रति,लागुनी | आ, ओ, ये |
| तृतीया | एं, ए, शीं, सीं, एंशी, आ, इ, ईया, एया | एंनि, इं, ईं |
| चतुर्थी | अर्थे, ते | - |
| पंचमी | हूनी, हूनि, परीस, पासी, पासव | - |
| षष्ठी | चिया, चिये,चे, ची, झा, झिया, लिया, ला. | - |
| सप्तमी | इं, आ, आंतु, आंतौता, माजीं, माझारीं | - |

**आख्यात रूपे**

| | |
|---|---|
| वर्तमानकाळ | पहातो, करीती, करी |
| भूत | ठकला, ठेला,  सांगे |
| भविष्य | करीन, म्हणाल, देखाल |
| आसार्थ | असोतु, पाहो, करी |
| विध्यर्थी | यजिजे, बोलिजे, म्हणिजे |

**काळांचे प्रत्यय**

| | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| वर्तमानकाळ | ती (इ) ए,ये, सी, शी<br>इ,उ,ए,इती | ता, आ<br>इती |
| भूतकाळ | ला (ली,ले), इ, ए | इ,ले,(ल्या) |
| भविष्यकाळ | ईन<br>ईल,शील<br>एल,ए | इ<br>आ, आल<br>- |

याठिकाणी बहामनीकालीन मराठी भाषेचे स्वरूप ज्ञानेश्वरीतील दोन प्रतीतील भाषांची तुलना करून व तत्कालीन इतर वाङ्मयाच्या भाषेवरून अशा दोन पद्धतीने विशद केले आहे.

## ६.५ बहामनीकालीन मराठीचा अन्य भाषांशी संबंध

बहामनी कालखंड स्थूलमानाने इ.स.१३५० पासून सुरु झाला असे मानले जाते. इ.स.१३१८ पर्यंत महाराष्ट्रावर यादवांचे राज्य होते. इस्लामी शासकांनी इ.स. १३१८ मध्ये महाराष्ट्राला ताब्यात घेऊन १३४७ पर्यंत ते दिल्लीहून चालविले. हुसेन गंगो बहामनीने दिल्लीशी संबंध तोडून दक्षिणेत राज्य स्थापिले. ते १४९२ पर्यंत बेदरास, १४८४ पर्यंत वऱ्हाडात, १४८९ पर्यंत अहमदनगर येथे, १४९९ पर्यंत विजापुरास व १५१२ पर्यंत गोवळकोंड्यास चालू होते. यानंतर दक्षिणेत बरीदशाही, इमादशाही, निजामशाही, आदिलशाही, कुतुबशाही अशा निरनिराळ्या शाह्या १५५६, १५७२, १६३७, १६८६ व १६८७ पर्यंत चालल्या. हे राज्यकर्ते फारसीचे कैवारी असल्यामुळे स्वाभाविकपणे राज्यकारभार फारसी भाषेत होत होता. परिणामी फारसी भाषेचा मराठीवर प्रभाव पडू लागला. महानुभाव साहित्य तसेच ज्ञानेश्वरीत आढळणारी शुद्ध मराठी हळूहळू फारसीमय होऊ लागली. फारसी – मराठीचा हा संबंध जो सुरु झाला तो पुढे पेशव्यांच्या काळातही कायम होता. संत एकनाथांच्या काळात फारसीचा मराठीवर किती जबरदस्त प्रभाव होता त्याचा अंदाज पुढील उदाहरणावरून सहज येईल.

"अर्जदास्त अर्जदार बंदगी बंदेनवास अलेक सलाम साहेबांचे सेवेसी; बंदे शरीराकार जीवाजी शेखदार बुधाजी कारकून प्रगणे शरीराबाद किल्ले कायापुरी सरकार साहेबांची आज्ञा घेऊन स्वर झालों तो प्रगणे मजकुरी येऊन सरकारकाम करावयास लागलो तो प्रगणे मजकूरचे जमेदार दंभाजी शेट्ये व कामाजी महाजन व मनीराम देशमुख व ममताई व क्रोधाजी नाइकवाडी ऐसे हरामजादे फार आहेत ते सरकारकामाचा कयास चालू देत नाहीत. दंभाजी शेट्या कचेरीत येऊन जीभ धरून बसतो. मनीराम देशमुख आपले काम परभारे करून घेतो. ममताई देशपांडीन इणे तमाम प्रगाण जेरदस्त केला. क्रोधाजी नाइकवाडी याणे तमाम तफरफा केला......" इ. इ. गद्याच्या या छोट्याशा नमुन्यावरून फारसीने मराठीवर कशा पद्धतीने अतिक्रमण केले होते याचा बोध होतो. वरील उताऱ्यात पन्नास टक्के शब्द फारसीचे आहेत. त्यामुळे फारसीच्या वर्चस्वाचा स्तर कसा होता हे समजते. २००–३०० वर्षांच्या कालखंडात फारसीने मराठीला शरण आणले होते.

राजसत्ता मुसलमानी असल्याकारणाने सरकार दरबारात फारसीचा वावर होता. सरकारची सर्व कागदपत्रे फारसीत निघत होती. कृ. पां.कुलकर्णी लिहितात, ''अर्ज' दारांच्या 'फिर्यादी' 'काजी' पुढे जाऊन 'फैसला' किंवा 'इन्साफ' होऊ लागला. अग्रवादी, पश्चिमवादी, व्यवहार वगैरे पूर्वापार धर्मग्रंथात आढळणाऱ्या संज्ञा नाहीशा झाल्या व त्यांच्या जागा मुसलमानी शब्दांनी घेतल्या. पत्राबदली 'कागद' आले व त्यावर 'गोही' होत असत त्या 'साक्षी' झाल्या. 'मोकादमाचे' 'अधिकारी' झाले आणि त्यांना प्रतिवर्षी मिळणाऱ्या 'वार्षिक वेतनाचे' ऐवजी 'सालिना मुशाहिरा' मिळण्याचा 'सिलसिला' पडला.'

बहामनी काळात पश्चिम किनाऱ्यावर मराठीचा आणि पोर्तुगीज भाषेचा संबंध येण्यास सुरुवात झाली. पूर्वीच्या 'ल' बद्दल 'ळ' जास्त प्राचुर्याने येऊ लागला. कानडी भाषेशी संबंध जो यादवकालीन सुरु झाला तोच या काळात हळूहळू वाढत गेला.
बहामनीकालीन भाषेचा एक नमुना –

'तेथे कैसे काय वर्तले ॥ १८-१० ॥ कैसी लावन्याची रासी । ती येथे पाहुनु उर्वसी । कैसी येकुची तापसु । पाहि न टळेची ॥११॥ तीयेची पाहुनी रूपरेषा । काईसीया सुरनायेका । तिलोत्तमा न पावे सरी । नव्हेची मेनीका ॥१२॥ ऐसे रूपाचें लावण्य । पण उघडी वस्त्रहीण । हातीं घेउनिया आधाटी । फाकला रंगध्वनी आकर्षलें त्रिभुवन ॥१३॥ गीताचेन नादें । चरो विसरली स्वापदें । हरणीं वोडवीले कर्ण । तीयें राहीली नादबोधें ॥१४॥' (मराठी भाषा उद्गम आणि विकास, कृ. पां. कुलकर्णी, पृ.२४२)

**आपली प्रगती तपासा :**
**प्रश्न :** बहामनीकालीन मराठी भाषेचा आढावा घ्या.

## ६.६ समारोप

महाराष्ट्राच्या इतिहासात बहामनी काळ अनेक अर्थांनी चर्चित राहिला. दुर्गादेवीचा प्रदीर्घ असा दुष्काळ किंवा दक्षिणेत इस्लामी सत्तेची पायाभरणी या दोन्ही घटनांनी महाराष्ट्राला प्रभावित केलेले आहे. विजयनगरला नेलेली श्रीविठ्ठलाची मूर्ती परत पंढरपूरला आणणारे संत भानुदास याच काळातील होत. सरस्वती गंगाधर, संत एकनाथ, दासोपंत हे महत्त्वाचे रचनाकार याच काळातील आहेत. वरील रचनाकारांनी अत्यंत धामधुमीच्या काळातही मराठी भाषेत महत्त्वपूर्ण साहित्यनिर्मिती केली. राज्यकर्त्यांची भाषा फारसी असल्याने त्याच भाषेत सर्व सरकारी व्यवहार होत होते. त्यामुळे या काळातील मराठी भाषेत अनेक फारसी शब्दांनी शिरकाव केला जो पेशवेकाळातही टिकून होता.

## ६.७ प्रश्नावली

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१) बहामनीकालीन मराठी साहित्याचा आढावा घ्या.

२) बहामनीकालीन मराठी भाषेची वर्णप्रक्रिया आणि प्रत्ययप्रक्रियेचे विवेचन करा.

३) बहामनीकालीन मराठीचा अन्य भाषांशी संबंधांची सविस्तर चर्चा करा.

**ब) टीपा लिहा.**

१) बहामनीकालीन मराठीचे विभक्तिप्रत्यय

२) बहामनीकालीन मराठीचे काळांचे प्रत्यय

## ६.८ संदर्भ ग्रंथ

१. कुलकर्णी, कृ. पां.; मराठी भाषा उद्गम आणि विकास, मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे, १९७३ (सहावी आवृत्ती)

२. नसिराबादकर, ल. रा.; प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

३. शेणोलीकर, ह. श्री.; प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, १९७२ इ.

४. सरदार, गं. बा.; संत साहित्याची सामाजिक फलश्रुती, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९७० (ति.आ.)

५. पांगारकर, ल. रा.; मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड दुसरा (एकनाथ-तुकारामांचा काल), विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे-२, १९७२ (दु.आ.)

६. भावे, वि. ल.; महाराष्ट्र सारस्वत, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,१९८२ (सहावी आवृत्ती)

❖❖❖❖